नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र
हाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी



कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

र्ष २५ अंक २

जून १९७०

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] जून १९७० [अंक २

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : दोन रुपये

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

श्री. हिराबाई पेडणेकर



कोल्हटकरांच्या अग्रशिष्या आणि मराठीतील पहिल्या
स्त्री-नाटककार

अनुक्रमणिका

श्री. रमाबाई कोल्हटकर



कोल्हटकरांच्या पत्नी

अनुक्रमणिका

कोल्हटकरांचे खामगाव येथील स्वत:चे घर



हे प्रशस्त दुमजली बंगलेवजा घर कोल्हटकरांनी १९०९ साली बांधले. आता त्याची मालकी खामगावचे सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते श्री. गोविंददासजी रतनलालजी भाटिया, एम. एल. ए., यांच्याकडे आहे.

कोल्हटकरांचे जळगांव-जामोद येथील भाड्याचे घर




कोल्हटकरांच्या आयुष्याची शेवटली बारा वर्षे या भाड्याच्या घरात गेली. १९१८ च्या सप्टेंबरच्या शेवटल्या आठवड्यात ते जळगावला गेले. त्या वेळी या घराची मालकी कै. पन्नालाल आत्माराम अग्रवाल यांच्याकडे होती. आता ती श्री. किसनलाल जयनारायण केला यांच्याकडे आहे.

गुरु,' शिष्य आणि मित्र



या छायाचित्रासंबंधीची माहिती प्रो. म. ल. वऱ्हाडपांडे यांच्या लेखांत दिलेली आहे.

कोल्हटकरांची मॉरिस कॉलेजला भेट



मागील रांग (डावीकडून उजवीकडे) १. (टेबलावर बसलेले) प्रा. भ. श्री. पंडित, नागपूर, २. (उभे) डॉ. कोलते, कुलगुरु, नागपूर विद्यापीठ, ३. (उभे) श्री. श्रौती, नागपूर, ४. (उभे) कै. अडावदकर, ५. (उंच स्टुलावर) श्री मांजरेकर, छिंदवाडा.

पुढील रांग ६. (बसलेले) श्री. महाजन, ७. श्री. ब्रह्म, खामगाव, ८. कै. तात्यासाहेब कोल्हटकर, ९. कै. रा. ब. अच्युतराव साठे, १०. कै. तायडे.

प्रो. भ. श्री. पंडित यांच्या याच अंकातील लेखांत या छायाचित्राची माहिती दिलेली आहे.

अनुक्रमणिका


श्री. हिराबाई पेडणेकर आणि श्री. कृ. ना. नेने



श्री. कृ. ना. नेने यांची माहिती 'कोल्हटकरांच्या चरित्रांची साधने' या लेखात दिलेली आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे पहिले संमेलन : १३ व १४ जानेवारी १९२३ : अध्यक्ष श्री. श्री. कृ. कोल्हटकर



खुर्चीवर डावीकडून उजवीकडे: १. गु. ह. देशपांडे, २. दुर्गाप्रसाद तिवारी, ३. ना. के. वेहरे, ४. श्री. कृ. कोल्हटकर, ५. न्या. केशवराव कोरटकर, ६. दा. के. ओक, ७. गो. अ. ओगले, ८. का. वा. पंडित ऊर्फ कवि भृंग ९. नी. व. भवाळकर, १०. आनंदराव टेकाडे.
मागच्या दुसऱ्या उभ्या रांगेत पहिले वि. सा. संघाचे संस्थापक कविभूषण प्रो. खापर्डे आहेत. (प्रो. खापर्डे यांच्या कृपेने)

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] जून १९७० [अंक २

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

" शरच्चंद्र, पहा, यांनी आपल्या देशाचा केवढा अपराध केला आहे तो. परकीयांच्या लाचांना भुलून यांनी हिंदु राज्य बुडविण्याचा घाट घातला होता. परंतु आपले दैव सवळ. असे नीच, राजद्रोही, मातेच्या मानेवर सुरी ठेवणारे लोक ज्या देशांत आनंदाने वसताहेत, त्या सारखा हतभागी देश या भूतलावर सापडणार नाही. अशा पुरुषांना कडक शिक्षा दिल्या नाहीत, तर या भरतभूमीचे काय भविष्य होईल, हे दिसतेच आहे. शेवटी असा एक दिवस येईल की, आमचा देश वाटेल त्या देशाचे भक्ष्य होऊन जावा आणि इतर देशाच्या राष्ट्रांना हसण्याचा विषय होऊन बसावा. हिमाचला, विंध्याचलाचे अनुकरण करून, आम्हां आर्य लोकांचा चुराडा करून टाक किंवा हिमोत्पादनाचे काम एकीकडे ठेऊन अग्निवृष्टि कर आणि आम्हां सर्वांची राखरांगोळी करून टाक. सूर्य-नारायणा, आपले सर्व नेत्र उघडावयास विलंब कां लावतोस ? प्रलय होण्याला आता अवधि उरली नाही. "

मूकनायक, पान १६४, १९०१

अनुक्रमणिका

जळगाव-जामोद् येथील एक तप

संकलक : प्रा. दि. वि. जोशी, जळगाव-जामोद

(जळगाव-जामोद येथील सुप्रसिद्ध वकील, कार्यकर्ते आणि लेखक कै. के. का. ऊर्फ काकासाहेब जोशी यांच्या घरी सापडलेल्या काही टिपणांवरून केलेले संकलन असे या लेखाचे स्वरूप आहे. कागदपत्रे पाहू दिल्यावद्दल मी त्यांचे सुपुत्र श्री. दिनकरराव जोशी, अॅडव्होकेट, यांचा आभारी आहे. —दि. वि. जोशी)

(१)

खामगाव येथील उत्कर्षाचा काल

कै. तात्यासाहेव कोल्हटकर इ. स. १८९७ साली वकील झाले. इ. स. १९०५ पर्यंत त्यांनी तेल्हाऱ्यास वकिली केली. तेल्हाऱ्याचे कोर्ट १९०५ साली बंद झाल्यावर १९१८ पर्यंत ते खामगावीच वकिली करीत होते. याच काळात त्यांच्या साहित्यिक दृष्टीचा आणि जीवनाचा सर्वांगीण विकास झाला. त्यांच्या नाट्यकृती वैभवास चढल्या. साहित्यसेवा करण्यासाठी त्यांना कोलाहलापासून दूर, निवांत असे ठिकाण हवे होते. कारण, आवड साहित्याची होती व पोटासाठी धंदा वकिलीचा करावयाचा होता. शिवाय, दिवाणी व फौजदारी कोर्टांची अशी दोन्ही कामे सांभाळताना धांदल उडून एकही काम धड होत नाही, असे त्यांचे मत होते. दोन्ही कोर्टांची कामे सांभाळणाऱ्या वकिलांची चमत्कारिक धावपळ ते पाहात व हळहळत. वयाच्या एकोणिसाव्या वर्षापासून सुरू झालेल्या इसबाच्या विकारामुळेही त्यांना जास्त कामासाठी करावी लागणारी पायपीट आणि दगदग परवडत नसे. म्हणून, जेथे एकच कोर्ट असेल, तेथेच जाण्याचे त्यांनी ठरविले. "तेल्हारा येथे असतानाच तात्यासाहेवांनी फौजदारी कामे घेण्याचे सोडले, ते अखेरपर्यंत."

जळगाव (जामोद) येथे आगमन

याच सुमारास जळगावी एक दिवाणी कोर्ट देण्यात आले. त्यांना हवे असलेले ठिकाण जळगावच्या रूपाने मिळाले. साहित्याचा हा नेपोलियन जळगावच्या सेंट हेलेनाला आला. नेपोलियन आणि सेंट हेलेना यांचा अविभाज्य व अटळ संबंध नियतीने घालून ठेवलेला आहे. त्याला उपाय नाही.

दि. १ ऑक्टोबर १९१८ रोजी जळगावचे कोर्ट सुरू झाले. "तत्पूर्वी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस कै. तात्यासाहेब व कै. काकासाहेब एकाच दमणीतून नांदुऱ्यावरून जळगावी आले." कोल्हटकर प्रथम येथील सुप्रसिद्ध व प्रतिष्ठित नागरिक श्री. बळवंतराव डिडोळकर यांचेकडेच उतरले. घर मिळेपर्यंत तरी—सहा महिने—त्यांचा मुक्काम त्यांच्या घरीच होता. ते माडीवर राहात. कामानिमित्तच ते खाली येत. बाकीचा सर्व वेळ ते माडीवरच लिखाण—वाचनात घालवीत. त्यानंतर ते मुख्य रस्त्यावर असणाऱ्या वकील मोहल्ल्यात श्री. डिडोळकरांच्याच दुसऱ्या घरात राहावयास गेले. नंतर त्या घराला लागूनच असलेल्या श्री. नन्नुलाल यांच्या घरात काही दिवस होते. पुढे ते या घराच्या समोरील श्री. अग्रवाल यांचे घरात राहावयास गेले. याच घरात ते जळगाव सोडीपर्यंत, म्हणजे डिसेंबर १९३१ पर्यंत, रहात होते.

घराचे स्वरूप

या घराचे स्वरूप आता बदललेले आहे. या घराचा व खामगाव येथे त्यांनी इतक्या हौसेने स्वतः बांधलेल्या प्रशस्त घराचा असे दोन फोटो श्री. भाऊसाहेव माडखोलकरांचे जवळ आहेत. त्या वेळी हे घर अत्यंत साधे, साधारण बांधणीचे, कौलारू असे

होते. घरासमोर अरुंद ओसरी. त्यावर कवेलू. येथेच ओसरीत त्यांचे कारकून कै. मोरेश्वर वामन वडोदकर हे बसत. ओसरीच्या मागे चार भितींची खोली. खोलीच्या पश्चिमेकडील कोपऱ्यात पुस्तकांची एक आलमारी. जवळच खाट. पूर्वेकडे एकच खिडकी व त्या खिडकीपाशी टेबल खुर्ची. येथेच बसून ते विचार करीत, लिहीत. उत्तर काळात पश्चिमेकडील खाटेवरच त्यांची बैठक असे. खाटेवर पडून ते ऐकत. आर्थिक मदत देऊन लावलेली मुले वाचीत. त्या खोलीच्या मागे पश्चिमेकडे एक टिनशेड. येथे त्यांचा स्वयंपाकी वजेराम स्वयंपाक करी. हा स्वयंपाकी तात्यासाहेब आले तेव्हापासून तो ते खामगावी जाईपर्यंत होता.

तात्यांचे पहिले दर्शन

"त्या वेळी त्यांच्या सर्व शक्ती कायम होत्या. ते डोळ्यांना चष्मा लावीत नसत. केसही काळे होते. चालताना जलद चालत. जेवायला बसले म्हणजे आग्रह करणाऱ्याला आपल्या आग्रहाचे सार्थक झाले, असे वाटे. आवाजाची कोमलता व मेंढाचा तरळपणा कायम होता. एका मागून एक १०–१२ पदे म्हटल्याशिवाय ते थांबत नसत."

आदर्श वकील

जळगावी एकच कोर्ट असल्यामुळे त्यांच्या जिवाची धांदल अशी कधीच उडाली नाही. शांततेने ते सर्व कामे करीत. "एक काळ असा होता की, कोर्टातील कामापैकी निम्मी कामे त्यांच्याकडे असत. तरी त्यांची धांदल उडालेली कुणाला दिसली नाही. त्यांनी कधीही कोणाचे वाईट केले नाही. कुणाला वदसल्ल दिला नाही. कुणाचे काम अर्धवट टाकून दिले नाही. शक्य तितकी मेहनत करून खटले चालविले. प्रतिपक्षाच्या वकिलावर तोंडसुख घेतले नाही. साक्षीदारांशी अपमानास्पद वागणूक ठेवली नाही. त्यामुळे या भागात त्यांचेबद्दल आदर होता. खोटे खटले ते घेत नाहीत, अशी त्यांची कीर्ती होती."

"कायद्याच्या स्वतंत्र अभ्यासात ते वेळ घालवीत नसत. एखाद्या खटल्यासंबंधी कायदा पाहावयाचा असल्यास तेव्हढ्यापुरतीच पुस्तके चाळीत. कायद्याची मूलतत्त्वे त्यांना चांगली माहीत होती. कोर्टाने दिलेले हुकूम ते चोखंदळपणे उतरून घेत; व दिलेल्या मुदतीत त्यांची अंमलबजावणी करण्याची काळजी घेत. कोर्टातून पक्षकाराचे पैसे काढले, तर उलट टपाली ती रक्कम घेऊन जाण्याबद्दल पक्षकाराच्या मागे तगादा लावीत."

वकिलीतील काटेकोरपणा—

तात्यासाहेब कोणत्याही कामात काटेकोरपणे वागत. कारकुनांना शुद्धाशुद्धतेचे खून माफ असतात. परंतु तात्यासाहेबांच्या कारकुनाला अशा खुनाबद्दल वरीच शिक्षा भोगावी लागे. त्या वेळी त्यांचे कारकून कै. मोरेश्वर वामन वडोदकर हे होते. कारकुनाने पक्षकारांना पत्रे लिहावीत व तात्यासाहेबांनी त्यातील दूरान्वय व ऱ्हस्व दीर्घाच्या चुका त्याचेकडूनच दुरुस्त करून घ्याव्यात, या गोष्टी नित्याच्या असत. त्यामुळे पत्रे असोत की फिर्याद अर्ज असोत, त्यात एवढाही प्रमाद जाणूनबुजून आपल्या अर्जातून त्यांनी होऊ दिला नाही. प्रोसेस दाखल करावयाच्या, तर आपल्या टिपणाबरहुकूम त्या लिहिल्या आहेत की नाहीत, हे पाहाण्याकरिता ते कारकुनाकडून वाचून घेत व चुका दुरुस्त करीत; पुनः पुनः लिहवून घेत व मगच सह्या करीत. कोर्टाच्या कामाच्या दिवसात ते कधी बाहेर जात नसत. आणि तसा प्रसंग आलाच, तर इतर वकिलांना ते दावे अगदी बारकाईने समजावून सांगत. त्यामुळे सर्व वकिलांच्या मनात अगोदरच असलेला आदर द्विगुणित होई.

—तितकाच लिखाणातही

आपल्या लिखाणाच्या बाबतीतही हाच काटेकोरपणा ते पाळीत. आपण लिहिलेले प्रत्येक अक्षर व प्रत्येक शब्द जसाच्या तसा छापला गेला पाहिजे, हा त्यांचा आग्रह असे. त्यात रेसभरही इकडचे तिकडे झालेले त्यांना खपत नसे. त्याला कारणही तसेच होते. त्यांच्या विचारांची मांडणी काटेकोरपणे केलेली असे. हे साधण्याकरिता ते फार कष्ट घेत. विचारमालिकेत अनेक वेळा फरक करावा लागला, तरी तितके श्रम घेण्यास ते नेहमीच तयार असत. म्हणून काना, मात्रा, ऱ्हस्वदीर्घ, चिन्हे यात एखादी जरी चूक झाली, तरी त्यांचा जीव तळमळत असे. छापखान्यात त्यांचे वाङ्मय छापत असताना त्यांच्या दुरुस्त्या

शेवटल्या क्षणापर्यंत चालत असत. प्रुफेही रात्र रात्र जागून ते तपासत. अत्यंत काटेकोर, शुद्ध भाषा लिहिणारे तत्कालीन जे चार दोन लेखक होते, त्यात तात्यासाहेवांची गणना होते. वामन मल्हारांनी त्यांच्या भाषेबद्दल जे उद्‌गार काढलेत, ते यथार्थ आहेत.

अनवधान आणि अनेकावधान

वकील नवीन असो किंवा जुना असो, तात्यासाहेवांनी त्याच्याशी वागण्यात कधीच भेदभाव केला नाही. आपल्या मोकळ्या स्वभावाने व खुल्या भाषणाने ते सर्वांसच हवे असत. एकदा गप्पात भाग घेतला, म्हणजे त्यात ते रंगून जात; व कोणालाही न दुखविता त्यांचा विनोद अस्खलित चालू राही. त्याच वेळी त्यांच्या डोक्यात नाटकांची कथानके, उकल, संघर्ष यांची शक्याशक्यता घोळत असे. केव्हा केव्हा तर एकदम ते एकादी गुंतागुंत उकलली किंवा कल्पना सुचली, म्हणजे स्वतःशीच, "सापडली, सापडली!", असे उद्‌गार आनंदाने काढीत. हळूहळू सर्व वकिलांना ती त्यांची सवय ज्ञात झाली. त्या उद्‌गारांचा संदर्भ दुसरा आहे, हे त्यांच्या लक्षात येऊ लागले. एकाच वेळी अनेक ठिकाणी अवधान देणे, हे तात्यासाहेबांचे वैशिष्ट्य होते. ते वेळप्रसंग पाहूनच गप्पात भाग घेत. एरव्ही वेळेचा अपव्यय करणे त्यांच्या अगदी जिवावर येई. बहुतेक सर्व वेळ ते वाचनात दंग असत. ज्या वेळी दृष्टीत मंदत्व आले, त्या वेळी ते दुसऱ्याकडून वाचवून घेत व ऐकत. १९२७–२८ या सालात श्री. सोनाजी किसन बंवटकार व श्री. श्रीहरी रामचंद्र वोंडडे ही दोन मुले वाचनाचे काम करीत व प्रसंगी लिहीतही. पण लिहिणे अल्पच. ही दोन्ही मुले अजूनही आहेत.

बाररूममधील फॅक्ट्‌स्‌ कॉर्नर

जळगावी सध्याचे जे सबरजिस्ट्रॉरचे कार्यालय आहे, ते पूर्वी बाररूम होते. त्या बाररूममध्ये तात्यासाहेवांचा एक विशिष्ट कोपरा असे. (त्या खोलीच्या वायव्य भागाकडील कोपरा). तेथे तात्यासाहेव नेहमी बसत व वाचनात दंग असत किंवा वरीलपैकी कुणी तरी त्यांना वाचून दाखवित असलेले दिसे. साहित्यिक अभिरुचीच्या तरुण वकिलांनी त्या कोपऱ्याला "facts corner" असे नाव दिले होते. कारण अनेक सत्य गोष्टींचा भरणा तात्यासाहेवांजवळ होता. त्यातील कित्येक विनोदात घोळवून त्यांनी सांगितल्या होत्या व खसखस पिकवली होती.

कवितेचे वावडे

तात्यासाहेव नेहमीच वाचनात गढून जात. वाचन,–मग ते कोणत्याही विषयाचे असो,–सारख्याच उत्साहाने ते करीत असत. येणारी वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके किंवा इतर ग्रंथ संपूर्ण वाचून काढल्याखेरीज ते राहात नसत. मासिक पुस्तकांतील सर्व विषय–मग साधुसंतांचे चरित्र असो अगर प्रवासवर्णन असो–ते वाचत असत. "पण चमत्कार असा की, कविता मात्र ते अचूक गाळीत. स्वतः कवी असूनही काव्याची पुस्तके वाचताना ते आढळले नाहीत." कै. काकासाहेवांनी त्यांना या बाबतीत एकदा प्रश्न केला असता ते म्हणाले, "कवितावाचनाची मला आवड नाही. पूर्वी काव्यग्रंथ काय वाचले असतील, तेवढेच. पण आधुनिक कवींच्या कलाकृती मी फारशा वाचल्या नाहीत. एखादी कविता उत्तम आहे, असे कळल्यावर मी ती वाचतो किंवा, कोणी वाचून दाखविणारा भेटला तर अगर काव्यगायनाच्या प्रसंगी मी हजर असलो तर, मला कविता ऐकाव्या लागतात. प्रस्तावनेसाठी किंवा अभिप्रायाकरिता म्हणून एखाद्याने आग्रह केल्यास कर्तव्य म्हणूनही मला कधी कधी कविता वाचाव्या लागतात. पण एकंदर आवड कमीच. एखाद्याचा काव्यसंग्रह आवडीने वाचत वसलो असेन असा क्वचितच!" "वहु असोत सुंदर" सारखे महाराष्ट्रगीत किंवा नाटकांतील रसभरित पदे करणाऱ्या तात्यासाहेवांच्या तोंडचे हे उद्‌गार म्हणजे एक चमत्कारच म्हणावा लागेल.

शिष्टाचारावर कटाक्ष

"तात्यासाहेव शिष्टाचाराचे चाहाते असत. ते तो अत्यंत काटेकोरपणे पाळीत. इतरांनीही पाळावा, अशी त्यांची अपेक्षा असे. हा एक त्यांचा स्वभावच होऊन वसला होता. कुणाकडेही आगाऊ सूचना दिल्याशिवाय ते कधीही गेले नाहीत आणि कंटाळा येईपर्यंत वसले नाहीत. सामान्य शिष्टाचार तर ते पाळीतच; पण, आपण खोकताना, शिकताना इतरांस उपद्रव होऊ नये, म्हणून ते फार दक्ष असत. पत्राचे उत्तर उलट डाकेने

गेलेच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे. भेटीला परत भेट दिल्याशिवाय ते राहात नसत."

व्यवहारविमुख वृत्ती

नाटककाराला मनुष्यस्वभावाची उत्तम पारख असते. त्यात त्यांच्यासारख्या अष्टपैलू उत्कृष्ट नाटककाराला मनुष्यस्वभावाची पारख नव्हती, असे म्हणणे विसंगत दिसेल. पण, वकिलीसारखा व्यवसाय असूनही, त्यांची व्यवहाराशी फारकत होती, असे म्हटले तर आश्चर्य वाटेल. पण, ते जितके बुद्धिमान होते तितकेच भावनाशीलही होते; व म्हणूनच कुठेही बुद्धीची चमक दिसो, तात्यासाहेब योग्य शब्दात तिचे स्वागत करीत. बुद्धिवान् लेखकास पुढे आणावे, असे त्यांना वाटे. ते खटपटही करीत. त्याची मुक्तकंठाने स्तुती करीत. दोष मात्र खुबीने मागे ढकलीत. दोष दाखवून कोणत्याही लेखकास निराश करणे त्यांना बरे वाटत नसे. व्यवहारात मात्र भावनेने बुद्धीवर कुरघोडी केली होती. त्यांनी अनेकांना आर्थिक व इतरही मदत केली होती. ही मदत शुद्ध भावनेने केलेली असे. त्यात कित्येकदा ते फसतही असत. असे काही प्रसंग दाखविले म्हणजे ते काकासाहेबांना म्हणत, "केशवराव, साऱ्या जन्मात मी कधी भाजी आणली नाही की बाजारहाटही केला नाही. मग कसा जमणार व्यवहार? आणि व्यवहार म्हणजे तरी दुसऱ्याला फसविण्यापलिकडे काय आहे?" प्रत्येक वेळी घासाघीस करणाऱ्या जगाच्या सौदेबाज वृत्तीबद्दल त्यांनी या वाक्यातून घृणाच व्यक्त केली आहे.

कै. डॉ. दप्तरी यांची एक आठवण

तात्यासाहेब गुणीजनांचे कसे चाहाते होते, याची कै. डॉ. के. ल. दप्तरी यांच्या संबंधातील आठवण सांगण्यासारखी आहे. तात्यासाहेबांनी तेल्हारा मुक्कामी असताना उच्च गणितशास्त्राचा अभ्यास केला होता, हे बहुतेकांना माहीत आहे. त्यांचा अभ्यास पुढेही चालू होता. गणितशास्त्रातील, काही अडचणी ते दप्तरींना नेहमी विचारीत. त्यांचा परस्पर पत्रव्यवहारही होता. डॉ. दप्तरी यांच्याकडून आलेले पत्र व त्या पत्रातून केलेला खुलासा पाहिला, म्हणजे तात्यासाहेब नेहमी म्हणत, "दप्तरींसारखा बुद्धिमान माणूस विरळा. त्यांच्याइतके गणितशास्त्रात पारंगत फार थोडे लोक आहेत. आणि असा कुशाग्र बुद्धीचा संशोधक बिचारा एकीकडे पडलेला आहे." सांगलीच्या ज्योतिषसंमेलनात दप्तरींच्या योग्यतेची तात्यासाहेबांनीच संमेलनास आलेल्या ज्योतिर्विदांना माहिती करून दिली; व त्याचा परिणाम, म्हणजे लोकमान्यांनी दप्तरींवर करणग्रंथ, तयार करण्याची जबाबदारी टाकली, हा होय.

जळगावी केलेले साहित्यलेखन

जळगावला असताना त्यांना परिणतप्रज्ञत्व आले होते. त्यांचे सारे गंभीर लिखाण याच काळात झाले. गाजलेले टीकालेखही याच काळात लिहिले. 'श्यामसुंदर' व 'दुटप्पी की दुहेरी' या कादंबऱ्या, रंगभूमीवर न आलेली (कारण या काळात त्यांचा नाटक मंडळयांशी संबंध जवळजवळ तुटला होता) 'श्रमसाफल्य', 'शिवपावित्र्य', 'मायाविवाह' व 'जन्मरहस्य' ही नाटके, 'सुदाम्याच्या पोह्यां'तील आठ दहा मुष्टी, आत्मवृत्त इत्यादि लिखाण केले. द्वितीय महाराष्ट्र कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण व बाराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषणही त्यांनी येथेच तयार करून दोन मोठ्या मानाची अध्यक्षपदे भूषविली. जळगावीच आपल्या गाजलेल्या 'महाराष्ट्रगीता'चीही रचना त्यांनी केली.

आस्तिक की नास्तिक?

तात्यासाहेबांना सामाजिक सुधारणांची अत्यंत आवड होती. त्यासाठी त्यांचा जीव तळमळे. सुधारणावादी म्हणजे नास्तिक, असे त्या काळांत समीकरण रूढ झालेले होते. शिवाय येथील वास्तव्यात देवाची पूजा करताना ते कुणाला दिसले नाहीत. म्हणून ते नास्तिक होते असे नाही. त्यांच्या खालील उद्गारांवरून त्यांना 'संशयात्मा' म्हटले तरी चालेल. ते म्हणत, "देव आहे म्हणून त्याचे जन्मभर भजन पूजन करावे आणि मेल्यावर एखाद्या पिशाचाने येऊन म्हणावे की जन्मभर देवाची पूजा केलीस, आता घे आपल्या कृत्याचे प्रायश्चित्त! तेव्हा मधून मधून देवाचे नाव घ्यावे व मधून मधून म्हणावे की देव नसेलही!" यांतील विनोद जरी बाजूला ठेवला, तरी त्यांची आस्तिक्य बुद्धी प्रगट करणारी किती तरी पदे आहेत. शेवटी शेवटी ते एका मंत्राचा जप करीत असल्याचे कै. काकासाहेबांना आढळून आले होते. त्यामुळे त्यांच्या मनाला शांती लाभत असावी.

प्रस्थान

शेवटी शेवटी ते अतिशय थकले होते. एकटे-पणाची जाणीवही झाली होती. म्हणून त्यांनी जळगाव सोडण्याचा निश्चय केला. अखेर १९३१ डिसेंबर महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत त्यांनी जळगाव सोडले व ते खामगावी गेले.

(२)

[जळगाव–जामोद येथे कोल्हटकरांच्या सहवासात काही काळ आलेले श्री. तात्यासाहेब गोडबोले (अॅड.), श्री. अण्णासाहेब डिडोळकर (अॅड०), श्री. दादासाहेब देशपांडे (अॅड०), श्री. नानासाहेब बोचरे (अॅड०) यांनी वि. सा. संघाच्या जळगाव शाखेने आयोजित केलेल्या समारंभात कथन केलेल्या व श्री. वि. गो. बोरकर (अॅड०), श्री. श्री. रा. वोदडे, श्री. रा. गो. बंगाले, श्री. सो. कि. बंवटकार व श्री. र. भि. पुराणिक यांचेकडून गोळा केलेल्या काही आठवणी पुढे दिल्या आहेत.]

बिनाडिग्रीचा वकील

कै. तात्यासाहेब जळगावी सप्टेंबर १९१८ च्या शेवटल्या आठवड्यात आले. काही घरे वदलून शेवटी ते कै. पन्नालाल आत्माराम अग्रवाल यांच्या घरात राहावयास गेले. शेवटपर्यंत ते याच घरात होते. घर अगदीच साधारण, पण रस्त्यावर होते. कोल्हटकर ज्या मोहल्ल्यात राहात, त्याला 'वकील मोहल्ला' म्हणत. कारण त्या वेळी ७ वकिलांपैकी ५–६ वकील या मोहल्ल्यात जवळ जवळ राहात. या भागात अग्रवालांचीही वस्ती जास्त असल्यामुळे त्याला 'मंडई' असेही म्हणत असत.

तात्यासाहेबांच्या घराची जी ओसरी होती, तिला दर्शनी कामटयांची जाळी होती. तेथेच समोर त्यांच्या नावाची पाटी असे. तात्यासाहेबांची वकिली पहिल्या प्रतीची असल्यामुळे त्यांच्याकडे पक्षकारांची धूम असे. पक्षकार जे आपसात बोलत, ते तात्यासाहेब ऐकत. त्यांच्या विनोदातही सामील होत.

एकदा मराठी वकिलांच्या गोष्टी निघाल्या. त्या वेळी मराठी वकील असत. तात्यासाहेबांचे सासरे कै. वामनराव जोशी हे देखील मराठी वकीलच होते. तेव्हा तात्यासाहेब म्हणाले,—

"अहो, या मराठी वकिलांचं सोडा ! आमचे पक्षकार मला काय म्हणतात माहित आहे ? ते म्हणतात की, आमचा वकील बिनाडिग्रीचा आहे !"

तात्यासाहेबांच्या घरावर––

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
वकील

एवढीच पाटी होती. आणि त्यावर एकही डिग्री लिहिलेली नव्हती. काही काळाने तर पाटीवरील अक्षरेही नाहीशी झाली; व पुढे पुढे ती पाटीच गायब झाली ! त्या वेळी "कोऱ्या पाटीचा" आणि पुढे पुढे "विना पाटी"चा वकील असे पक्षकारांनी म्हटल्याचे ऐकिवात नाही.

छत्रीपती

तात्यासाहेबांचा पोषाख अगदी साधा असे. त्याना साहेबी पोषाखात कुणी पाहिल्याचे स्मरत नाही. त्यांचा स्वभावही निगर्वी होता. अष्टावधानी असूनही नेहमी आपल्याच तंद्रीत असत.

डोक्याला पांढरा जरीचा रुमाल, लांब पारशी फॅशनचा पांढरा कोट, त्यावर उपरणे, पायांत मोजे आणि काळे बूट व हातात तिन्ही त्रिकाळ छत्री अशी कोल्हट-करांची स्वारी नेहमी रस्त्याने जाताना कुणालाही दिसे. घरापासून कोर्टापर्यंत ते आपल्याच विचारात पावले टाकीत जात. त्या वेळी खांद्यावरल्या उपरण्याचे एक टोक सरकत सरकत गुढग्याच्या खाली जाऊन रस्त्याशीही चुंबाचुंबी करी. तरीही त्यांचे लक्ष नसे. आणि खांद्यावरची उघडी छत्री नेहमी मागे झुकलेली असे. त्यामुळे सगळे ऊन अंगावर येई. प्रसंगी पावसाची झिमझिमही अंगावर येई. पण छत्री कधी डोक्यावर किंवा पुढेही झाली नाही. साहित्यातील या छत्रपतीच्या मागे मागे राहाण्याचे एकनिष्ठ व्रत छत्रीने शेवटपर्यंत पाळले. या त्यांच्या सवयीमुळे ते कोठूनही ओळखू येत. 'छत्रीपती' म्हणजे कोल्हटकर असे समीकरण रूढ झाले होते. त्यांची जी ही साथ छत्रीने जन्मभर केली, ते तिचे ऋण त्यांनी तिजवर सुन्दर विनोदी कविता लिहून फेडले.

अनुक्रमणिका

बिनभांडवली धंदा

कोल्हटकर जळगावला आले, त्या वेळी पूर्व तयारी वगैरे म्हणावी तशी नव्हती. घरातही विशेष सामान नव्हते. घर घेतले आणि वकिली सुरू केली. ते गमतीने म्हणत, "वकिलीचा धंदा हा बिनभांडवली धंदा आहे. एक टेबल, एक खुर्ची, घराचे एक महिन्याचे भाडे आणि खानावळीचे एका महिन्याचे बिल भागवता येण्याइतके पैसे असले की, ३००–४०० रु. महिन्याला मिळवायला अडचण नाही." या भांडवलात तात्यासाहेवांनी वकिलीची बुद्धिमत्ता गृहीत धरलेली असावी, असे आपण समजायला हरकत नाही!

'मंदोधरी'

तात्यासाहेव जळगावला आले, तसे ते कै. वळवंतराव डिडोळकरांचे घरी उतरले होते. तेथे ते घर मिळेपर्यंत होते. त्यांच्या घरासमोरच घर असलेल्या श्री. त्र्यंबकराव उपाख्य राजाभाऊ डिडोळकर यांचे घरी मधून मधून त्यांचे संध्याकाळचे जेवण असे. कोल्हटकरांचा अत्यंत आवडता पदार्थ म्हणजे 'पिठले.' फोडणीचे वरण व कढीही त्यांना आवडे. त्या संध्याकाळच्या जेवणात फोडणीचे वरण नेहमी असे. आणि त्या घरात फोडणीच्या वरणाला 'मंदोधरी' असे म्हणत. फोडणीच्या वरणाला 'मंदोधरी' का म्हणतात, असे एकदा या भाषापंडिताला विचारले. त्या वेळी तात्यासाहेव हसून म्हणाले, "मंदोधरी हा शब्द नसावा. असलाच तर मंदोदरी असेल. मंद अधिक उदरी म्हणजे पोटाला मंद, सौम्य, पाचक असे ते मंदोदरी!"

खाद्य पदार्थांच्या शब्दांची इतकी रोचक व्युत्पत्ती सांगणारा तात्यासाहेवांशिवाय दुसरा विरळाच!

कढीच्या किंवा फोडणीच्या वरणाच्या ६–६ वाटया ते आवडीने पिऊन जात. त्यांनी जेवणाला कधी नावे ठेवली नाहीत. जेवण कसेही असो, रसिक भोक्त्याच्या वृत्तीने ते जेवणाचा रसास्वाद घेत. कढीचा भुरका घेऊन त्यांच्या जेवणाची नांदी सुरू होई आणि आस्वादाच्या आनंदात "अथाऽतो अन्नजिज्ञासा" असा जणू संकल्प सोडीत.

एकदा तात्यासाहेवांनी श्री. गोडबोले यांना जेवणाचे आमंत्रण दिले. स्वयंपाक घरच्या आचाऱ्याने केला होता. दोघेही जेवावयास बसले. सुरवातीपासूनच "वा! वा!" म्हणून कोल्हटकरांनी एकेक पदार्थ नावाजायला सुरवात केली. त्या रसभरित वर्णनाने ओसरीत वसलेल्यांच्या तोंडाला पाणीही सुटले असेल! गोडवोले आश्चर्याने पाहातच राहिले. कारण स्वयंपाक अगदीच सामान्य झाला होता!

कोल्हटकरांसारखा अन्नब्रह्माचा भोक्ताही विरळाच!

शेवटी शेवटी ते एकभुक्त राहात. संध्याकाळी दूध व फळफळावळे घेत. ज्या ऋतूत जी फळे असतील ती ते खात. विशेषतः अंजीर व केळी त्यांना फार आवडत. दुधात मुरवलेली अंजिरे संध्याकाळी घेत.

पक्षकारांचे नमुने : "जी केरो मायलो"

मधून मधून पक्षकार, कारकून यांच्याशी वोलता नाही ते कोटया करून विनोद करीत. या विनोदातून कोणाला न दुखविता दोषदिग्दर्शनही केलेले असे. कुणाची नेमकी सवय हेरून त्या सवयीचा नामनिर्देशाऐवजी सांकेतिक उपयोगही करीत.

तात्यासाहेवांचा एक पक्षकार होता. एक दोन वाक्ये झाली की, "जी केरो मायलो" असे म्हणायची त्याला सवयच होती. हा पक्षकार वाहेर ओसरीत कारकुनाशी हळू हळू वोलत वसायचा. कारकून आत गेले की तात्यासाहेव विचारीत, "'जी केरो मायलो' आला वाटतं?" कधी कधी हा पक्षकार आपले म्हणणे तात्यासाहेवांना तिखट मीठ लावून, नको असलेल्या गोष्टींचे भारूड लावून, सांगायचा. सांगताना विषयांतरामुळे भाषणाचे सूत्र तुटायचे आणि तो थांवायचा. त्या वेळी तात्यासाहेव म्हणायचे, "हं 'जी केरो मायलो' पुढे?"

यातला विनोद तोही समजायचा आणि हसायचा.

मूर्खांचा बाजार

तात्यासाहेवांचा असाच एक पक्षकार होता. तो नेहमीच साक्षीत असायचा. त्या 'रेडीमेड' साक्षीदाराला अशीच एक सवय होती. साक्ष किंवा उलटतपासणी आटोपून वाहेर आला की तो प्रत्येक वेळी तात्यासाहेवांना अभिमानाने विचारायचा की, "तुम्हाला काय वाटलं? विरुद्ध वकील काय म्हणाले? सवजज्जसाहेव काय म्हणालेत?" तात्यासाहेव योग्य ती उत्तरे

देऊन त्याचे समाधान करीत. त्यांनी पुष्कळ वेळा ऐकून घेतले. पण, एकदा अशीच महत्त्वाची साक्ष झाल्यावर, त्याने नेहमीप्रमाणे तात्यासाहेबांना विचारले,—

"तुम्हाला काय वाटलं ?"

"मी मूर्ख ठरलो!" विनोदाने त्यांनी उत्तर दिले.

"विरुद्ध बाजूचे वकील काही म्हणाले वाटतं ?"

"हो ना. ते स्वतःला महामूर्ख समजले."

"सबजज्जसाहेब बोलले वाटतं काही ?" तो घाबरून म्हणाला.

"तर! ते म्हणाले की, आता या मूर्खांच्या बाजारात मी काय बोलू ?" कोल्हटकर शांतपणे म्हणाले.

या पक्षकाराने पुढे प्रश्न विचारला की नाही, ते माहीत नाही!

एखाद्या केसमध्ये पाच सहा साक्षीदार असत. त्या साक्षीदारांची रंगीत तालीम सकाळी होई. तात्यासाहेब एकेकाला प्रश्न विचारीत. उत्तर देताना एखादा चुकला आणि दुसऱ्यानेच योग्य उत्तर दिले, तर ते म्हणत, "मारा यांच्या थोबाडीत. तुम्ही वरच्या नंबर वर या." तात्यासाहेब साक्षीदारात असा अनुक्रम लावीत.

फूटबॉलचे ग्राऊंड

त्यांच्या कारकुनाच्या हाताखाली काम शिकण्यासाठी एक मुलगा काही दिवस होता. त्याच्या हातून चुका होत. तात्यासाहेबांचे काम टापटिपीचे पद्धतशीर असे. कागदाला ठराविक अंतराचाच कंस असावा, असा त्यांचा कटाक्ष असे. एखादे वेळी या मुलाकडून कंस जास्त सुटत असे. त्या वेळी ते म्हणत, "इतकी जागा कशाला सोडलीस ? हे तर फूटबॉल खेळायचे ग्राऊंड झाले!!"

तात्यासाहेबांचा स्वभाव फार काटेकोर होता. ज्या वेळचे काम त्या वेळीच व्हावे, यासाठी ते दक्ष असत. एखादे वेळी कारकुनाकडून—कामाचा व्याप म्हणा की लक्ष नसे म्हणून म्हणा—ते काम दिरंगाईवर पडे. त्या वेळी ते त्यांना प्रश्न विचारीत. कारकून गडबडून जाई व काही सबबी सांगे. त्या थापा आहेत हे तात्यासाहेबांच्या चाणाक्ष दृष्टीतून सुटत नसे. त्या वेळी ते हसून म्हणत, "काय थापा मारता! थापा तबलावादकानं माराव्यात. त्या गोडही लागतात!"

माणसाची किंमत

तात्यासाहेबांचा आवाज गोड होता. संगीतातील मर्म ते जाणत. जळगाव (जामोद) येथील बालाजीचे मंदिरात संत पाचलेगावकर महाराजांचे एकदा कीर्तन झाले. त्या वेळी तात्यासाहेबांनी गाणे म्हटलेले काहींना आठवते. सार्वजनिक ठिकाणी ते अपवादाने गात. परंतु घरी ते नेहमी गुणगुणत असत. त्यांचे गुणगुणणे ऐकून ऐकणाराही तल्लीन होऊन जाई. शेवटी शेवटी 'बहु असोत सुंदर' हे 'महाराष्ट्रगीत' ते नेहमी गात. त्या गीताला त्यांनी सुंदर चाल दिली होती. सध्या त्या गीताला ज्या चाली लावलेल्या आहेत, त्यापेक्षा त्यांची चाल वेगळी होती.

तात्यासाहेबांना गाण्याचे वेड होते. एकदा शेजारी वकीलमित्र गात असता ते तेथे गेले आणि कारकुनाच्या जागेवर बसले. ते पाहून वकीलमित्र म्हणाले, "आत या ना, तात्यासाहेब. त्या कारकुनाच्या जागेवर काय बसलात ?..." त्यांना बसवीत तात्यासाहेब शांतपणे म्हणाले,—

"तुमचं चालू द्या. मी येथूनच ऐकतो. कुठेही बसलो तरी काय! जागेवरून माणसाची किंमत थोडीच करायची असते ?" माणसाच्या किंमतीचे वेगळे परिमाण असते, हे त्यांनी ओघात सुचविले!

कोल्हटकरांचा 'दूधआण्या' मारवाडी

आपापल्या क्षेत्रात अलौकिक कार्य केलेले अनेक मोठमोठे लोक त्या काळी जळगाव (जामोद)ला येऊन गेले. कै. न. चिं. केळकर, कै. गडकरी, कै. दादासाहेब फाळके, श्री. हिराबाई बडोदेकर, कै. दिनानाथ मंगेशकर, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. विश्राम बेडेकर, श्री. ह. वि. मोटे ही उदाहरणादाखल काही नावे पुरेशी बोलकी आहेत. तसेच लोकमान्य टिळकही येथे येऊन गेले आणि येथील लोकांत गणेशोत्सवाचे उधाण वारे शिरले. गणेशोत्सव दर वर्षी हिरीरीने साजरा होऊ लागला. अनेक कार्यक्रम होत. मधूनमधून नाटकमंडळयाही येऊन जात. त्यामुळे शाळातील

कार्यक्रमात नाट्याला अधिक महत्त्व दिले जाई. नाटकातील वेगवेगळे प्रवेश होत. नाटचछटा होत. तात्यासाहेब वेळ काढून शाळेत जात. तालमी पाहात. अभिनय शिकवीत. शुद्ध शब्दोच्चार पुनःपुन्हा वदवून घेत. शब्दांची फेक सांगत.

एकदा शाळेत एका प्रयोगाला ते गेले असता रंगपटात रंगरंगोटी चालू होती. मारवाड्याचे पात्र रंगले होते. पण त्यात त्यांना काही तरी कमतरता भासली. ते स्वतःच त्या मुलाला सजवू लागले. त्यांनी मुलाला नाव विचारले, तेव्हा त्याने 'दूधआण्या' म्हणून सांगितले. तात्यासाहेबांना ओळख पटली.

त्यांना सकाळी लवकर चहा लागत असे. लवकर दूध आणून देणारा मुलगा त्यांना हवा होता. कै. धोपेश्वरकर यांच्याकडे लवकर दूध येई. जो मुलगा त्यांच्याकडे दूध आणून पोचवीत असे, त्यालाच आपल्याकडेही दूध आणायला सांगावे, असे तात्यासाहेबांनी सांगितले होते. या मुलाला 'दूधआण्या'—म्हणून ते ओळखू व संबोधू लागले. या दूधआण्याची—श्री. नानासाहेब बोचरे (अॅड.) यांची—प्रकृती लहानपणापासून गुटगुटीत. हाच 'दूधआण्या' मारवाडी झाला होता. त्यामुळे मारवाड्याचे सोंग सजवायला जड गेले नाही. तात्यासाहेबांनी स्वतःचा कोट काढून त्याच्या पोटाला गुंडाळून वर उपरणे बांधले. ते म्हणाले, "मारवाड्याची नजर नेहमी पोटाकडे असते. तसा तू स्टेजवर वाग. आणि तू नेहमी मारवाड्याचेच सोंग करीत जा. तुला शोभून दिसते."

हा कानमंत्र घेऊन कोल्हटकरांचा 'दूधआण्या' स्टेजवर उभा राहिला आणि त्याने बहार उडवून दिली.

या मारवाड्याच्या हातात सकाळच्या दुधाच्या लोट्यासारखा लोटा होता की नाही, ते आता श्री. नानासाहेब बोचऱ्यांना आठवत नाही !

'साहित्यबत्तिशी' हे नाव कोणी सुचविले ?

तात्यासाहेब मधून मधून अशा कार्यक्रमात भाग घेत. एरव्ही त्यांचा सगळा वेळ वाचन लेखन करण्यातच जाई. वाचनाचे त्यांना इतके वेड होते की, शेवटी शेवटी दृष्टीला मंदत्व आले, तरी ते दुसऱ्या कडून वाचवून घेऊन ऐकत. त्या स्वस्ताईच्या काळात वाचनासाठी लावलेल्या मुलांना ते दरमहा १० रु. देत. शेवटी शेवटी त्यांना कै. सौ. आक्कासाहेब धोपेश्वरकर वाचून दाखवित असत. यांनीच 'सुदाम्याच्या पोह्यां'ना 'साहित्यबत्तिशी' हे अन्वर्थक नाव सुचविले होते.

'नाही बावा, मीच भडकलो'

त्या काळी त्यांच्याकडे असलेल्या मुलांनी काही थोड्या आठवणी सांगितल्या. त्या पुढे दिल्या आहेत.

एकदा रात्रीचे १०–११ वाजून गेले होते. वाचन संपले आणि मुलगा ओसरीत झोपायला गेला. जाताना कंदिलाची वात लहान करून ठेवली. उत्तर रात्री केव्हा तरी तो झोपेतून एकदम जागा झाला. पाहातो, तर आत कंदिल ढणढणा जळत होता. वात लहान करायला आपण कदाचित विसरलो असू, म्हणून तो धडपडत उठून दार उघडून आत गेला. पाहातो, तर तात्यासाहेब काही तरी लिहून राहिलेले. मुलाची धडपड पाहून त्यांनी विचारले, "का रे, काय झाले ?"

"मला वाटलं की दिवाच भडकला !" मुलाने सांगितले. तात्यासाहेब हसून म्हणाले—

"नाही, बावा. मीच भडकलो ! जा, झोप तू."

'जर ठकु मारी'

तात्यासाहेबांचा स्वभाव विनोदी होता. विनोद करून ते दुसऱ्यांना मनसोक्त हसवीत व स्वतःही मनमुराद हसत. दुसऱ्याच्या विनोदालाही ते साद देत. त्यांच्याकडे वाचणारी मुले असत वाचत असताना अभावितपणे विनोद होऊन जाई. एकदा एक मुलगा त्यांना लेख वाचून दाखवित असताना एका शब्दावर अडला. तात्यासाहेबानी त्याला पुन्हा तो शब्द वाचायला सांगितला. त्यांनाही अर्थबोध झाला नव्हता. मुलगा वाचू लागला—

'जर ठकु मारी..

तात्यासाहेबांनी जितका वेळ तो शब्द वाचायला सांगितला, तितका वेळ त्याने तो तसाच वाचला. संदर्भ लक्षात घेऊन तात्यासाहेबांनी अर्थ लावला आणि ते मनसोक्त हसू लागले. संध्याकाळी नेहमी प्रमाणे मैफल बसली असता, त्यांनी कै. काकासाहेबांना (कै केशवराव जोशी यांना) म्हटले,—

"केशवराव, एक वाक्य पुरे करा. "जर ठकु मारी" तर..." काकासाहेब गोंधळून गेले. तात्या-

साहेब काय म्हणतात ते काही लक्षात येईना. शेवटी तात्यासाहेबांनी मुलगा वाचत होता तो शब्द दाखविला. तो शब्द होता 'जरठ–कुमारी.'

मग दोघेही हसू लागले.

'मी चोरी करणार,'—

दुसऱ्याकडून वाचन करवून घेतानाही विरामचिन्हे, परिच्छेद, ऱ्हस्वदीर्घानुसारी उच्चार, खंड पाडताना योजिलेली टिंबे इत्यादी बाबतीत तात्यासाहेब दक्ष असत. त्या सगळ्यांचा उच्चार वाचकाकडून करवून घेत. 'जर' असेल तर 'जरी' वाचता कामा नये, त्यामुळे अर्थभेद होतो, हे उदाहरणासह ते वाचकाला समजावून सांगत. विरामचिन्हांनीही कसा अर्थभेद होतो, हे सांगताना त्यांनी सांगितलेले एक उदाहरण मोठे मजेशीर आहे. ते थोडक्यात असे,—

एकदा एक चोर होता. त्याने चोरी केली आणि तो पकडला गेला. त्याला कोर्टात उभे केले. न्यायाधीश सहृदय होता. चोराचा पहिलाच गुन्हा म्हणून त्याला समज देऊन सोडून देताना त्याच्याकडून 'चोरी करणार नाही' असे लिहून घ्यायचे त्याने ठरविले. चोर चांगला भाषापंडित होता. त्याने लिहून दिले. चोर सुटला.

पुष्कळ दिवस लोटले. एक दिवस पुन्हा तोच चोर चोरीच्या गुन्ह्यावरून कोर्टात हजर. "चोरी करणार नाही. केल्यास शिक्षा करावी असे तू लिहून दिले आहेस. तुला कडक शिक्षा का करू नये?" असे न्यायाधीशाने विचारले. त्या वेळी तो चोर म्हणाला, "मी लिहून दिल्याप्रमाणेच वागलो आहे."

तेव्हा न्यायाधीशाने चोराने लिहून दिलेला जबाबाचा कागद काढला व वाचला,—

"मी चोरी करणार नाही. केल्यास शिक्षा करावी."

—आणि विचारले, "हे खरे आहे?"

"होय, साहेब," चोर शांतपणे म्हणाला, "पण त्या वाक्यात स्वल्पविराम 'करणार' या शब्दानंतर दिला आहे. तेव्हा त्याचा अर्थ, "मी चोरी करणार, नाही केल्यास शिक्षा करावी," असा होतो. मी लिहून दिल्याप्रमाणेच वागलो. मला शिक्षा होऊ नये."

चोर सुटला!

असे किती तरी किस्से ते मुलांना सांगत. यावरून वाचनापेक्षाही ते लिखाणाच्या बाबतीत किती दक्षता घेत असतील, याची अटकळ बांधता येते.

लेखाच्या मध्यातून वाचून त्या लेखाचा लेखक कोण असेल, ते तात्यासाहेब चटकन सांगत. तत्कालीन नवीन लेखकांत श्री. खांडेकर व श्री. माडखोलकर यांचे लेख हजारातून ओळखता येतात, असे ते म्हणत असल्याचे त्यांना वाचून दाखविणारी मुले सांगतात.

एक प्रयोग

तात्यासाहेबांच्या स्मरणशक्तीसंबंधी पुष्कळांना माहिती आहे. सभा–संमेलनांतून ते स्मरणशक्तीचे प्रयोगही करून दाखवीत. तसाच ते आणखीही एक गणिती प्रयोग करीत. त्यांना कोणत्याही वर्षीच्या कोणत्याही महिन्याची तारीख सांगावी, त्या दिवशी असणारा वार ते चटकन सांगत.

आस्थेवाईक स्वभाव

तात्यासाहेबांचा स्वभाव शांत होता. त्यांना चिडलेले कुणी पाहिले नाही. चिडीला आलेल्या माणसालाही विनोद करून ते हसवीत. ते अंतःकरणाने प्रेमळ आणि गुणांचे चहाते होते. गुणी माणसाला पुढे आणण्यासाठी त्यांची नेहमी धडपड असे. त्यांच्या घरच्या स्वयंपाक्याला खाणावळ काढायला त्यांनी जसे उत्तेजन दिले, तसेच वाचन करणाऱ्या मुलाचे सुंदर अक्षर पाहून सबजज्जसाहेबांकडून त्याचे कौतुकही करवून घेतले आणि नोकरीसाठी खटपटही केली. त्यांच्या आस्थेवाईक स्वभावाचे एक बोलके उदाहरण श्री. अण्णासाहेब डिडोळकर यांनी सांगितले.

श्री. अण्णासाहेब त्या वेळी मॉरिस कॉलेजमध्ये शिकत होते. त्या महाविद्यालयात एकदा तात्यासाहेबांचे व्याख्यान झाले. ते रंगले. व्याख्यानानंतर त्यांच्या भोवती गर्दी जमली. सर्वसाधारणपणे साहित्यिक व्यक्तीबद्दल कुतूहल असते. त्यात त्यांच्यासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तीबद्दल किती कुतूहल असेल, ते सांगावयास नकोच. श्री. अण्णासाहेब हेही त्या गर्दीत

उत्सुकतेने सामील झाले. शिवाय तात्यासाहेब जळगाव (जामोद)चेच. पण तात्यासाहेबांपर्यंत त्यांची पोच काही लागेना. "अहो, मी जळगावचा आहे. मला त्यांना भेटायचंय," असे काहीसे ते पुटपुटले. ते शब्द तात्यासाहेबांच्या कानावर गेले असावेत. त्यांनी या मुलाला बोलावले, गप्पा केल्या आणि गावची खुशाली विचारली. पंत, मानाजीचा ओटा इत्यादी विषय झाल्यावर शेवटी भिकाभाऊबद्दलही विचारले. भिकाभाऊ म्हणजे त्या काळी जळगावात 'भिकू म्हाली' म्हणून ओळखली जाणारी एक व्यक्ती. हा कोल्हटकरांची चांगली मालिश करीत असे. त्याच्याबद्दलही गोष्टी झाल्या. विनोदासारखा संदर्भ असूनही त्यांनी तो केला की नाही, ते आठवत नाही.

तात्यासाहेब सर्वांचीच आठवण ठेवीत आणि आवर्जून सर्वांची ख्याली खुशाली विचारीत. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे क्षुल्लक का होईना, पण एकही व्यक्ती त्यांच्या स्मरणातून गळत नसे.

शेवटले दिवस

शेवटल्या दिवसात तात्यासाहेब थकले होते. त्यांना कोर्टात नेण्या-आणण्याचे काम श्री. सोनाजी हे करीत. इतर वेळात वाचूनही दाखवीत. तात्यासाहेबांना उत्तरोत्तर फारच कमी दिसायचे. कोर्टात जातांना काठीच्या आधाराने जात. हा मुलगा त्यांची काठी किंवा हात धरून चालनू लागला की ते म्हणत, "तू त्रास घेऊ नकोस. मी मागे मागे येतो. मला चांगले दिसते. तू फक्त पुढे पुढे चल."

वास्तविक त्यांना शेवटी शेवटी फार कमी दिसत असे. पण शेवटपर्यंत स्वतःचे काम स्वतःच करण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे. आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये, याबद्दल ते फार जपत. स्वतःला कितीही त्रास झाला, तरी इतरांना सांगायचेच नाही. या हट्टामुळेच कोर्टात जात असताना ते शेवटी एक दिवस पोस्टाच्या तारेच्या खांबावर आदळले. त्या वेळी त्यांना बरेच लागले. त्या घटनेनंतर ते कोर्टात उभे राहिलेले दिसत नाहीत. कोर्टात उभे राहाण्याची शेवटची तारीख २९।११।३० ही आहे. कोर्ट फी रजिस्टरवरही हीच शेवटची सही आहे. लागल्यामुळे किंवा कोर्टात जाणे अशक्य झाल्यामुळे ते घरीच होते थोडे जरी बरे वाटले असते, तरी ते कोर्टात गेले असते. पुढील कामे कै. घोपेश्वरकर यांच्याकडे सोपवून १९३० डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यात ते खामगावी गेले.

त्यांनी १९३१ ची सनद काढली होती. पण ते स्वतः कोर्टात गेले नाहीत. त्यांची सर्व कामे घोपेश्वरकरच पाहात. दि. ३१।१२।३१ ला त्यांनी जळगावचे आपले ऑफिस बंद केले. शेवटचा हिशोब दिनांक ५।२।३२ ला झाला. तसे त्यांचे जाणे येणे होतेच. दि. २।११।३२ ला सुप्रसिद्ध गायक श्री. जी. एन्. जोशी यांच्या गायनाचा कार्यक्रम येथील कै. पांडुरंगदादा पुंडलिक यांचे वाड्यात झाला. त्या वेळी तात्यासाहेब हजर होते, अशी नोंद आहे. १९३३ च्या मध्यापर्यंत त्यांचे जळगावी जाणेयेणे होते. त्या वेळपर्यंत त्यांना अर्धांगाचा दुसरा झटका आलेला नव्हता.

यानंतर एकाच वर्षाने, पुण्याला त्यांचे धाकटे बंधु श्री. अण्णासाहेब यांचेकडे असतानाच, मृत्यूपूर्वी ८ दिवस अगोदर, त्यांना अर्धांगाचा दुसरा जोरदार झटका आला आणि दि. १ जून १९३४ ला सकाळी ६ वाजता तात्यासाहेबांचा आत्मा नश्वर देह सोडून पंचत्वात विलीन झाला. त्या वेळी त्यांच्या आत्म्याने त्या जन्मभर व्याधिग्रस्त असलेल्या जर्जर देहाकडे पाहून हसत हसत निश्चितपणे म्हटले असेल,—

"सुटलो बाबा, एकदाचा तुझ्या तडाक्यातून !"

'चरित्र लिहिण्याची वेळ अजून आली नाही'

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकावरील परीक्षण

—श्री. पुणेकर

[मुंबईचे विख्यात संपादक आणि प्रकाशक श्री. ह. वि. मोटे यांनी प्रकाशित केलेले आणि आचार्य अत्रे यांची ५० पानांची विस्तृत प्रस्तावना असलेले 'अप्रकाशित गडकरी' हे पुस्तक ता. २३ जानेवारी १९६२ रोजी प्रसिद्ध झाले. श्री. मोटे यांनी 'तरुण भारता'कडे त्याची प्रत आगाऊ अभिप्रायार्थ पाठवली होती. तदनुसार नागपूरचे प्रमुख टीकाकार प्रो. भा. श्री. परांजपे यांनी लिहिलेले या पुस्तकाचे समालोचन, रविवार ता. २१ जानेवारी १९६२ च्या 'तरुण भारता'च्या साप्ताहिक अंकात, आले. हे समालोचन ४ कॉलम असून, ते ३ आणि ५ अशा दोन पानांवर छापलेले होते. प्रो. परांजपे यांनी त्याच्या पहिल्या प्रास्ताविक परिच्छेदाला, "पण चरित्र मात्र लिहिले गेले नाही," असा सूचक मथळा दिलेला होता.

या समालोचनाच्या निमित्ताने मुंबईचे अग्रगण्य नाटचेतिहासमर्मज्ञ आणि पत्रकार श्री. पुरुषोत्तम रामचंद्र लेले यांनी, 'पुणेकर' हे टोपण नाव घेऊन, लिहिलेला लेख, 'तरुण भारता'च्या रविवार ता. ११ मार्च १९६२ च्या साप्ताहिक अंकात आला. हा लेख ५ कॉलम असून, तो पान ३ वर संपूर्ण छापलेला होता. श्री. लेले यांनी दिलेले मुख्य मथळे आणि पोटमथळे कायम ठेवून हा लेख जसाच्या तसा खाली उद्धृत केलेला आहे.

मुंबईच्या 'ललित' मासिकाच्या फेब्रुवारी १९७० च्या अंकात नवीत पिढीतील नामांकित कादंबरीकार श्री. जयवंत दळवी यांनी घेतलेली श्री. वि. स. खांडेकर यांची मुलाखत प्रसिद्ध झाली होती. तीत श्री. खांडेकर यांनी अशी विधाने केलेली होती की, "मी दोन वर्षे पुण्याला असताना वरचेवर गडकऱ्यांकडे जात होतो. तेव्हा अत्रे तिथं कधीच दिसले नाहीत. . . . वऱ्यावापू कमतनूरकरसुद्धा, अत्रे गडकऱ्यांकडे कधी आले नव्हते, असे सांगायचे.". त्यानंतर एप्रिल १९७० च्या 'ललित'च्या अंकात आलेल्या आपल्या मुलाखतीत श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी, मुंबईच्या 'मराठा'दैनिकात श्री. खांडेकर यांच्या या विधानांवर आलेल्या टीकेसंबंधी श्री. दळवी यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना, असा खुलासा केला की, "...गडकरी आणि अत्रे यांचे निकट संबंध होते, ही समजूत फारशी बरोबर नसल्याचे प्रथम कोल्हटकरांच्या बोलण्यात आले. त्यानंतर वरेरकर, चिंतामणराव कोल्हटकर, पु. रा. लेले वगैरेंच्या तोंडून तर मी असे ऐकले की, अत्र्यांचा गडकऱ्यांशी कधीच निकट संबंध नव्हता. 'अप्रकाशित गडकरी' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर लेल्यांनी, 'पुणेकर' या टोपण नावाने, 'तरुण भारता'त जे त्याचे परीक्षण लिहिले, त्यात गडकरी आणि अत्रे यांचे निकट संबंध नव्हते, असे म्हटले होते. आणि लेखाचा एकंदर कलही अत्र्यांना प्रतिकूल होता. पण, लेल्यांनी मला ग्वाही दिल्याप्रमाणे, अत्र्यांनी 'मराठ्या'तून या परीक्षणाला अजिबात उत्तर दिले नाही. याचे मला नवल वाटले."

गडकरी–अत्रे संबंधावर बोधप्रद प्रकाश पाडणारा श्री. लेले यांचा हा लेख पुन्हा प्रकाशित करण्यात यावा, अशा सूचना मला अनेक साहित्यसंशोधकांनी आणि टीकाकारांनी केल्या; व काही नियतकालिकांनी तर तो प्रसिद्ध करण्याचीही उत्सुकता दर्शविली. म्हणून, हा लेख 'युगवाणी'च्या या अंकात मुद्दाम दिलेला असून, 'अप्रकाशित गडकरी' हे पुस्तक व कोल्हटकर, गडकरी आणि अत्रे यांचे संबंध यांच्यावर प्रकाश पाडणारी श्री. लेले यांची १२ पत्रेही या लेखानंतर दिलेली आहेत. **—ग. त्र्यं. माडखोलकर**]

अनुक्रमणिका

प्रा. भा. श्री. परांजपे यांचे साप्ताहिक 'तरुण भारत'च्या ता. २१ जानेवरीच्या अंकात प्रसिद्ध झालेले 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकावरील समीक्षण वाचून आणि त्यातल्या त्यात "पण चरित्र मात्र लिहिले गेले नाही," हा मथळा वाचून काही मजकूर प्रसिद्धीकरिता लिहावयास बसलो.

कै. गडकरी यांचे कॉलेजजीवन

मी कोण ? कै. रामराव गणेश गडकरी यांचे बरोबर सन १९१२ साली इंटरमीजिएट क्लासमध्ये फर्गुसन कालेजमध्ये अभ्यास करण्याचा मान मला लाभला होता. गडकरी आमच्या क्लासमधे आहेत असे सांगताना आम्हाला फार आनंद होत असे. त्यांचे 'प्रेमसंन्यास, नाटक महाराष्ट्र नाटक मंडळी बसवीत होती ही बातमी सर्व विद्यार्थ्यांच्या कानावर आलेली होती. 'गोविंदाग्रज' कवी म्हणजेच गडकरी हेही सर्व विद्यार्थ्यांना माहीत झाले होते. गडकरी जरी वर्गात आमच्यासारखेच बाकावर बसणारे विद्यार्थी होते, तरी वर्गाच्या बाहेर त्यांच्याशी प्रोफेसर लोक बरोबरीच्या नात्याने वागत. गडकरी तीन प्रोफेसरांची लेक्चर्स ऐकावयास बसत : (१) रँग्लर परांजपे, (२) प्रो. भाटे आणि (३) प्रो. पटवर्धन. बाकीच्या प्रोफेसरांच्या वर्गात हजिरीपुरते ते बसत.

त्यांच्या तोंडून प्रथम इब्सेनचे नाव ऐकले

प्रो. वा. ब. पटवर्धन त्या वेळी एक नाटक लिहीत होते. त्या नाटकानिमित्त ते गडकऱ्यांशी अनेक वेळा गप्पा मारीत, चर्चा करीत. हे नाटक पुरे झाल्यावर गडकऱ्यांच्या ओळखीने त्याचे वाचन 'भारत नाटक मंडळी'त झाले. ते फारच विस्कळीत होते आणि पहिल्या अंकांत आलेली पात्रे सगळीच पुढेपर्यंत टिकून राहिली नव्हती, अशी बातमी गडकऱ्यांनीच आम्हाला दिली. प्रयोगक्षम नसल्यामुळे ते नाटक रंगभूमीवर आले नाही. पण, त्याच्याबद्दल माहिती देताना गडकऱ्यांनी आम्हाला 'इब्सेन'चे नाव ऐकवले. तत्पूर्वी आम्ही ते नाव ऐकले सुद्धा नव्हते.

अधिकृत चरित्र कोण लिहू शकेल ?

गडकऱ्यांचे अधिकृत चरित्र लिहिले गेले नाही याबद्दल प्रा. परांजप्यांनी खेद व्यक्त केला आहे. मला यात खेद करण्याजोगे काही वाटत नाही. उलट पक्षी, अत्र्यांनी गडकऱ्यांचे चरित्र लिहावे अशी प्रा. परांजपे यांची सूचना असेल, तर ती मात्र 'खेदाची गोष्ट' ठरण्याचा बराच संभव आहे.

आपल्या महाराष्ट्रात अजून 'विभूतिपूजा' घरणे धरून बसली आहे आणि कठोर 'सत्यान्वेषण' दुर्मिळ आहे. संशोधनवृत्ती, अचूकपणाची आवड आणि चरित्रविषयाबद्दल आपुलकी या तीन गुणांचे एकत्र वास्तव्य ज्या व्यक्तीमध्ये असेल, तीच व्यक्ती अधिकृत चरित्र लिहू शकेल.

अत्रे स्वत: विभूतिपूजक आहेत आणि साहित्यिकांमध्ये अत्र्यांची विभूतिपूजा होत असते. त्यांच्या अंगी संशोधनवृत्ती नाही आणि अचूकपणाची आवड नाही. विषयासंबंधीचा आपलेपणा हा सुद्धा सिद्ध करता येण्याजोगा नसून श्रद्धेचा भाग होऊन बसला आहे.

मृत्यूनंतर लगेच माहिती जमा का केली नाही ?

'गडकऱ्यांचे पट्टशिष्य अत्रे' असा शब्दसमुच्चय मी वाचतो, त्या वेळी माझ्यापुढे एक प्रश्न नेहमी उभा रहातो, या दोघांचा निकट सहवास किती दिवस आला आणि गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर लगेच अत्र्यांनी गडकऱ्यांबद्दल माहिती जमा करून का ठेवली नाही ?

गडकरी सन १९१९ च्या जानेवारीच्या तेवीस तारखेला वारले. अत्रे त्या वेळी बी. ए. च्या वर्गात होते. मार्च किंवा एप्रिलमध्ये त्यांची परीक्षा झाली असली पाहिजे. तदनंतर, रिझल्ट लागेपर्यंतच्या मुदतीत अत्र्यांनी सगळ्या माहितीची जुळवाजुळव आणि संशोधन का केले नाही ? त्या वेळी ही माहिती मिळवणे अगदी सोपे नव्हते का ? गडकऱ्यांशी ज्यांचा ज्यांचा संबंध आला त्या त्या सर्व व्यक्ती त्या वेळी हयात होत्या व त्यांच्या स्मृती ताज्या होत्या. नंतर अत्र्यांनी लोकांना भासवले तितका गडकऱ्यांशी त्यांचा निकट सहवास असता, तर या गोष्टी निश्चितपणे होऊ शकल्या असत्या.

गडकऱ्यांच्या जिवंतपणी या दोघांचा कसल्या प्रकारचा संबंध होता ह्याची चुणुक दाखवणारा एक लहानसा प्रसंग मी येथे वर्णन करतो ! कोणा एकाने अत्र्यांना ज्या वेळी प्रथम गडकऱ्यांकडे नेले, त्या वेळचे गडकऱ्यांचे वाक्य असे होते, —

"ही काळी वादी माझ्याकडे कशाला आणलीस ?"

गडकऱ्यांच्या शिक्षणक्रमासंबंधी तरी अचूक माहिती शिक्षकाचा पेशा पत्करलेल्या अत्र्यांनी मिळवली पाहिजे होती की नाही ? आणि असलेली माहिती मांडताना जराशी काळजी घेतली पाहिजे होती की नाही ?

आचार्यांची विधाने

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या नवव्या (९) पृष्ठावर अत्रे काय लिहितात ?

(१) "गडकरी हे बहुधा १९०५ साली म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा पास झाले असावेत—" इति अत्रे.

या वाक्यावरून स्पष्ट होते, ते हे की, गडकरी मॅट्रिक कधी पास झालेलेही अत्र्यांनी निश्चिपणे समजून घेण्याची तसदी घेतली नाही. यात लेखनाची संगति तरी किती आहे ? त्या काळात मॅट्रिकची परीक्षा फक्त नोवेंबर महिन्यात होत असे. १९०५ च्या नोवेंबर महिन्यात गडकऱ्यांना एकविसावे वर्ष चालू होते, कारण गडकऱ्यांचा जन्म सन १८८५ च्या मे महिन्यांत झाला. वस्तुस्थिती अशी होती की, गडकरी मॅट्रिकची परीक्षा १९०४ मध्ये पास झाले.

(२) "१९११ साली पुन्हा त्यांनी आपल्या उच्च शिक्षणास प्रारंभ केला आणि फर्ग्युसन कॉलेजात नाव नोंदवले,—" इति अत्रे.

अत्र्यांनी हे विधान केवळ आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर केले आहे. वस्तुस्थिती अशी की, सन १९०५ साली गडकऱ्यांनी फर्ग्युसन कॉलेजातील प्रीव्हियसची हजिरी दिली होती आणि त्यांना १९११ साली नाव नोंदवण्याची जरूर नव्हती.

(३) "१९१२ साली वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी ते प्रीव्हियसची परीक्षा उत्तीर्ण झाले,–" इति अत्रे.

वस्तुस्थिती म्हणजे धडफळे, गडकरी आणि मी सन १९११ साली प्रीव्हिअस परीक्षा उत्तीर्ण झालो. वरील विधान करताना अत्र्यांनी 'अप्रकाशित गडकरी' याच ग्रंथात प्रकाशित केलेली 'इंटरमीजिएट' परीक्षेच्या फीची पावती विचारात घेतली नाही, हे स्पष्ट होते. त्या पावतीवर तारीख ३०।९।१२ ही आहे. ज्याची इंटरमीजिएट परीक्षा १९१२ साली व्हावयाची, तो १९१२ साली प्रीव्हिअस पास होऊ शकत नाही. त्या मुदतीत वर्षातून दोनदा परीक्षा होत नव्हत्या. अत्र्यांच्या असल्या लिखाणावरून त्यांची लेखनवृत्ति दिसून येते.

कल्पनाविलासाचा एक नमुना

आणखी एक कल्पनाविलास अत्र्यांनी या पुस्तकाच्या पृ. १४ वर खेळवला आहे. त्या पृष्ठावर तळटीप आहे ती अशी आहे :

"या घराचे मालक श्री. केशवराव सिन्नरकर यांनी परवा आम्हाला सांगितले की, "गडकरी प्रथम आले तेव्हा त्यांना अवघे तीन रुपये भाडे होते. त्यांची सांपत्तिक परिस्थिती जशी जशी सुधारत गेली, तसे तसे त्यांनी आपण होऊनच आपले भाडे महिना सत्तावीस रुपयांपर्यंत वाढवीत नेले, "

सन १९१८ साली पुण्यात दरमहा सत्तावीस रुपये भाडे केवढ्या घराला पडत असे आणि ते घर कोणत्या दर्जाचे असे, हे अत्र्यांना माहीत तरी नसले पाहिजे किंवा अत्रे अजीबात विसरून गेले असले पाहिजेत.

विभूतिपूजेचा हा एक मासलाच आहे. इंग्लंडमधील गोल्डस्मिथवर अत्यंत प्रेम करणारे भक्त असल्या कल्पनाचित्रांच्या मागे लागत नव्हते. बायरन, शेले, गोल्डस्मिथ यांच्या काव्याचे मोल करूनही त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचे सत्यचित्रण इंग्लंडमध्ये केले जाते. आपल्या देशात आणि विशेषेकरून महाराष्ट्रात सत्य हे विभूतिपूजेखाली लपविण्यात येत असते, याचाच पुरावा अत्र्यांनी पृ. १४ वरील तळटीपेत दिला आहे.

गडकरी दारू पीत नव्हते असे सांगण्याचा जसा प्रयत्न करण्यात येतो, तसाच हाही एक उद्योग आहे.

अचूकपणा—एक मासला

अत्र्यांच्या अचूकपणाचा आणखी एक मासला पहा. पृ. १२ वर अत्रे लिहितात,—

"१९१७ च्या नोवेंबर महिन्यात जरी 'एकच प्याला' नाटक गडकऱ्यांनी लिहून पुरे केले असले, तरी ते गंधर्व नाटकमंडळीच्या रंगभूमीवर गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर दहा अकरा महिन्यांनी आले."

वस्तुस्थिती कशी आहे ते आता पहा.

गडकऱ्यांचा मृत्यु ता. २३-१-१९१९ रोजी झाला. 'एकच प्याला' नाटकाचा पहिला खाजगी प्रयोग बडोद्यास राजवाड्यात १९१९ च्या फेब्रुवारीत झाला, व त्या नाटकाचा पहिला जाहीर प्रयोग पुणे शहरी ता. २०–२–१९१९ रोजी झाला. म्हणजे गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर एका महिन्याच्या आत 'एकच प्याला' नाटकाचे दोन प्रयोग झाले.

कोल्हटकरांचे नाव नाही

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकाच्या १६ आणि १७ पृष्ठांवर गडकऱ्यांच्या वाचनाचा आणि अभ्यासाचा आराखडा दिलेला आहे. त्यांत "विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेची त्यांनी अनेकदा आवर्तने केली होती," असे वाक्य आहे. विशेष सांगावयाचे म्हणजे याच्या जोडीला किंवा या यादीत कोठेही श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नाव नाही. आमच्या तीन वर्षांच्या सहवासात गडकऱ्यांच्या तोंडून विष्णुशास्त्र्यांचे नाव केव्हा तरी एकादे वेळी ऐकले असेल; तर कोल्हटकरांचे नाव गडकऱ्यांच्या तोंडून ऐकले नाही असा त्यांच्या भेटीचा एक सुद्धा दिवस जात नव्हता.

"कोल्हटकरांची पहिली चार नाटके मला तोंड पाठ येतात," असे गडकरी नेहेमी प्रौढीने म्हणत. मेकॉलेचे उदाहरण घेऊन गडकरी म्हणत, "मिल्टनचे ग्रंथ नाहीसे झाल्यास मी संबंध मिल्टन पुनः लिहून काढीन असे मेकॉले म्हणत असे. कोल्हटकरांची चारही नाटके नाहीशी झाल्यास हा गडकरी ती सर्व जशीच्या तशी लिहून काढून महाराष्ट्राला अर्पण करील." अशा ग्वाहीची एक आठवण कै. घडफळे इंजिनीयर यांनी प्रसिद्ध केलेली आहे. ती 'यशवंत' मासिकाच्या फेब्रुवारी १९४१ च्या अंकांत प्रसिद्ध झाली. त्या आठवणींतील उतारा १९४४ साली फेब्रुआरी महिन्यात 'समीक्षक'च्या खास अंकात स्वतः अत्र्यांच्या संपादनाखाली प्रसिद्ध झाला होता. गडकऱ्यांचा व घडफळ्यांचा किती निकट संबंध होता, हे अत्र्यांनी स्वतः याच पुस्तकात दहाव्या पृष्ठावर नमूद केले आहे. कोल्हटकरांच्या चार नाटकांच्या अभ्यासाच्या मानाने निबंधमालेची आवर्तने किती तरी कमीच पडली असतील. असे असून अत्र्यांनी त्या अभ्यासाचा उल्लेख केलेला नाही.

'नवयुग'मध्ये अत्र्यांनी काय लिहिले होते?

अत्र्यांनी स्वतः 'नवयुग' मध्ये लेख लिहून काय म्हटले आहे ते पहा. सन १९६० च्या दीपावली अंकात "गडकऱ्यांचा विनोद" हा अत्र्यांचा सहीशिक्यानिशी, प्रसिद्ध झालेला लेख आहे. त्यात पुढील वाक्ये आहेतः–

"गडकऱ्यांच्या सर्वच लिखाणावर कोल्हटकरांची गडद छाया पडली आहे......विनोदाच्या क्षेत्रात गडकऱ्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा फारसा आविष्कार होऊ शकला नाही...गडकऱ्यांची नाटके आणि कविता वाचताना कोल्हटकरांची विशेष आठवण होत नाही. पण त्यांचा विनोद वाचताना मात्र पावलोपावली कोल्हटकरांचे स्मरण होते. कोल्हटकरांच्या छायेतून फारच थोड्या ठिकाणी गडकरी बाहेर पडलेले आढळतात. कोल्हटकरांनी आपल्या विनोदाचे एक स्वतंत्र तंत्र निर्माण केले होते. त्याचेच पुष्कळसे अनुकरण गडकऱ्यांनी केले. कोल्हटकरांच्या टाकसाळीत निर्माण झालेली त्यांची विशिष्ट भाषा, वाक्यांची ढब, शब्दांचे श्लेष अगदी त्यांच्या क्लिष्टतेपर्यंत गडकऱ्यांनी सही सही उचलले."

तदनंतर अत्र्यांनी 'मराठी रंगभूमीचा ऱ्हास का झाला' या मथळ्याची लेखमाला प्रसिद्ध केली. त्या मालेतील दुसरा लेखांक ता. १८–१२–१९६०च्या नवयुगाच्या अंकात प्रसिद्ध झाला. त्यात अत्रे लिहितात,—

"कोल्हटकर झाले नसते तर गडकरी निपजलेच नसते. कोल्हटकरांच्या नाटकांचा गडकऱ्यांच्या नाटचलेखनावर जबरदस्त शिक्का आहे, हे आमच्यासारख्या गडकऱ्यांच्या कट्टर भक्तांनाही नाकबूल करता यावयाचे नाही... कोल्हटकरांचे काव्य आणि विनोद हा त्या मानाने कूट आणि क्लिष्ट होता. त्याच्याच रोपाला गडकऱ्यांनी आपल्या लोकोत्तर प्रतिभेचे कलम बांधून महाराष्ट्र रंगभूमीवर काव्याच्या नी विनोदाच्या नवकुसुमांची बेहद्द बरसात केली."

गडकऱ्यांची गुरुभक्ती

घडफळ्यांइतका गडकऱ्यांचा निकट सहवास मला लाभला नव्हता. पण, सन १९१२ साली गडकऱ्यांचे वाङ्मयविषयक विचार ऐकण्याची संधी ज्यांना अनेक वेळा लाभली, त्यामध्ये मी होतो. कोल्हटकरां-

बद्दल बोलू लागल्यावर गडकरी असे अवसानात येत असत की, काही काही वेळा आमची त्यामुळे करमणूक होत असे. नाटक किंवा विनोद याबद्दल चर्चा सुरू झाली, म्हणजे कोल्हटकरांचे नाव गडकऱ्यांच्या तोंडून निघाले नाही, असे होतच नसे. त्यातून 'मूकनायक' नाटकाबद्दल बोलताना त्यांना फारच स्फुरण चढत असे. ते तीन नाटकांची तुलना करीत. त्यांची मला वारंवार आठवण येते.--त्राटिका, बायकांचे बंड आणि मूकनायक--या तीन नाटकांचा एकच विषय आहे असे ते प्रतिपादन करीत आणि त्यात 'मूकनायक' श्रेष्ठ आहे असे आम्हाला पटवण्याचा प्रयत्न करीत. आम्ही कोणी निराळा सूर काढला, तर म्हणत, "तुम्हाला ते समजायला जन्म खर्चावा लागेल." गडकरी वर्गातून बाहेर पडले म्हणजे विद्यार्थ्यांचा घोळका त्यांच्याबरोबर उभा रहावयाचा किंवा चालू लागावयाचा. असे करण्यात त्या वेळच्या आम्हा विद्यार्थ्यांना अभिमान वाटे.

अत्र्यांनी कोल्हटकरांचा गडकऱ्यांचे गुरु म्हणून उल्लेख केला आहे, नाही असे नाही. पण गडकऱ्यांवर कोल्हटकरांच्या लेखनाचा झालेला जो परिणाम नवयुग-मधील दोन लेखांत त्यांनी स्वतः वर्णिला आहे, त्याचा मागमूसही 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नाही.

प्रा. भ. श्री. पंडित यांची विभूतिपूजा

गडकरी प्रतिभासंपन्न होते, यावद्दल वाद नाही. पण, हल्ली मी पहातो की, त्यांच्या विभूतिपूजेच्या भावनेने, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्या प्राध्यापकांना ग्रासून टाकले आहे. अशी परिस्थिती असताना गडकऱ्यांचे 'सत्य' चरित्र लिहावयाची हिंमत कोणीही धरणार नाही. एक दोन उदाहरणे देऊन मला काय म्हणावयाचे आहे ते स्पष्ट करतो. दोनही उदाहरणे विदर्भातीलच आहेत आणि विदर्भातील उदाहरणे मी मुद्दामच घेत आहे.

प्रा. भवानीशंकर पंडित यांनी गडकऱ्यांबद्दल पुष्कळ लिहिले आहे किंवा त्यांनी वक्तृत्व केले आहे. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे,—

"पुण्यप्रभावाचे लेखन चालू असताना तर ते अक्षरशः चहा व चिवडा यावर दिवस काढीत होते!"

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकातील चौदाव्या पृष्ठातील तळटीप आणि पंडितांचे हे वचन ही बुद्धीपेक्षा विभूतिपूजेच्या भावनेतून निर्माण झाली आहेत.

प्रा. पंडितांचे विधान (१) चुकीचे, (२) खोटे आणि (३) बेजबाबदारीचे आहे, असे बौद्धिक भूमिके-वरून सिद्ध करता येईल.

(१) हे विधान चुकीचे आहे. कारण गडकरी चिवडा खात नसत. भेळ उर्फ भल्ला खात असत. या भेळीचे खुसखुशीत वर्णन 'बहुरूपी' पुस्तकात सापडेल.

(२) पुण्यप्रभाव नाटकाचे लेखन नाटकमंडळी-च्या बिऱ्हाडी झालेले होते आणि नाटक मंडळीत जेवणाच्या पंक्तीला बसावयास गडकऱ्यांना कोणीही मनाई करू शकत नव्हता. एकादा दिवस चहा आणि भेळ खाऊन ते लिहीत, ते खुषीने, — म्हणजे जेवणासाठी वेळ खर्च होऊ नये व जेवणाची सुस्ती येऊ नये म्हणून.

(३) प्रा. पंडितांच्या सारख्याने सर्व बाजूंनी तपासणी न करता एखादे अतिरेकी व एकांगी विधान करावे, हे बेजबाबदारीचे प्रत्यक्ष प्रमाण आहे.

बुद्धि वापरली नाही

दुसरे उदाहरण प्रा. परांजपे यांचेच घेतो. अत्र्यांची प्रस्तावनासुद्धा प्राध्यापकांनी बुद्धीला गौण स्थान देऊन वाचलेली आहे. जर बुद्धिप्रधान वृत्तीने ती प्रस्ता-वना वाचली असती, तर 'गर्वनिर्वाण' नाटकाबद्दल पृ. १७ वर अत्र्यांनी लिहिलेल्या मजकुराची गडकऱ्यांनी मुजुमदारांना ता. २५-३-१९१० रोजी लिहिलेल्या पत्रातील मजकुराशी व टेंब्यांनी गडकऱ्यांना ता. १६-११-१९१५ रोजी लिहिलेल्या पत्रातील मजकु-राशी संगती जुळते का, असा प्रश्न प्राध्यापकांनी केला असता. तसेच 'गडकरी आणि मद्यपान' याबद्दल प्राध्यापक परांजप्यांनी 'तरुण भारत'मधील लेखात लिहिलेला मजकूरही विभूतिपूजेच्या भावनेतूनच निर्माण झालेला आहे. सन १९२० पूर्वीच्या कालात कायस्थ प्रभु समाजात मद्यपानाबद्दल काय भावना होती, हे प्राध्यापकांनी अभ्यासण्याचा प्रयत्न तरी केला आहे काय ?

सत्य चरित्र लिहिण्याची वेळ अद्याप आली नाही

या गोष्टींचा उल्लेख मी एवढ्याचकरता करतो की, गडकऱ्यांचे सत्य चरित्र लिहावयाचा काल अजून आलेला नाही, हे मला सांगावयाचे आहे. प्रो. हाल्डेन याने आपल्या शास्त्रज्ञांना 'पोलाइट' हे विशेषण बहाल केले आहे. हे विशेषण आपल्या समाजातील पुष्कळ लोकांना लावण्याजोगे आहे. "सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।।" हा दंडक आपण पाळतो. 'अप्रियस्य च सत्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।' हा सिद्धांत पूर्णपणे खरा आहे. असा दुर्लभ वक्ता जेव्हा पुढे यावयास धजेल, त्याच वेळी गडकऱ्यांचे खरे चरित्र लिहिले जाईल. सध्या 'कच्चा माल' लोकांपुढे येत आहे, तेवढ्यावर गडकरीभक्तांनी संतुष्ट रहावे, हेच इष्ट आहे.

श्री. पु. रा. लेले यांची पत्रे

वर उद्धृत केलेल्या श्री. लेले यांच्या लेखाला पूरक असलेली त्यांची १२ पत्रे पुढे दिलेली आहेत. ती देताना श्री. लेले यांनी काही संबंधित व्यक्तींविषयी केलेली अनुचित आणि अप्रशस्त विधाने व वापरलेले शब्दप्रयोग आणि शब्द मी गाळलेले आहेत. त्यांपैकी बहुतेक विधाने वास्तव आहेत, अशी खात्री देणारा प्रत्यंतर पुरावा मला उपलब्ध आहे. तरी सुद्धा सद्य:स्थितीत मला ती प्रकाशनार्ह वाटली नाहीत. ही गाळासाळ सोडल्यास अन्य कोणत्याही प्रकारचा फरक या पत्रात केलेला नाही. श्री. लेले हे पत्रांत विरामचिन्हे सामान्यत: वापरीत नसत. तीसुद्धा दिलेली नाहीत.

ग. त्र्यं. माडखोलकर

ता. ९–१–६२
पाच वाजता
ताराबाग, मुंबई–४

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
स. न. वि.

आपले ता. ५ चे कार्ड काल मिळाले. काल माझा लेखनाचा दिवस होता. शिवाय आपला मुक्काम आज मुंबईत असावयाचा होता.

माझे ३–१ चे पत्र म्हणजे गडकऱ्यांसंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ज्यात होती ते असले पाहिजे.

याशिवाय माझी दोन मोठी पत्रे आपणास मिळाली असली पाहिजेत. त्यातील एक (ज्यात श्री. काळचांच्या पत्रांच्या नकला होत्या) अगोदर मिळाले असले पाहिजे आणि दुसरे आपण दौऱ्यावर असताना आपल्या घरी जाऊन पडले असले पाहिजे. त्यात छापण्यासाठी काही मजकूर लिहिलेला होता.

आपल्या ता. ५ च्या कार्डात आपल्या मुंबईतील ९ तारखेच्या मुक्कामाचा तपशील आहे. सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ६ ते ८ आपण सरदार गृहात मोकळे असाल असे आहे. या दोहोंपैकी सायंकाळच्या वेळात मला सरदारगृहात येऊन त्रास सोसून का होईना भेटता आले असते. पण इतका त्रास सोसून मी आलो असतो तरी काहीही चर्चा करणे शक्य झाले असते असे मला वाटत नाही. मजपेक्षा तरुण, कार्यक्षम, सामर्थ्यवान आणि कार्याच्या दृष्टीने अधिक निकटचे असे आपले स्नेही त्या कालात भेटावयास आल्याशिवाय राहणार नाहीत. केवळ या कारणाने मी आपणाकडे येऊन भेटण्याचा प्रयत्न केला नाही. याबद्दल आपण मला क्षमा करावी.

आपण मला भेटावयास यावे अशी मी अपेक्षा क्वचितच करतो. पण आपल्या प्रश्नपत्रिकांची दिलेली उत्तरे माझ्या दृष्टीने मुलाखतीच्या अभावी अपुरी असतात. प्रश्नपत्रिका या नेहमी काही तरी उद्देश बुद्धीपुढे ठेवून तयार करण्यात येतात. केवळ माहिती मागण्याचा जरी वरवर उद्देश दिसतो तरी त्या माहिती मागण्यामागे उद्देश निराळाच असतो. माहिती न देणे हे आपल्यापुरते तरी मला शक्य नाही. माहिती दिल्यावर असे दर समयाला वाटते की, प्रत्यक्ष बोलणे न होता दिलेल्या या माहितीचा इष्ट तो परिणाम होत नसावा. गडकऱ्यांबद्दल मी जी माहिती दिली आहे त्यातील थोडयाशा ओळी मी दाखवल्या आहेत. त्यातील मजकूर खाजगी व तो आपण वापरता कामा नये, इतकेच नव्हे तर तो वापरावयास परवानगी सुद्धा मागता कामा नये. बाकीचा मजकूर आपण माझे शब्द कायम ठेवून केव्हाही वापरात आणू शकता.

गडकऱ्यांइतकी विभूतिपूजा दुसऱ्या कोणाही लेखकाच्या वाटयास आली आहे असे मला दिसत नाही. अत्र्यांची प्रस्तावना 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकात आपणास वाचावयास मिळेल. त्या प्रस्तावनेत

वैयक्तिक मजकूर सत्याला सोडून आहे. काही मासले मी आपणास कळवीन. पण गडकऱ्यांबद्दलची विभूति-भावना फार जोराची आहे हे आपण कबूल कराल असे वाटते.

सुरुवातीस उल्लेखिलेली सर्व पत्रे आपल्या हाती पडली ना ?

क. लो. अ. हे वि.

पु. रा. लेले

१६।१।६२
ताराबाग, मुंबई ४

Confidential

BLITZ PUBLICATIONS Pt. Ltd.
Asia's Foremost News Magzine
Editor : R. K. Karanjia

खाजगी

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
सप्रेम नमस्कार.

आपले ता. ११-१ चे कार्ड पोहोचले.

आपण कितीही प्रश्न विचारावयास धनी आहात. मात्र प्रत्यक्ष संभाषणाशिवाय उत्तरातून नीट चित्र उभे रहात नाही.

वाशीमकर संगीत मंडळीसंबंधीचा मजकूर प्रसिद्ध झालेला पाहिला. आभार.

आज या पत्रद्वारे एक विनंती करणे आहे. त्याचे उत्तर पाकिटातून पाठवावे.

मोटयांनी 'अप्रकाशित गडकरी' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे आणि अत्र्यांच्या खास सांगण्यावरून एक प्रत मोटयांनी मला दिली. औपचारिक प्रकाशन ता. २३।१ रोजी होईल. मी त्या पुस्तकाबद्दल थोडासा मजकूर लिहून 'अलमगीर' मध्ये प्रसिद्धीस पाठविला आहे. तो मजकूर माझ्या नावे प्रसिद्ध होईल. त्या मजकुरात अत्र्यांना मी दोन चिमटे घेतले आहेत.

त्यांपैकी दुसरा चिमटा मला 'तरुण भारत' मध्ये विशद करून सांगावयाचा आहे. मात्र तो मजकूर कोणत्या तरी टोपण नावाखाली प्रसिद्ध झाला पाहिजे.

नवयुगमध्ये अत्र्यांनी दोन वेळी असे निश्चितपणे लिहिले होते की, गडकऱ्यांच्या विनोदावर कोल्हटकरांचा प्रभावी शिक्का पडला आहे आणि कोल्हटकरांव्यतिरिक्त असा गडकऱ्यांचा विनोद नाही. आणखी लिहिले होते की, नाटककार गडकरी झालेच नसते, जर कोल्हटकर अगोदर झाले नसते. यांपैकी एक उल्लेख माझ्या 'तरुण भारत' मध्ये प्रसिद्ध झालेल्या गडकऱ्यांवरील लेखात अगदी सुरुवातीलाच उद्धृत केला होता असे स्मरते.

आता प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाला अत्र्यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे तिजमध्ये हे ऋण मुळीच उल्लेखिले नाही. ही विसंगती जगाला दिसली पाहिजे. कारण ही विसंगती तर आहेच शिवाय कोल्हटकरांबाबतीत अन्याय आहे. म्हणून ही विसंगती मी तपशीलवार दाखवून देऊन अत्र्यांना सवाल करणार आहे. मात्र टोपणनावाने. आपली प्रतिक्रिया कळवावी. क. लोभ वाढवावा.

पु. रा. लेले

स. न. वि. ५-२-६२
ताराबाग

आपले कार्ड व सविस्तर पत्र पोचली.

नवयुगच्या कालच्या अंकात माझे अत्र्यांना लिहिलेले खाजगी पत्र प्रसिद्ध झाले आहे. तारखांच्या चुका त्यात मी दाखविल्या आहेत.

माझा 'पुणेकर' या सहीचा लेख आपण छापावयास तयार आहा की नाही हे आपल्या सविस्तर पत्रावरून मला समजले नाही. माझ्या लेखात तारखांच्या चुका दाखविण्यापेक्षा महत्वाचा मुद्दा म्हणजे हल्लीचा काल गडकऱ्यांचे वास्तव चरित्र लिहावयास अनुकूल नाही हे दाखवण्याचा आहे.

माझा लेख आपण छापणार नसाल तर मेहेरबानी करून तावडतोब परत पाठवावा. एका मासिकाच्या संपादकाची मजकडे 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकावर लेखाची मागणी आहे. थोडासा तांत्रिक बदल करून हा लेख मी त्यांना देऊ शकेन. माझे लेखनाचे श्रम फुकट जाणार नाहीत. उत्तर यावे.

आपल्या सविस्तर पत्राचे उत्तर गुरुवारी लिहीन.

क. लो. अ. हे वि.

पु. रा. लेले

५।२।६२
ताराबाग
स. न. वि. ४ वाजता

आपल्याला सकाळी कार्ड लिहून टाकल्यावर आपले लेखासंबंधी खुलाशाचे पत्र मला मिळाले.

माझा लेख आपण 'पुणेकर' या सहीनेच छापला पाहिजे. अत्रे याबद्दल आपणास शिवीगाळ करतील ही आपली भीती व्यर्थ आहे. ते माझ्या लेखाला उत्तर देणार नाहीत. लेख वाचल्याबरोबर मी तो लिहिला आहे हे त्यांच्या लक्षात येईल व ते गप्प बसतील. मला उत्तर देण्याची हिंमत त्यांना होणार नाही. या बाबतीत आपण निर्धास्त असावे. त्यांनी माझ्या लेखावर टीका केल्यास स्वतःचे नाव जाहीर करून मी त्यांना उत्तर देईन. पण तसा प्रसंग ते येऊच देणार नाहीत.

क. लो. अ. हे वि.

पु. रा. लेले

सप्रेम नमस्कार. बुधवार, ७-२-६२

आपले ता. ६ चे कार्ड हाती येताच उत्तर लिहावयास बसलो. सकाळी Ruia College मध्ये गेलो होतो.

जे काही फेरफार करणे अवश्य असेल ते करून प्रूफ पाठवावे. जर प्रुफात खऱ्या महत्वाचा मजकूर गळाला तर मग पाहू. प्रूफ एकदाच तपाशीन.

आज हे कार्ड कसे तरी पुरे करीत आहे. उजव्या हाताच्या तर्जनीला न्हाव्याने दुखावले आहे. उद्या लिहिण्याचे कबूल केलेले पत्र लांबणीवर पडणार याबद्दल क्षमा मागतो.

बोट बरे झाल्यावर शक्य तितक्या लवकर पत्र लिहीन. क. लो. अ. ही वि.

पु. रा. लेले

Confidential

P. R. Lele
B. A., LLB.
Author & Journalist

Tarabeg A/12
Bombay 4

१०-२-१९६२

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
सप्रेम नमस्कार विनंती.

आपल्या दोन तारखेच्या पत्रातील मुद्यांच या पत्रात परामर्श घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

आपणास हवे असलेले चार लेख लिहिणे मला शक्य नाही. का ते आपणास समजावण्याचा प्रयत्न करतो. आपण मोबदल्यावर बराच भर दिलेला दिसतो. आपण जो मोबदला देता त्यात तोंडाला पाणी सुटण्याजोगे काही नाही. आपण जोगळेकरांवरील लेखाबद्दल दिलेला मोबदला मराठी वृत्तपत्रांच्या दृष्टीने योग्य होता. पण माझ्या इंग्रजी लिखाणाच्या मोबदल्याच्या मानाने तो काहीच नाही. आपण मोबदला दिला त्याचा मी साभार स्वीकार केला. तो लेख लिहिण्याची मला हौस होती म्हणून तो लेख लिहिला.

मला आपलेपणा वाटतो त्या व्यक्तींची नावे व क्रमांक आता देतो. १. जोगळेकर, २. खाडिलकर, ३. टिपणीस, ४. कोल्हटकर.

कोल्हटकरांचा मोठेपणा सिद्ध करावयाचे सर्वात प्रभावी साधन म्हणून मला गडकऱ्यांबद्दल कौतुक आहे.

आपणाकडे जो 'पुणेकर' या नावाने लेख पाठविला तो लिहिण्यातील माझा मुख्य उद्देश म्हणजे अत्र्यांनी 'कोल्हटकरांचा गडकऱ्यांवरील प्रभाव' या विषयावर जो मजकूर लिहून नवयुगमध्ये प्रसिद्ध केला, त्याला अधिक प्रसिद्धी द्यावी हा आणि एवढाच आहे. तो सगळा भाग 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकात अत्र्यांनी गाळला म्हणून मला वाईट वाटले व रागही आला. तो भाग जर अत्र्यांनी पुस्तकात लिहिला असता, तर मी अत्र्यांच्या कसल्याही चुका दाखवण्याच्या भानगडीत पडलो नसतो.

आपण वृत्तपत्रांचे कसलेले लेखक आहात. माझ्याहीपेक्षा आपण वाकबगार व यशस्वी मराठी लेखक आहा. मी आपणास काय शिकवावे ?

अत्र्यांच्या चुका दाखवून फक्त पार्श्वभूमी तयार केलेली आहे. अत्र्यांचा व गडकऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध किती थोडा होता हे मला दाखवावयाचे होते. जो अभिप्राय 'अलमगीर'मध्ये प्रसिद्ध झाला आहे त्यात सुद्धा कमतनूरकर व देवभक्त यांच्या मानाने गडकऱ्यांशी अत्र्यांचा संबंध कमी होता असे मी लिहिले आहे. त्यांना मी उपमा दिली आहे तीही एकलव्याची दिली आहे. ही उपमा देण्यातील माझा हेतु आपणासारख्या संस्कृत पंडिताला मी उघड करून दाखवला पाहिजे असे नाही.

माझे व अत्र्यांचे ज्या वेळी या पुस्तकाबद्दल बोलणे झाले त्या वेळी त्यांनी मोठमोठ्या लोकांदेखत 'माझे गुरु' म्हणून माझा उल्लेख केला आणि 'माझी प्रस्तावना वाचून तुम्ही कोठे तरी लिहा' अशी मला स्पष्ट शब्दांत विनंती केली. त्या वेळी असलेली पार्श्वभूमी आणि माझी अपेक्षा यामुळे मीही हो म्हटले. अत्र्यांच्या प्रस्तावनेची मी स्तुती करणार या अपेक्षेने मोटघांनी मला प्रकाशनाच्या आधीच प्रत दिली. अशा प्रकारे मी मर्यादित प्रमाणात बांधला गेलो होतो. मी ती बंधने सांभाळून 'आलमगीर'मधील अभिप्राय लिहिला. तो मजकूर लिहून झाल्यावर मी आपणास पत्र पाठवून 'लेख लिहू का?' असे विचारले. 'लेख लिहा' असे आपण कळविलें म्हणून मी लेख लिहिला. तो टोपण नावाने प्रसिद्ध करावयाचा आहे हेही मी स्पष्टपणे लिहिले होते.

हे सगळे स्पष्टीकरण एवढ्याच करिता आहे की, गडकऱ्यांबद्दलचे सत्य उघडकीस आणण्याच्या निःस्वार्थी हेतूने मी मुळीच प्रेरित झालेला नाही. गडकऱ्यांनी तात्यांचे आणि माझे संबंध बिघडवले. ते बिघडलेले पाहिल्यानंतर त्यांनी आपली माझ्याशी वागण्याची पद्धत बदलली. पूर्वीची आपुलकी टाकून शिष्टाचाराची पद्धत अवलंबिली.

विठ्ठल सीताराम गुर्जर हा एक कृतघ्न आणि दुष्ट माणूस आहे. त्यांच्याइतका कृतघ्न दुसरा माणूस म्हणजे गणेश गोविंद बोडस हा होय. कोल्हटकरांचे उपरणे धरून नाटक कपन्यांत गुर्जरानी प्रवेश मिळवला. नंतर हे उपकार त्यानी कसे फेडले हे आपण जाणत असलां पाहिजे. बोडसांना नाटक धंद्यात राहता आले ते कोल्हटकरांमुळे—पण त्यांनी 'गडकरी कोल्हटकर' यांच्यासंबंधी तुरळक उल्लेख करण्यापलीकडे काय केले आहे? देवलांचेच सगळे स्तोम माजवले आहे. कोल्हटकरांचा मोठेपणा दाखवणारा मजकूर बोडसांच्या 'भूमिका' नावाच्या पुस्तकात आपणास आढळतो का?

देवलांना गडकरी मुळीच मानीत नसत. गडकऱ्यांवरील माझ्या लेखात याची कल्पना मी दिली आहे.

'कोल्हटकर गडकरी–गुरुशिष्य' या मथळ्याचा एक लेख मी यापूर्वीच लिहिला असून तो 'संजय' मासिकात प्रसिद्ध झाला. आपल्या पाहाण्यात तो आला नसावा.

गडकऱ्यांच्या दारूच्या व्यसनाबद्दल आपल्या कल्पना अवास्तव आहेत. कायस्थांत दारू पिण्याचा फैलाव किती होता हे मी नुसते दाखवून दिले तर आपण ते छापू धजत नाही. गडकरी पीत होते, पण त्यांना दारूचे व्यसन होते असे मी म्हणत नाही बोडस पखालीने दारू प्यालेले आहेत. पण त्यांना आपण 'दारूबाज' म्हणाल का? आणि हे बोडस मद्यपान निषिद्ध मानणाऱ्या ब्राह्मण जातीत, आणि विशेष म्हणजे भिक्षुक घराण्यात जन्मलेले. गडकरी तर मद्यपान निषिद्ध न मानणाऱ्या जातीत जन्मले. मला मद्याची चव प्रथम दिली ती एका कायस्थ मित्राने. अत्रे एक बाजूने हा विषय अवास्तव रीतीने मांडतात. आपण दुसऱ्या बाजूने त्याचे अवास्तव स्वरूप कल्पिता व मांडता. आपल्या व माझ्या वयात दहाच वर्षांचा फरक आहे. पण ती दहा वर्षे म्हणजे एक पिढी व्हावी अशा कालखंडातील ती दहा वर्षे आहेत.

दारूच्या किमतीबद्दल आपण विचारता. सन १९१५ मध्ये Three Stars Hennessy पाच रुपयांना सव्वीस औंसांची बाटली मिळत असे. Exshaw नं. २ तेवढीच बाटली साडेतीन रुपयांना मिळत असे. Beer सहा आणे पाईंट आणि अकरा आणे संबंध बाटली मिळे. जपानी Beer संबंध बाटली नऊ आण्यांना मिळे.

देशी दारू गडकरी पीत होते असे मला वाटत नाही.

उत्पन्नाचा प्रश्न दारूसाठी फारच क्वचित नडतो. बोडस पखालींनी दारू प्याले पण त्यानी गिळलेल्या दारूचा हजारावा हिस्सा त्यांच्या पैशानी विकत घेतलेला होता.

किर्लोस्कर कंपनीच्या बिऱ्हाडात दारू पिण्यात येत नसे–भाऊरावांच्या मृत्यूनंतरची ही गोष्ट आहे. मुजुमदार दारू घेत नसत. जोगळेकर मित प्रमाणात घेऊ लागले होते पण त्यांच्या वडिलांनी त्याला आळा घातला आणि तदनंतर कंपनीत दारू पिण्याचे बंद झाले.

गडकऱ्यांच्या मद्यपानमित्रांची यादी कोणीही करू शकणार नाही.

अत्र्यांना पैशाचे हिशोब मुळीच कळत नाहीत. आज सुद्धा त्यांचा सगळा खाक्या बिनाहिशोबी आहे. पैसा मिळवावा आणि खर्च करावा एवढेच त्यांना कळते.

गडकऱ्यांचा व माझा पत्रव्यवहार मुळीच नव्हता, त्याची जरूर नव्हती. आम्ही पुणे मुंबईत असलेले आणि त्याच कंपन्यांत आमचे दोघांचेही जाणे येणे. भेटी व्हावयाच्या त्याही कंपनीच्या बिऱ्हाडात किंवा नाटकगृहात.

पत्रव्यवहार कोल्हटकरांचा हातखंडा होता. देवलांचे मज जवळ फक्त एक कार्ड आहे. खाडिलकरांचा व माझा अत्यंत घनिष्ठ संबंध, पण त्यांची दोन पत्रे माझ्या संग्रही आहेत. त्याबाहेर दोन तीन पत्रे त्यांची मला आली; अधिक नाहीत.

कोल्हटकरांची पत्रे मजजवळ आहेत, पण त्यांत गडकऱ्यांचा उल्लेख नाही. मी गडकऱ्यांचे नाव ऐकले तेच मुळी ते कोल्हटकरांचे शिष्य म्हणून ऐकले आणि त्यांचे पहिले पुस्तक वाचले ते कोल्हटकरांच्या नाटकातील 'सुंदर उतारे' हे होय. त्यांचा गुरुशिष्यसंबंध हा त्या दिवसांतील एक axiom म्हणून स्वीकारला गेला होता. त्याबद्दल कधी कोणी संशय घेईल अशी कल्पना सुद्धा त्या वेळी आम्हाला आली नव्हती.

कोल्हटकरांबद्दल मला आपलेपणा वाटावा असे १९१३ नंतर त्यांचे माझ्याशी वागणे नव्हते. तरी सुद्धा मी त्यांना आदरतो.

विवाद्य लेखांचा आपण उल्लेख केला आहे. वनहट्टींच्या ..... महत्त्वाकांक्षेमुळे तसले लेखच लिहिण्याचे माझ्या नशिबी आले आहे. जोगळेकर व टिपणीस यांचेबद्दल मला आपलेपणा वाटतो. त्याला एक कारण म्हणजे त्यांचेप्रमाणे मीही अपुऱ्या दैवाचा आहे.

मला वाटते, माझी भूमिका आपणास समजविण्यात मला यश आले असावे.

मी आपली मागणी पुरी करू शकत नाही याबद्दल राग मानू नये. मी आता थकलो आहे. फक्त ऋण फेडण्याची माझी धडपड आहे. ते फेडण्यात आपण मला मदत केली तर मी आपले उपकार मानीन. पत्र दीर्घ झाले त्याबद्दल माफी मागतो.

क. लो. अ. हि वि.

पु. रा लेले

Blitz Publications Pvt. Ltd.
Asia's Foremost News Magazine
Editor : P. K. Karanjia

ताराबाग, मुंबई–४
२८–२–६२
सायंकाळ

श्रीयुत ग. त्र्यं. माडखोलकर
स. न वि. वि.

आज दोन प्रहरी १२–३० वाजता एक कार्ड लिहून टाकले ते मिळालेच असेल. त्यात म्हटल्याप्रमाणे दोन वाजता प्रुफे दुरुस्त करावयास बसलो. आता दुरुस्त प्रुफे यासोबत पाठवीत आहे. पोचल्याचे तावडतोब कळवावे.

प्रुफांच्या कागदांपैकी दुसऱ्या कागदाच्या सुरुवातीस मी एक सूचना माझ्या आद्याक्षरांसह दिली आहे. ती आपल्या मननाकरता आहे. ती छापली जाता कामा नये. तेथे काही तरी ओळी गळल्या आहेत हे आपल्या सुद्धा लक्षात सहज येईल. कॉपी पाहून जरूर ती दुरुस्ती तेथे करावी.

मथळ्यांबाबत : मोठा मथळा मी बदलला आहे. मी सुटसुटीत मथळा सुचवला आहे—तेवढा पुरे असे मला वाटते. पुढे काही मथळे मी कायम ठेवले असून काही बदलले आहेत. Hero-worship आणि Reason यांमधील फरक दाखवण्यापुरते मथळे असले म्हणजे झाले. पंडित किंवा परांजपे यांच्या चुका दाखविणे हा माझा मुख्य उद्देश मुळीच नाही.

मार्चच्या 'वसंत'च्या अंकात एक पृष्ठभर मजकूर प्रा. वाळिंब्यांनी प्रसिद्ध केला आहे. तो मजकूर म्हणजे चिंतोबा दिवेकरांच्या डायरीतील उतारे आहेत. "गडकऱ्यांनी खूब धामधूम केली, शिव्या रेट दिल्या" असा त्यात एक उतारा आहे. खुद्द गडकऱ्यांच्या डायरीत जी एक नोंद आहे (ता. ५–८–१६) तिच्याशी या उताऱ्याची तुलना करून पाहावी. गडकऱ्यांची नोंद 'अप्रकाशित गडकरी'च्या १०० व्या पृष्ठावर आहे. प्रा. वाळिंबे आपणास नागपुरी भेटतीलच. 'वसंत'च्या पुढील अंकात त्यांचा याच विषयावर लेख प्रसिद्ध होईल, असे त्यांनी मला सांगितले.

प्रुफांची व या पत्राची पोच पाठवावी. तसेच आपण मोकळे झाला असल्यास कबूल केलेले दीर्घ पत्र लिहावे. क. लो. अ. ही वि.

पु. रा. लेले

P. R. Lele
B. A., LLB.
Author & Journalist

Tarabag A/12
Bombay 4

१३–३–६२

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांस

सप्रेम नमस्कार

आपले ता. १२ चे कृपापत्र आज मिळाले. अगदी रीतसर मिळाले यावद्दल पोष्टखात्याचे आभार मानतो.

रविवार ता. ११ चा साप्ताहिक अंकही त्याच टपालाने आला. एकच अंक आतापर्यंत मिळाला. आणखी अंक पाठविले असले तर ते मला मिळतील. पण जर यदाकदाचित कचेरीने अजून पाठविले नसतील तर पाठवू नये कारण मी त्यांचा उपयोग करू शकणार नाही.

आपण मोठ्या औदार्याने मला नाट्य संमेलनाचे आमंत्रण दिले आणि फर्स्ट क्लासचे भाडे देऊ केले. आपला मी अत्यंत आभारी आहे. आपल्या मनात मजवद्दल वास करीत असलेल्या आदराचा ते आमंत्रण निःसंशय पुरावा आहे. मी त्याला लायक आहे की नाही हा प्रश्न बाजूस ठेवला तरी संमेलनात हजर राहून काही करता येईल असे मला वाटत नसल्यामुळे मला कृतज्ञतापूर्वक नकार देण्याशिवाय गत्यंतर नाही. आपण मजवर रागावू नये.

आणखी एकादे वर्ष जगलो तर केव्हा तरी नागपुरी यावे असे माझ्या मनात आहे. नागपुरसारख्या दूरच्या ठिकाणी मी गेलो तर पंधरा दिवस रहाण्यासाठीच जाईन. प्रवासाचा शीण मला फार येतो आणि मी नागपूर सारखे शहर पुनः पुनः पाहू शकणार नाही. मागे श्री. पां. बा. गडकरी यांनीही मला आमंत्रण दिले होते. प्रा. पंडितांनी आमंत्रण दिले आहे. यवतमाळला येण्याचे पराडकराचे (Standing) कायम आमंत्रण आहे. जर योगायोग असेल तर पाहू. आपण हल्ली नागपूर बाहेरच बरेचसे असता. आपली गैरसोय करून येण्याचे माझ्या मनाला पटत नाही.

मोबदल्याबद्दलचा तपशील एवढ्याच करता लिहिला की मराठीतील लेख मी हौसेखातर लिहितो (मोबदला मिळाल्यास साभार स्वीकारतो) हे आपणास दाखवून द्यावयाचे होते. गैरसमज करून घेऊ नये. अधिकोत्तर लिहिले गेले असल्यास क्षमा मागतो.

खाडिलकरांवर जो लेख मी लिहिणार आहे त्यात तारखांना महत्त्व असे मुळीच रहाणार नाही. ऋण फेडणे हा त्या लेखाच्या लेखनामागील हेतु आहे.

गडकऱ्यांबद्दल लिहावयाचे मी हेतुपुरस्सर टाळतो याचे कारण आतापर्यंत आपणास समजले असावे असे वाटते. त्यांच्याबद्दल सत्य ऐकण्याची सर्वसाधारण जनतेची अजून तयारी नाही. यावावत एक तडजोड सुचवतो–म्हणजे तावडतोब मी लिहावयास बसतो असे मात्र आपण गृहीत धरू नये. माझ्या मनात जे आहे आणि जी माहिती मला आहे ती लिहून आपल्या स्वाधीन करतो. त्या लेखाखाली मी सही करीन. त्यातील मजकुराचा उपयोग माझ्या पश्चात आपण करावा. ही तडजोड मान्य असल्यास कळवावे. कृती परमेश्वराधीन.

कोल्हटकरांबद्दल मी आपणास पुष्कळ माहिती दिली आहे. मी त्यांचेबद्दल लिहिणार ते काय लिहिणार ? माझे त्यांचेबद्दलचे मन अतिशय सशर्त व मर्यादाप्रतिबद्ध आहे. त्यांच्या बद्दल लिहून मला जे दुसऱ्यांना पटवावयाचे आहे ते मी पटवू शकेन की नाही यावद्दल अतिशय साशंक अशी माझी वृत्ती आहे. मला जी एक संधी होती ती प्रा. बनहट्टींनी हिसकावून घेतली.—आपण उपकारकर्त्याच्या आसनावर मला बसविण्याचे कारण नाही. पाहू भविष्यकालात काय होते ते. आपला लोभ कायम ठेवावा हीच माझी विनंति.

पु. रा. लेले

६–७–६२

राम गणेश गडकरी

यांच्याबद्दल मला असलेली बहुतेक माहिती माझ्या निरनिराळ्या लेखांत प्रसिद्ध झालेली आहे.

१. समीक्षक गडकरी खास अंक फेब्रुवारी १९४४. हा लेख 'नाटकमंडळीच्या बिऱ्हाडी' या पुस्तकात पुनश्च प्रसिद्ध झाला आहे.

२. तरुणभारत साप्ताहिकामध्ये 'गर्वनिर्वाण–गडकरी–प्रेमसंन्यास' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला लेख.

याशिवाय 'पुणेकर' या गृहस्थाचे दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यात जी माहिती प्रसिद्ध झाली आहे, तिची सत्यता ग्राह्य मानावी, असे मी म्हणू शकतो.

गडकऱ्यांबद्दल अण्णासाहेब कारखाननीसांनी दिलेली माहिती अशी आहे की, सन १९०५ साली प्लेगच्या कँपात असणाऱ्या कायस्थ प्रभु बिऱ्हाडात एकही बिऱ्हाड शिल्लक राहिले नव्हते की ज्यातून गडकऱ्यांनी एक तरी रुपया उसना नेला नव्हता.

गडकरी जातिवंत कवी होते. आणि परिश्रम करून नाटककार झाले.

कोल्हटकरांची पहिली चार नाटके त्यांना मुखोद्गत होती आणि ही गोष्ट ते अभिमानाने सांगत.

माझी व त्यांची गाठ बहुतेक कंपनीच्या बिऱ्हाडी वा थिएटरात पडत असे. त्यांच्या घरी मी अनेक वेळी गेलो होतो. पण दर वेळी कोणी तरी माझ्या-बरोबर असे. पांडु पेटीवाला हा त्यांचा आवडता माणूस आणि 'गोकुळ' हे पात्र त्यांनी त्याचे वरून बनवले.

गडकरी १९१२ साली आक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात भारत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी येत. त्या मुदतीत ते आणि मी आणखी कोणाशिवाय एकमेकांना भेटत असू. त्या वेळी आमच्या संभाषणात फक्त वाङ्मयीन विषय चालू असत. मला ते कोल्हटकरांचा एक चाहता म्हणून ओळखीत व मानीत. मला कोल्हट-करांचा अनुयायी बनविण्याचा ते या मुदतीत आटोकाट प्रयत्न करीत होते. मी खाडिलकरांच्या नाटकांचा चहाता होतो हे त्यांना माहीत होते. व्यक्तिशः खाडि-लकरांबद्दल त्यांच्या मनात नितांत आदर होता. पण नाटककार म्हणून त्या मानाने पुष्कळच कमी होता. कोल्हटकरांबद्दल निस्सीम आणि अमर्याद आदर होता.

त्राटिका, वायकांचे बंड आणि मूकनायक या तीन नाटकांची ते नेहमी तुलना करीत आणि 'मूकनायक' सर्वश्रेष्ठ आहे असे प्रतिपादन करीत असत.

गडकऱ्यांचे तीन 'H' होते. Head, Heart आणि Hand. यांपैकी Head व Hand यांनी तात्या लिहतात आणि यात त्यांना तोड नाही असे ते म्हणत. पण Heart मात्र नसल्यामुळे कमीपणा येतो याबद्दल हळहळत.

त्यांच्याजवळ अर्धातास बैठक झाली तर एकदा तरी 'कोल्हटकरां'चे नाव त्यांच्या तोंडून येतच असे. उलटपक्षी देवलांचे नाव त्यांच्या तोंडून मी केव्हाही ऐकले नाही.

'Read Tatya' असा उपदेश मला त्यांनी पन्नास साठ वेळा तरी केला असेल. 'वंचक विलास' यांचे संवाद अगदी समरस होऊन ते म्हणून दाखवीत.

शेक्सपीअर बद्दल त्यांना आदर होता, पण कालिदास हा शेक्सपीअरपेक्षा किती तरी श्रेष्ठ, असे ते म्हणत. शेक्सपीअरची विविधता असामान्य आहे हे ते म्हणत. पण शेक्सपीअरच्या अभिरुचीबद्दल व्हॉल्टेरशी ते सहमत होते. 'Shakespeare is a bar-barian' असे व्हॉल्टेरने लिहिले होते.

गोल्डस्मिथबद्दल गडकऱ्यांना अतिशय कौतुक वाटत असे. त्याच्या बाबतीत अन्याय झाला आहे असे ते वारंवार बोलून दाखवीत.

बर्क ह्याला शेक्सपीअर आणि डिकन्स यांच्या-नंतर तिसरा क्रमांक गडकरी देत असत.

कोल्हटकरांनी खाडिलकरांसारखी नाटके लिहावी असे एकदा मी म्हटले असता, ते एकदम उद्गारले: "मग ते कोल्हटकर राहाणार नाहीत."

गडकऱ्यांचा धाकटा भाऊ 'मंजुबाळ' हाच काय तो माझ्या परिचयाचा त्यांचा नातेवाईक. याचे शिवाय बाबूराव देशपांडे हे त्यांचे खास स्नेही माझ्या परि-चयाचे होते. हे मावळातले शेतीवाडी मालकीची असलेले गृहस्थ होते. नटांपैकी त्र्यंबकराव प्रधान हे त्यांच्या नात्याचे होते. प्रधान गडकऱ्यांना 'लालजी' म्हणत.

महाराष्ट्र मंडळीत गडकऱ्यांचा पोतनीसशी निकट येण्याचा प्रयत्न असे.······स्वतंत्र कंपनी काढा-वयास पोतनीसला उत्तेजन देण्यात गडकऱ्यांचा पुढाकार होता. पण 'गणेश' नाटक मंडळी स्थापन झालेली पाहाण्यास गडकरी हयात नव्हते.

गडकऱ्यांचे इतर नातेवाईक माझ्या परिचयाचे नाहीत. गडकऱ्यांच्या घरी मी जात असे तो बहुतेक सरळ माडीवर जात असे. त्यांची घरातली माणसे पहिल्या मजल्यावर राहत असत.

याहून आणखी माहिती मला सुचत नाही. विशिष्ट प्रश्न विचारल्यास कदाचित काही माहिती मला सुचेल. ही माहिती पुनः विचारली जाऊ नये.

पुरुषोत्तम रामचंद्र लेले

तारावाग
११–७–६२

कृ. सा. न. वि. वि.

आज गडकऱ्यांबद्दल आणखी काही साहित्य पाठवीत आहे. अगोदर एका मोठया लिफाफ्यात त्यांचेबद्दल व हिराबाईबद्दल मजकूर पाठविला आहे.

ते पत्र आणि हे पत्र पोचल्याचे कळविल्यास उपकार होतील.

क. लो. अ. हे वि.

पु. रा. लेले

राम गणेश गडकरी

पुण्यप्रभाव

सन १९१२ साली आक्टोबर आणि नाव्हेंबर या दोन महिन्यात पुण्यात गडकरी रोज भारत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी येत असत. ह्या वेळी त्यांनी दोन नाटके योजून कंपनीत मंडळीशी त्यांची चर्चा चालवली होती. एक नाटक भारत नाटक मंडळीसाठी त्याचे नाव 'तोड ही माळ' आणि दुसरे 'पातिव्रत्यप्रभाव' हे महाराष्ट्र मंडळीसाठी. याचेच नाव त्यांनी बदलले आणि 'पुण्यप्रभाव' असे ठेवले.

भारत मंडळीचा पुण्याचा मुकाम आटोपून डिसेंबर (१९१२)च्या सुरुवातीस तिचे खेळ मुंबईत सुरू झाले. दुसऱ्या आठवडयात मी कंपनीच्या वतीने खामगावी गेलो. गडकऱ्यांची स्वतंत्र राहण्याची व्यवस्था आप्पा टिपणिसांनी केली आणि तेथे राहून सरासरी तीन आठवडयात 'तोड ही माळ' नाटकाचे काही प्रवेश लिहिले. या मुदतीत 'पुण्यप्रभाव'चे लेखन सुरू झाले नसले पाहिजे, कारण त्याबद्दल त्यांचे तोंडून अवाक्षरही ऐकू आले नव्हते.

मुंबईचा मुकाम आटोपून भारत नाटक मंडळी सोलापूर नगरी गेलो. वाटेत पुण्यामध्ये 'वधूपरीक्षा' नाटकाचे दोन प्रयोग कंपनीने केले. दोनही प्रयोग उत्पन्नाच्या दृष्टीने अतिशय चांगले गेले. वधूपरीक्षा नाटकाचा पहिला प्रयोग भारत नाटक मंडळीने ता. २२–२–१९१३ रोजी केला तोही मुंबईत. या नाटकाचा पहिला प्रयोग महाराष्ट्र मंडळीने केला नाही.

एप्रिल १९१३ मध्ये केव्हा तरी किर्लोस्कर कंपनीतील भांडणे विकोपाला जाण्याची पूर्वचिन्हे दिसू लागली आणि गडकरी एकदम त्या भानगडीत पडले. त्यांनी शंकररावांचा पक्ष उघडपणे आणि हिरीरीने घेतला. किर्लोस्कर कंपनी म्हणजे 'आमची' कंपनी असे ते म्हणत. पुढे किर्लोस्कर कंपनीतून तीन प्रमुख नट निघून गेले आणि त्यांचेबरोबर आणखीही काही नट गेले.

या वेळी किर्लोस्कर कंपनीला सर्व प्रकारे सहाय्य करावयाचे कंकण गडकऱ्यांनी बांधले.

ते त्या वेळी म्हणाले, "पुण्यप्रभाव मी आता किर्लोस्करांसाठी लिहिणार." आणि किर्लोस्कर कंपनीबरोबर ते पुण्याहून बाहेरगावी गेले. कंपनी गोव्यात असताना गडकऱ्यांनी 'पुण्यप्रभाव' नाटकाचा पुष्कळसा भाग लिहिला. पुढे शंकररावांशी त्यांचे भांडण झाले आणि नाटकाचा लिहिलेला भाग घेऊन गडकरी पुण्यात परत आले.

गडकरी पुण्यात परत आले ते सन १९१४ च्या मे महिन्यात. योगायोग असा की त्या मुदतीत पुनश्च भारत नाटक मंडळीचा मुक्काम पुण्यात होता आणि बिऱ्हाड किर्लोस्कर थिएटरमध्येच होते. मी समोर भावे स्कूलमध्ये राहात असे. उन्हाळयामुळे शाळा सकाळी भरत असे. दुपारच्या चहाला मी भारत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी जात असे आणि गडकरीही तेथे येत असत. 'तोड ही माळ' नाटकाचा विषय निघत नव्हता कारण अच्युतराव कोल्हटकरांचे 'विवेकानंद' नाटक बसविण्याचे भारत मंडळीने ठरविले होते.

एक दिवस चहाच्या बैठकीला आम्ही तिघे जणच होतो. १. आप्पा टिपणीस, २. गडकरी, ३. मी. त्या वेळी आप्पा म्हणाले की, 'मास्तर आता मद्यपानावर एक नाटक लिहिणार आहेत, मात्र कथानक अगदी आधुनिक, रोमँटिक वा पौराणिक नाही.' त्या वेळी मजकडे वळून गडकरी म्हणाले, "तुम्हाला माहीत नाही आमच्या जातीत या दारूने किती लोकांचे नुकसान केले आहे ते." हेच पुढे 'एकच प्याला' या नावाने रंगभूमीवर आले.

सन १९१४ सालीच पण उत्तर भागात 'महाराष्ट्रमंडळीसाठीच मी योजिलेले पुण्यप्रभाव त्या मंडळीसाठीच पुरे करणार,' अशी भाषा गडकऱ्यांच्या तोंडून ऐकू येऊ लागली. आणि ही भाषा भारत नाटक मंडळीच्या व्हिऱ्हाडी ऐकू येत असे. त्याच मुदतीत गणपतराव बोडसांजवळ 'पुण्यप्रभाव' नाटक गंधर्व मंडळीने बसवावे याकरता वाटाघाटी गडकरी करीतच होते. काही थोडी रक्कमही त्यांना नारायणरावांच्या आणि टेंब्यांच्या संमतीने बोडसांनी दिली. 'वृंदावनाचे काम लिहिताना तुम्हीच माझ्या डोळ्यांपुढे होता', असेही गडकरी बोडसांना सांगत.

त्याच मुदतीत चिंतामणराव कोल्हटकर गडकऱ्यांशी 'पुण्यप्रभाव' नाटकाबद्दल वाटाघाटी करीत होते. 'वृंदावनाची भूमिका तुम्हाला डोळ्यापुढे ठेवूनच मी लिहिली,' असे गडकऱ्यांनी कोल्हटकरांनाही सांगितले.

पुढे रस्सीखेच सुरू झाली. या रस्सीखेचीत देवलांनी सुद्धा भाग घेतला. दोन माणसे मात्र तटस्थ होती. १. खाडिलकर, २. कारखानीस. महाराष्ट्र मंडळी कडून आगाऊ रक्कम मिळणे शक्य नसल्यामुळे रस्सीखेचीत फक्त दोन कंपन्या राहिल्या. १. गंधर्व, २. किर्लोस्कर. गंधर्व कंपनीतून टेंबे निघून गेले होते आणि दोन मालक राहिले. बोडसांचा पक्षपात 'फाल्गुनराव' (संगीत) रंगभूमीवर आणण्याकडे होता आणि गंधर्वांची उत्सुकता 'स्वयंवर' नाटक यावे या बाबतीत होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन 'चि.ग.को.' ने रस्सीखेचीत जय मिळवला आणि 'पुण्यप्रभाव' पुनः किर्लोस्कर कंपनीकडे आले. पुण्यप्रभावचा पहिला प्रयोग मुंबईच्या मुक्कामात (१९१६) किर्लोस्करांनी केला.

पुण्यप्रभावचा प्रयोग एकसमयावच्छेदेकरून महाराष्ट्र मंडळीच्याही रंगभूमीवर यावा अशी गडकऱ्यांची खटपट चालू होतीच. पोतनीसला भारत मंडळीतून काढून महाराष्ट्र मंडळीत गडकऱ्यांनी नेला. पण अण्णांच्या कडून काहीच उत्तेजन मिळेना. अण्णांनी पोतनीस कंपनीत आल्याचा फायदा 'विचित्रलीला' नाटकाला मिळवून दिला. ते नाटक तर भरमसाट गाजलेच शिवाय लीलेचे काम पोतनीसने इतके परिणामकारक केले की तसल्या भूमिका हे तदनंतर त्याचे वैशिष्ट्य झाले. विचित्रलीलेनंतर 'पुण्यप्रभाव' महाराष्ट्र मंडळीने केले॰ पण ते घेण्यात अण्णांचा पुढाकार (Initiative) नव्हता. दात्यांना त्यांनी परवानगी दिली इतकेच. या बाबतीत आणखी काही तपशील आहे, पण दात्यांच्या मनात वास करीत असलेल्या अण्णा कारखाननीसांबद्दलच्या भक्तीमुळे तो मी लेखात देऊ इच्छित नाही. पोतनीसच्या वसुंधरेच्या भूमिकेबद्दलही असाच तपशील आहे की गडकऱ्यांनी तिला संमती दिली इतकेच.

पुण्यप्रभावच्या तालमी विठ्ठल सायन्ना बिल्डिंगमध्ये होत असत. त्या वर्षी किर्लोस्कर कंपनीचा मुक्काम दीर्घकाल मुंबईत होता. 'ताजेवफा नाटक आणि दीनानाथची त्यातील भूमिका' यांचेवर तो मुक्काम चांगला चालला होता.

गडकऱ्यांच्या जीवनावर प्रकाश पाडणारे पुष्कळ साहित्य चिंतोबा दिवेकरांच्या रोजनिशीत सापडते. सन १९१६ सालची त्यांची रोजनिशी प्रा. डॉ. वाळिंबे यांचे कबज्यात आहे.

या मुक्कामातील एक प्रसंग. नाटककार झाले तरी गडकऱ्यांची शंकररावांच्या समोर शांतपणे व ताठपणे उभे राहण्याची छाती नव्हती. एक दिवस तणतणत गडकरी शंकररावांच्या खोलीत गेले. 'या मास्तर, बसा ना', असे शंकरराव म्हणाले. 'मला नाही बसायचे,' गडकरी. 'बरं उभ्यानीच सांगा काय ते,' शंकरराव. 'मला विडयांना पैसे पाहिजेत,' गडकरी. शंकररावांनी कॅशियरला बोलावून घेतले आणि सांगितले, "मास्तरांना शंभर विडयांचे बंडल आणून द्या." 'आणखी काय हवं', असं शंकरराव विचारतात, तो गडकरी ताडताड निघून गेले. शंकररावांना गडकरी 'पद्महस्ती' म्हणत.

११-७-६२ **पुरुषोत्तम रामचंद्र लेले**

पुण्यप्रभाव

(रा. ग. ग.)

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर १२-७-६२
कृ. सा. न. वि. वि.

'पुण्यप्रभाव' बद्दलच्या मी दिलेल्या माहितीत १९१४ च्या मे महिन्यातील हकीकत मी दिली आहे आणि त्या मजकुरात 'शाळा सकाळची होती' असे लिहिले आहे. याबद्दल खुलासा करणे अवश्य आहे.

सन १९१३ साली आक्टोबरमध्ये पुण्यात प्लेग सुरू झाला. त्या प्लेगमुळे डिसेंबर अखेरपर्यंत शाळा जवळ जवळ बंद होत्या. त्या मुदतीत वार्षिक परीक्षा नोव्हेंबरमध्ये होत होत्या हेही या ठिकाणी नमूद केले पाहिजे. शाळा बंद राहिल्यामुळे मागे राहिलेला अभ्यास भरून काढण्याकरिता सन १९१४ साली मे महिन्याच्या १४ तारखेपर्यंत शाळा चालू ठेवलेल्या होत्या. क. लो. अ. हे वि.

१२–७–६२ पु. रा. लेले

माहितीची तीनही पत्रे पोचल्याचे कळविण्याची कृपा करावी.

पु. रा. लेले

वधूपरीक्षा

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर तारावाग

सप्रेम नमस्कार ता. दहा मार्च १९६३

'वधूपरीक्षा' नाटकापुरती माहिती या पत्रात देत आहे. ही माहिती आता छापण्याकरता नाही.

सन १९१२ साली मी डिसेंबरमध्ये खामगावला गेलो. याचा उल्लेख तात्यांच्या आत्मवृत्तात पृ. ८३ वर आहे. (आत्मवृत्त पृ. ८३)

ता. २१–१२–१२ रोजी रात्री तात्या व मी आगगाडीने मुंबईस यावयास निघालो. ता. २१ रोजी शनिवार होता.

त्या वर्षी ज्युडिशियल कमिशनरने ता. २३ डिसेंबर रोजी सुटी देऊन ता. २ जानेवारी रोजी कोर्ट उघडण्याचा हुकूम दिला होता. या हुकुमान्वये वकील लोकांना रविवारच्या सुटीचा जोडून लाभ घेता आला.

ता. २२–१२ रोजी म्हणजे रविवारी आम्ही मुंबईत आलो आणि तात्यांची राहण्याची सोय मी मजकडेच केली होती तेथे आम्ही उतरलो म्हणा, राहिलो म्हणा.

त्या दिवशी दोन प्रहरी तात्यांना घेऊन मी भारत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी गेलो. तेथे मी बहुतेक नट तात्यांच्या डोळ्यांपुढे घातले. नंतर तात्या व मी केशवराव भोसल्यांच्या नाटकास गेलो. त्यांच्या नाटकाचा प्रयोग भारत नाटक मंडळीच्या प्रयोगापेक्षा एक तास अगोदर सुरू व्हावयाचा होता. केशवरावांच्या थिएटरवरून आम्ही बॉम्बे थिएटरात गेलो. भारत नाटक मंडळीचा त्या दिवशीचा सबंध प्रयोग तात्यांनी पाहिला. संध्याकाळचे जेवण कंपनीत झाले. जेवणानंतर आमच्या निवासस्थानी आम्ही परतलो.

दुसरे दिवशी म्हणजे सोमवारी ता. २३-१२-१९१२ रोजी तात्या नाटक लिहावयास बसले.

तात्यांना रोज इराण्याच्या दुकानातून पावलोणी व जाम मी आणून देत असे.

ता. ३०–१२–१९१२ रोजी लेखन पुरे होऊन सायंकाळी त्याचे वाचन तात्यांनी केले. हे वाचन अगदी गचाळ झाले.

ता. ३१-१२-१९१२ आणि ता. १–१–१९१३ या दोनही दिवशी भारत नाटक मंडळीचे दिवसा प्रयोग होते. ता. ३१ रोजी झालेला सबंध प्रयोग तात्यांनी पाहिला.

ता. १–१–१९१३ रोजी तात्या व मी थिएटरवर गेलो. आप्पा टिपणिसांबरोबर बरीच चर्चा झाली. बारीक सारीक फरक काय काय करावयाचे आणि महत्त्वाचे फरक कोणते करावयाचे ते ठरले. त्याच रात्री तात्यांना खामगावी परत जावयाचे असल्यामुळे आम्ही थिएटरमधून लवकरच बिऱ्हाडाकडे वळलो. नंतर जेवण झाले. बारीक सारीक फरक तात्यांनी हस्तलिखितात केले आणि ते हस्तलिखित माझ्या स्वाधीन केले. माझ्या स्वाधीन हस्तलिखित करताना त्यांनी पुन: पुन: बजावले, "हे हस्तलिखित मी तुमच्या स्वाधीन करीत आहे. त्याच्याबद्दलची सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे."

रात्री मी तात्यांच्या बरोबर बोरीबंदर स्टेशनवर गेलो. ते गाडीत बसले. गाडी सुटेपर्यंत मी प्लॅटफॉर्मवर उभा होतो. गाडीची घंटा झाल्यावर त्यांनी मला पुन: बजावले, 'हस्तलिखिताची सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे.' नंतर गाडी सुटली आणि मी बिऱ्हाडी परत आलो. ही सर्व हकीकत ता. १–१–१९१३ बुधवारची आहे. कळावे लोभ असावा ही विनंती.

पु. रा. लेले

श्रीपाद कृष्णांचे जन्मस्थळ

—प्रा. सुरेश म. डोळके

स्थलकालासंबंधीचा संभ्रम हा श्रेष्ठ सारस्वतांच्या पाचवीलाच पुजलेला आहे की काय, कुणास ठाऊक ! कालिदास–भवभूती आणि मुकुंदराज–मुक्तेश्वर यांच्यापासून तो थेट श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपर्यंत अनेक श्रेष्ठ साहित्यिक स्थलकालविषयक अनिश्चितीच्या आवर्तात सापडलेले आहत, आणि त्यांना या आवर्तातून सोडविणे हा संशोधकांच्या संशोधनाचा एक प्रमुख विषय होऊन बसलेला आहे ! श्रीपाद कृष्णांचेच उदाहरण घ्या. कुणी त्यांचा जन्म बुलढाण्याला झाला असे म्हणतात तर कुणी तो खामगावला झाला असे लिहितात. खुद्द श्रीपाद कृष्ण मात्र स्वतःचा जन्म नागपूरला झाला असे सांगतात. श्रीपाद कृष्णांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने, त्यांचा जन्म ज्या गावात, ज्या मोहल्ल्यात व ज्या घरात झाला ते ठिकाण आता तरी निश्चित होणे जरूर आहे.

मराठीतील सुप्रसिद्ध टीकाकार प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी 'श्रीपाद कृष्ण : वाङ्‌मयदर्शन' या आपल्या टीकात्मक प्रबंधाच्या सुरुवातीला श्रीपाद कृष्णांचा जो 'जीवनपट' दिलेला आहे, त्यात '१८७१, २९ जून, जन्म वऱ्हाडात बुलढाण्यास' अशी त्यांच्या जन्मतिथीची आणि जन्मस्थलाची नोंद केलेली आहे. कोल्हटकरांच्या 'आत्मवृत्ता'पासून तो 'अर्वाचीन चरित्रकोशा'पर्यंत आणि 'मासिक मनोरंजना'पासून तो 'विहंगमा'पर्यंत व 'प्रतिभे'पासून तो 'पारिजाता'पर्यंत कोल्हटकरांसंबंधीच्या सर्व वाङ्मयात 'नागपूर' हे त्यांचे जन्मस्थळ म्हणून स्पष्ट दिलेले असताना, प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी मात्र 'बुलढाणा' हे कोल्हटकरांचे जन्मस्थळ म्हणून नमूद करावे, याचे आश्चर्य वाटल्यामुळे, त्यांनी हे विधान कोणत्या आधाराने केलेले आहे, अशी विचारणा करणारे पत्र श्री. वा. वा. देव यांनी दि. ३ सप्टेंबर १९६७ च्या 'तरुण भारता'च्या अंकात प्रसिद्ध केले होते. याचा परिणाम म्हणून की काय, प्रा. कुळकर्णी यांनी दि. २७–९–६७ रोजी श्री. माडखोलकरांना पत्र पाठविले; व श्रीपाद कृष्णांचा जन्म बुलढाणा येथे झाला असल्याची जी माहिती आपण आपल्या कोल्हटकरांवरील प्रबंधात दिली ती चुकीची आहे, असे कळविले.

बुलढाण्याप्रमाणेच 'खामगाव' हेही श्रीपाद कृष्णांचे जन्मस्थळ असल्याची चुकीची माहिती क्वचित आढळू शकेल. तुमसरचे श्री. 'पां. वा. चा.' यांनी, 'तरुण भारता'च्या ता. २३ ऑक्टोबर १९६७ च्या अंकात, कोल्हटकरांचे जन्मस्थळ 'खामगाव' हे असल्याचे आपण कोणत्या तरी एका जुन्या ज्योतिःशास्त्रीय पुस्तकात वाचले असल्याची आठवण दिली आहे. पण तिचा काही उपयोग नाही. कारण, स्वतः श्रीपाद कृष्णांनी आपल्या 'आत्मवृत्ता'त नागपूर हे आपले जन्मस्थळ असल्याचे स्पष्ट नमूद केलेले असल्यामुळे, या बाबतीत अपुऱ्या आठवणी किंवा अधुरे अंदाज यांना काहीही किंमत नाही. कोल्हटकरांच्या हयातीत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या चरित्रात आणि त्यांच्याविषयीच्या सगळ्या परिचायक लेखांत त्यांचे जन्मस्थळ नागपूर हेच असल्याचे गेली साठ वर्षे सतत नमूद करण्यात आलेले आहे.

अर्थात, बुलढाणा किंवा खामगाव हे श्रीपाद कृष्णांचे जन्मस्थळ असल्याची चुकीची माहिती आता पूर्णपणे निकालात निघाली आहे.

पण, कोल्हटकरांच्या जन्मग्रामाविषयी निर्णय करणे जितके सोपे, तितकेच नागपुरातील त्यांचे जन्मस्थान निश्चित करणे जटिल होऊन बसले आहे !

या बाबतीत एक गोष्ट सुरुवातीलाच स्पष्ट केली पाहिजे ती ही की, श्रीपाद कृष्णांचा जन्म ज्यांच्या

घरी झाला, ते त्यांचे पितृतुल्य चुलते कै. रा. ब. वामनराव कोल्हटकर ग्रांचा वाडा सीताबर्डीवर मोदी लाइन नं. ३ मध्ये आहे. या वाड्यात सध्या श्री. जनार्दनस्वामी व श्री. होले वकील हे राहतात. हा वाडा हेच श्रीपाद कृष्णांचे जन्मस्थान असावे, अशी अनेकांची समजूत आढळते. कोल्हटकरांच्या एक शिष्या देवासच्या राजघराण्यातील श्रीमंत सुमतिबाईसाहेब पवार यांचा मुक्काम १९४६ च्या डिसेंबरात नागपुरास असताना त्यांनी, कोल्हटकरांचे जन्मस्थान म्हणून मानण्यात येणारे सीताबर्डीवरील एक जुने घर मुद्दाम जाऊन पाहिले, ही माडखोलकरांनी सांगितलेली आठवण[1] हे या समजुतीचेच प्रत्यन्तर होय !

म्हणून सुरुवातीलाच हे स्पष्ट करणे अवश्य आहे की, वामनराव कोल्हटकरांच्या या वाड्यात श्रीपाद कृष्णांचा जन्म झालेला नाही. कारण, १८७१ साली हा वाडाच मुळी अस्तित्वात नव्हता !

इ. स. १८७०-७१ च्या सुमारास सीताबर्डीच्या आवतीभोवती निवासाला अनुकूल अशी परिस्थिती नसे. नागपूर नगराच्या विकासाच्या पाऊलखुणा जर शोधल्या, तर असे दिसते की, शुक्रवार तलावाच्या पलीकडे सीताबर्डीच्या दिशेने वसतीसाठी तेव्हा अनुकूल असे क्षेत्र नव्हते व सुरक्षितताही नव्हती. सीताबर्डी या शब्दाची व्युत्पत्ती 'चित्तावर्डी' (= चित्ते जेथे राहतात ती वरड जमीन) अशी कै. हरीभाऊ नेने यांनी लावली होती, याचे कित्येकांना येथे स्मरण होईल. १८७०-७१ या काळात सीताबर्डीवरील मोदी गल्लीत मद्रासी व तेलंगे लोकांची वस्ती होती. मुसलमानी धर्म स्वीकारलेले काही कलंकी ब्राह्मणही, परित्यक्त म्हणून, या वस्तीत राहत असावेत. इ. स. १८१७ च्या सीताबर्डीच्या लढाईत इंग्रजांच्या बाजूने लढण्यासाठी जी मद्रासी पलटण नागपूरला आली, त्यांपैकी काही कारकून व कंत्राटदार यांनी सीताबर्डीवरील मोदी गल्लीत पहिल्याने वस्ती केली. मद्रासी पलटणीतील काही निवृत्त अधिकारीही या वस्तीत नंतर स्थायिक झाले. भोसलेशाहीच्या अवतारसमाप्तीबरोबर नागपूरच्या जुन्या भागाचे महत्त्व कमी होऊन इंग्रजांच्या वाढत्या सत्तेबरोबर सीताबर्डीला अधिकाधिक महत्त्व येऊ लागले; व इंग्रज रेसिडेंटच्या आवतीभोवती दंडिगे, पारखी, पटवर्धन, परदेशी, बुटी, काशी सोनार इत्यादी श्रीमंत मंडळी, टेकडी लाइन व टेंपल रोड यांच्या मधल्या भागात, वाडे बांधून राहू लागली. सीताबर्डीच्या टेकडीवर दक्षिणेकडील उतारावर रंभाजीराव महाडिकांचा वाडा होता. सीताबर्डीला महत्त्व येण्याचे कारण इंग्रज रेसिडेंटचे निवासस्थान हे असल्यामुळे रेसिडेन्सीच्या आसपास सीताबर्डीची पहिली वस्ती व्हावी, हे स्वाभाविक आहे. त्यामुळे सीताबर्डीवरील टेकडी लाइन व टेंपल रोड या भागात श्रीमंत घराण्यांचे टोलेजंग वाडे उभारले जात होते तरी बर्डीवरील इतर भागांत मात्र म्हणण्यासारखी लोकवस्ती नव्हती. सध्या जेथे रीगल सिनेमा आहे तेथे इ. स. १८९२-९३ साली बुटींचा मोठा बगीचा होता असे लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'वरून दिसते. या बगिच्याचा काही भाग पुढे मोदी लाइन नं. १ मध्ये रूपांतरित झाला असावा. इ. स. १८६१ मध्ये जबलपूर-विभाग मध्यप्रांतात समाविष्ट होईपर्यंत व अशा रीतीने जवळ जवळ सगळा मध्यप्रांत इंग्रजांच्या ताब्यात येईपर्यंत बर्डीच्या इतर भागातील व विशेषतः मोदी गल्लीतील वस्ती ही अत्यंत तुरळक होती. मध्यम वर्गातील सुशिक्षित लोक १८९१ पर्यंत मोदी गल्लीतील या वस्तीत राहत नसत. १८९१ मध्ये इंग्रजांनी निरनिराळ्या खात्यांची नवीन घडी बसविण्यास सुरुवात केली तेव्हापासून मात्र, नोकरी मिळण्याच्या आशेने बाहेरच्या प्रांतांतले नवशिक्षित लोक नागपूरकडे वळले; व त्यांच्यापैकी काहींनी मोदी लाइनमध्ये रहावयाला प्रारंभ केला.

श्री. वामनराव कोल्हटकर यांनी सीताबर्डीवरील मोदी गल्लीतील स्वतःचे निवासस्थान इ. स. १८९६ साली बांधल्याचे काही वृद्ध गृहस्थांच्या सांगण्यावरून कळते. १८९४ साली वामनराव हे हुशंगाबाद येथे सिव्हिल जज्ज असल्याची नोंद नागपुरातील एक वयोवृद्ध स्थापत्यशास्त्रज्ञ श्री. दत्तोपंत दाते यांनी आपले वडील कै. विठ्ठलराव दाते यांच्या दैनंदिनीतून माझे व्यासंगी मित्र प्रा. ह. चं. घोंगे यांना उपलब्ध करून दिली आहे. वामनरावांना या काळात मध्यप्रांत सरकारच्या न्यायखात्यात बदलीची नोकरी असल्यामुळे ते १८९४ नंतर बदलून नागपूरला आले; व नंतर त्यांनी मोदी गल्लीत स्वतःचा वाडा बांधला. या वाड्यात

१. 'व्यक्तिरेखा' (आ. २ री, १९६६) निवेदन', पृ. ७.

ते १८९६ पासून राहू लागले. या वाड्यात राहू लागल्यावर एक वर्षाने, १८९७ साली, त्यांना रावबहादूर ही पदवी मिळाली.

वामनरावांना सीताबर्डीसारख्या तेव्हा हळूहळू आधुनिक बनत असलेल्या वस्तीत राहणे अधिक सोयीचे वाटले म्हणून त्यांनी बर्डीवर वाडा बांधला की इ. स. १८८० साली वामनरावांची प्रथम पत्नी निवर्तल्यावर १८८२साली त्यांनी गतभर्तृकेशी पुनर्विवाह केल्यामुळे[२] नागपूरच्या ग्रामस्थांनी त्यांच्यावर जे ग्रामण्य टाकले होते त्यामुळे त्यांनी नागपूरच्या जुन्या व सनातनी वस्तीपासून दूर अशा ठिकाणी आपले निवासस्थान बांधले, हाही एक संशोधनाचा प्रश्न आहे. वामनरावांच्या घरी पाय देणाऱ्या व्यक्तीला परत वावरताना स्नान करावे लागे, कपडे भिजवावे लागत, अशी नोंद कै. विठ्ठलराव दाते यांच्या दैनंदिनीत आहे ! असो.

अर्थात, १८७१ साली वामनराव कोल्हटकरांचा जो वाडा मुळी अस्तित्वातच नव्हता, तिथे श्रीपाद कृष्णांचा जन्म होणे शक्य नाही.

श्रीपाद कृष्णांचा जन्म सीतावर्डीवर झाला, ही गैरसमजूत अशा रीतीने निकालात निघाल्यावर, त्यांच्या जन्मस्थानाचा शोध करण्यासाठी वामनरावांचे इ. स. १८७१ मधील नागपुरातील निवासस्थान कोणते असावे, याचा मागोवा घ्यावा लागतो. वामनराव कोल्हटकर हे नागपूरला मुंबईहून इ. स. १८७० साली, येथील त्या वेळच्या नील सिटी हायस्कूलचे (आताचे श्री. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय) हेडमास्तर म्हणून आले.

नील सिटी हायस्कूलची स्थापना ता. १ एप्रिल १८६९ रोजी करण्यात आली. १८६९ च्या पूर्वी मुन्शी जमालुद्दीन यांच्या वाड्यात श्रीमंत अहीरराव, श्रीमंत चिटणवीस व इतर काही मंडळी यांनी चालविलेली प्राथमिक शाळा होती. ह्या शाळेतच, कर्नल फेन्टन साहेबाच्या सूचनेवरून, १८६९ मध्ये इंग्रजी वर्ग काढण्यात आले; व शाळेस 'द ग्रँट–इन एड अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूल' (The grant–in aid Anglo-vernacular School) असे नाव देण्यात आले. शाळेची सुरुवात १ एप्रिल १८६९ रोजी झाली.

शाळेच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १० एप्रिल १८६९ रोजी झाली. तीत पुढील सभासद उपस्थित होते–(१)श्री. त्रिंवकजी नानासाहेब अहीरराव (२) श्रीमंत दाजीसाहेव वुटी (३) श्री. भार्गवराव गाडगीळ (४) श्री. कुंजीलाल साहेव (५) श्रीमंत नानासाहेव चिटणवीस (६) श्री. नारायणस्वामी नायडू (७) श्री. माधवराव तात्या फडणवीस (८) श्री. राणोजी नाइक (९) श्री. भास्करराव तहसिलदार (१०) श्री. वासुदेव बल्लाळ खेर.

श्री. वासुदेव बल्लाळ खेर हे या सभेचे चिटणीस होते. सभेत डेप्युटी कमिशनरसाहेवांकडून आलेल्या शाळेसंबंधीच्या पत्राचा विचार करण्यात आला व मराठी वर्गाची फी दोन आणे आणि इंग्रजी वर्गाची फी चार आणे ठरविण्यात येऊन, शेकडा २० विद्यार्थ्यांना फी-माफी देण्याचे ठरले.

ह्या शाळेत त्यावेळी नॉर्मलस्कूलमध्ये काम करीत असलेले शिक्षक श्री. बाळाजी दाजी आगाशे यांची ह्या शाळेचे हेडमास्तर म्हणून (७० रुपयांवर) व महादेव बाबाजी यांची असिस्टंट मास्तर म्हणून (३० रुपयांवर) शिक्षणखात्याने नेमणूक केली. कार्यकारी मंडळाने सभा भरवून ही नेमणूक योग्य आहे असे ठरविले, व तिला मान्यता दिली.

---

२. वामनरावांच्या पुनर्विवाहासंबंधी, वऱ्हाणपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'सुबोधसिंधु' या साप्ताहिकाच्या एप्रिल १८८२ च्या अंकात पुढील मजकूर आढळतो—

'पुनर्विवाह

बुधवार, ता. १९।४।८२ इ. :—

प्रसिद्ध मयत महादेवशास्त्री कोल्हटकर यांचे चिरंजीव वामन महादेव कोल्हटकर यांचा पंढरपूरच्या एका देशस्थ १८ वर्षांच्या विधवेशी येत्या २१ तारखेस मुंबईत पुनर्विवाह होणार आहे. मि. कोल्हटकर हे हल्ली नागपुरात असतात. प्रसिद्ध विष्णुशास्त्री पंडित हे वारल्यापासून होणारे पुनर्विवाह काही मासलेदार होऊ लागले आहेत. यांस आता हिंदुशास्त्राप्रमाणे मुहूर्त वगैरे लागत नाही. इतकेच नव्हे तर हिंदु तिथीचीही आवश्यकता न लागता इंग्रजी तारखेवरच दडपू लागले आहेत. व त्यांस हिंदु विवाहरीतीची तर गरजच नाही.'

शाळेची स्थापना व तिचा प्रारंभ मुन्शी जमालुद्दीन यांच्या वाड्यात झाला. त्यामुळे त्यावेळी शाळा जमालुद्दीन यांच्या वाड्यातच भरत असे. ही जागा मध्यवस्तीपासून दूर व अतिशय गैरसोयीची असल्यामुळे, तेव्हा बोर्डिंग स्कूल असलेल्या सध्याच्या इमारतीचा पश्चिमेकडील चौक शाळेकरिता देण्यात यावा, अशी कार्यकारी मंडळाने शिक्षणखात्याकडे मागणी केली; आणि त्यानुसार शाळेचे इन्स्पेक्शन होऊन पश्चिमेकडील चौकाची जागा शाळेला देण्यात आली. जूनच्या अखेरीस शाळा सध्याच्या इमारतीत, म्हणजे दुसऱ्या रघुजीची चौथी अत्यंत कर्तबगार पत्नी महाराणी बाकाबाई हिच्या वाड्यात आली.

शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक श्री. दे. मो. दवंडे यांनी शाळेच्या दप्तरातील जुन्या कागदपत्रांवरून जी माहिती 'तरुण भारता'च्या ५ डिसेंबर १९६७ च्या अंकात प्रसिद्ध केली आहे तिच्यावरून व शाळेच्या स्मृतिग्रंथावरून असे कळते की, इन्स्पेक्टर जनरल ऑफ एज्युकेशन यांनी शाळेची तपासणी करून शाळेला एखादा चांगला मुख्याध्यापक नेमावा, अशी सूचना केली. त्याप्रमाणे ७ सप्टेंबर १८७० रोजी (१) श्री. बापुराव आर. पटवर्धन, (२) श्री. भार्गव लक्ष्मणराव गाडगीळ व (३) श्री. वासुदेव बल्लाळ खेर या तीन सभासदांच्या समितीची सभा भरून, ह्या समितीने श्री. वामन महादेव कोल्हटकर हे मुख्याध्यापकपदासाठी योग्य आहेत, अशी शिफारस केली.

त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात स्कूल कमिटीची सभा झाली. त्या सभेत श्री. दाजीसाहेब बुटी, श्री. दादाजी धारकर, श्री. वासुदेव बल्लाळ खेर, रावसाहेब नाना अहीरराव, श्री. बापुराव, श्री. भार्गवराव, कांजीलाल इत्यादी सभासद उपस्थित होते. या सभेने, तीन सभासदांच्या समितीने सुचविल्याप्रमाणे श्री. वामनराव कोल्हटकर यांची शाळेचे मुख्याध्यापक म्हणून (दरमहा १२० रुपयांवर) नेमणूक केली.

८ ऑक्टोबर १८७० रोजी शाळेने, मुंबई येथे एल्फिन्स्टन कॉलेजात विद्यार्जन करीत असलेल्या वामनरावांना नियुक्तीचे पत्र पाठविले; व १५ ऑक्टोबर १८७० रोजी त्यांनी सिटी स्कूलच्या मुख्याध्यापकपदाची सूत्रे हाती घेतली.

अशा रीतीने श्री. वामनराव कोल्हटकर हे नागपूरला आले. वामनराव हे कोल्हटकर घराण्यातले नागपूरला येणारे पहिलेच, अशी काही लोकांची समजूत आहे. पण, ती बरोबर नाही. इ. स. १७४२ ते १७४८ या काळात पहिल्या रघुजीने बंगालवर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांचा मुख्य नेता, पराक्रमी सेनानी व प्रत्यक्ष समरांगण गाजविणारा वीर भास्करराम कोल्हटकर हा नागपूरला येणारा कोल्हटकर-घराण्यातला पहिला पुरुष होय. भास्करराम आणि कोन्हेरराम हे दोघे कोल्हटकर बंधू पांडववाडी-वाई येथून पहिल्या रघुजीबरोबर नागपुरास आले. कै. तात्यासाहेब कोल्हटकर हे त्याच वाईच्या घराण्यातील होत. भास्कररामाचे निवासस्थान हल्लीच्या वेदशाळेच्या ठिकाणी असावे, असे नागपूरचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. दे. गो. लांडगे यांनी लिहून ठेवले आहे.[3]

वामनरावांची कारकीर्द इ. स. १८७० ते १८७२ पर्यंत झाली. त्यांच्या कारकीर्दीत १८७१ मध्ये शाळेची बुधवारी पेठेत एक शाखा निघाली. या शाळेचे हेडमास्तर श्री. वासुदेव बळवंत हे होते.

वामनरावांनी १८७२ मध्ये शाळेच्या नोकरीचा राजीनामा दिला. "शिक्षक या नात्याने त्यांचा लौकिक चांगला झाला, पण पुढे त्यांचा न्यायखात्यात शिरकाव झाल्यामुळे ती नोकरी त्यांनी सोडून दिली" असे अच्युतराव कोल्हटकरांनी लिहिले आहे.[4]

वामनरावांच्या नील सिटी हायस्कूलमधील कार्यकालाची व त्यावेळी शाळेच्या कार्यकारी मंडळात सभासद कोण होते, याची वरीलप्रमाणे माहिती मिळते. पण, त्या काळात वामनरावांचे निवासस्थान कोणते होते, याचा मात्र त्यावरून काहीच थांगपत्ता लागत नाही !

नागपूर महानगरपालिकेत जन्मनोंदीच्या रेकॉर्डमध्ये श्रीपाद कृष्णांचा जन्म कोणत्या मोहल्ल्यात आणि कोणाच्या घरी झाला याची माहिती मिळण्याचा संभव आहे, असे वाटल्यावरून, महानगरपालिकेने १८७१

---

३ 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' (१९५४), पृ. १४.

४ 'अच्युतराव कोल्हटकर स्मारक-ग्रंथ', भाग २ रा, पृ. ७४.

सालचा जन्मनोंदीचा रेकॉर्ड तपासावा, अशी विनंती प्रस्तुत लेखकाने दि. १९ ऑगस्ट १९६७ च्या 'तरुण भारतात'त एक पत्र लिहून प्रशासकांना केली होती. त्यांचे पुढीलप्रमाणे उत्तर आले—

कार्यालय, नगर प्रशासक, नागपूर
(नागपूर महानगरपालिका)
क्र. ज. सं. ४७४. नागपूर, दिनांक २१-९-६७

प्रिय श्री. डोळके,

दिनांक १९ ऑगस्ट, ६७च्या दै. 'तरुण भारता'मध्ये आपले एक पत्र प्रकाशित झाले होते. त्यात आपण नागपूर महानगरपालिकेचे प्रशासक मा. श्री. दिनकरराव देशमुख यांना प्रार्थना केली होती की, त्यांनी कै. श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नागपूर येथील जन्म-ठिकाणाबाबत पत्ता लावण्यात मदत करावी.

त्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या व्हायटल स्टॅटिस्टिक्स युनिटच्या जुन्या रेकॉर्डची तपासणी केली गेली. परंतु आपणांद्वारे निर्देशित वर्षाचे रेकॉर्ड आमचेकडे उपलब्ध नाही. आमच्या युनिटमध्ये सन १८९८च्या नंतरचा रेकॉर्ड उपलब्ध आहे, जेव्हा की कै. श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म १८७१मध्ये झाला होता.

सधन्यवाद.

भवदीय,
एस. के. शर्मा
जनसंपर्क अधिकारी,
नगर प्रशासन, नागपूर.

श्रीपाद कृष्णांच्या जन्मस्थळासंबंधी अधिकृत नोंद सापडण्याचे सर्व मार्ग अशा रीतीने बंद झाल्यावर वृद्धांना वाट विचारीत व नागपूर नगरीतील तत्कालीन घरांचा मागोवा घेत श्रीपाद कृष्णांचे जन्मस्थान शोधून काढणे, एवढा एकच मार्ग शिल्लक उरतो.

या बाबतीत नागपूरचे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. रामदास परांजपे यांनी सांगितलेल्या स्वतःच्या वडिलां-विषयीच्या, म्हणजे नागपुरातील जुन्या पिढीतले राष्ट्रीय वृत्तीचे विख्यात कार्यकर्ते डॉ. ल. वा. ऊर्फ बाळासाहेब परांजपे यांच्या विषयीच्या आठवणी महत्त्वाच्या ठरतात. प्रा. घोंगे यांनी त्या प्रकाशात आणल्या आहेत. मीही या बाबतीत रामदास-पंतांची मुलाखत घेतली आहे. नागपूरला व्यंकटेश थिएटरमध्ये एकदा राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कसलीतरी सभा होती. पण राजेसाहेब एनवेळी सभेला उपस्थित न राहू शकल्याने चालकांनी डॉ. लक्ष्मणराव परांजपे यांना त्या सभेचे अध्यक्ष केले. त्यावेळी भाषणाच्या प्रारंभी डॉ. परांजपे म्हणाले, 'आज राजे लक्ष्मणराव हे या सभेचे अध्यक्ष व्हायचे होते; पण त्यांच्या अनुपस्थितीमुळे आपण या लक्ष्मणाला त्या जागेवर बसविले आहे. आमच्या दोघांच्या नावातच साम्य आहे असे नाही, तर आमच्या दोघांचाही जन्म १८७७ सालचाच आहे. इतकेच नव्हे तर आमचा दोघांचाही जन्म 'महाला'त झालेला आहे. त्यांचा जन्म भोसल्यांच्या महालात झाला व माझा जन्म बाकाबाईच्या महालात झाला, एवढाच काय तो फरक!'

डॉ. लक्ष्मणराव परांजपे यांचे हे भाषण नाग-पुरात अनेकांच्या स्मरणात आहे. डॉ. रामदास यांना ही स्मृती अगदी ताजी असल्यासारखे दिसले. त्यांच्या सांगण्यावरून असे कळते की, त्यांच्या तीर्थरूपांचा जन्म, २८ नोव्हेंबर १८७७ रोजी, सध्या जेथे सिटी-स्कूल आहे, त्या महाराणी बाकाबाईच्या वाड्यात झाला. त्यावेळी रामदासपंतांचे पितामह वासुदेवराव हे बाकाबाईच्या वाड्यात पूर्वेकडील भागात दुसऱ्या मजल्यावर बिऱ्हाड करून राहत असत. त्यांच्या शेजारीच वामनराव कोल्हटकरांचे बिऱ्हाड होते. दामले, जोशी अशी आणखीही काही बिऱ्हाडे याच जागेत त्यांच्या शेजारी होती. वासुदेवरावांनी ही जागा बहुधा १८८२ साली सोडली; व नंतर ते वर्धेला वकिली करण्याकरिता गेले. वासुदेवरावांनी इ. स. १८८४ साली वर्धेला घर बांधल्याची नोंद श्री. दत्तोपंत दाते यांच्या वडिलांच्या दैनंदिनीत आहे. वर्धेला वकिलीकरिता जाण्याच्या आधी वासुदेवराव हे नागपूर येथे हिस्लॉप कॉलेजिएट शाळेत संस्कृतचे शिक्षक होते व बाकाबाईच्या वाड्यात पूर्वेकडील भागात दुसऱ्या मजल्यावर राहत होते. नागपूर येथील प्रसिद्ध संस्कृत पंडित व मॉरिस कॉलेजचे पहिले प्राचार्य महामहोपाध्याय केशव गोपाळ ऊर्फ बापूजी ताम्हण हे त्यावेळी हिस्लॉप कॉलेजिएट शाळेत वासुदेवरावांचे विद्यार्थी होते.

कोल्हटकर व परांजपे यांच्यातील घरोब्यासंबंधी डॉ. रामदास यांनी जी आठवण सांगितली, तीही महत्त्वाची आहे. वासुदेवराव वर्धेला वकिली करावयास गेल्यानंतर मधुमेहामुळे त्यांच्या हाताला गँग्रीन झाले. त्यावेळी त्यांना डॉ. रेवी या मिशनरी डॉक्टरच्या दवाखान्यात ठेवले होते. त्या अर्धबेशुद्ध अवस्थेत डॉ. रेवी हा तासन्‌तास वासुदेवरावांशी बोलत बसत असे व त्यांच्यासमोर कागद आणीत असे. आपण ख्रिश्चन झालो आहोत असे वासुदेवरावांनी त्या कागदावर बेशुद्धावस्थेत लिहून द्यावे, असा डॉ. रेवीचा डाव होता. वासुदेवरावांच्या पत्नीने (यांना कुटुंबात 'आई' म्हणून संबोधीत असत) तो डाव ओ खला व नागपूरला वामनराव कोल्हटकरांना तार करून वासुदेवरावांना नागपूरला घेऊन जायला सांगितले. त्याप्रमाणे वामनराव वर्धेला गेले व वासुदेवरावांना नागपूरला घेऊन आले. कोल्हटकर व परांजपे या कुटुंबांतील सौहार्दावर प्रकाश पाडण्याकरिता ही आठवण पुरेशी आहे.

परांजपे, कोल्हटकर, जोशी इत्यादी मंडळी शेजारी–शेजारी राहत व ती सिटी स्कूलच्या दुसऱ्या मजल्यावर कुठेतरी राहत, अशी माहिती नागपुरातील एक वयोवृद्ध इंजीनियर श्री. वझे यांनीही दिली. श्री. वझे यांचे तीर्थरूप श्री. दिवाकरपंत हे सिटी स्कूलच्या स्थापनेपासून चाळीस वर्षेपर्यंत तेथे गणिताचे नामांकित शिक्षक होते.

मुन्शी जमालुद्दीन यांच्या वाड्यात स्थापन झालेल्या 'ग्रँट इन एड अँग्लो–व्हर्नाक्युलर स्कूल'ला बाकाबाईच्या वाड्यातील पश्चिमेकडच्या चौकाची जागा १८६९ च्या जूनमध्ये मिळाली; व जूनमध्येच ही शाळा जमालुद्दीन यांच्या वाड्यातून सध्याच्या इमारतीत आली. 'सिटी स्कूल' हे नाव या शाळेला १८७० साली मिळाले. ही शाळा या वाड्यात आली तेव्हा वाड्याच्या पूर्वेकडील भागात वरच्या मजल्यावर काही कुटुंबे बिऱ्हाड करून राहत असावीत. पाताळेश्वराजवळील दरवाजा हे या वाड्याचे प्रवेशद्वार, व पूर्वेकडील केळीबाग ही या वाड्याची मागची बाजू होय. पश्चिमेकडील चौक हा या वाड्याचा दर्शनी भाग. हा भाग दर्शनी म्हणून त्यावेळी रिकामा असावा व म्हणूनच सिटीस्कूलने शाळेकरिता त्याची मागणी केली असावी. कोणत्याही वास्तूच्या वैभवाची वाताहत झाली की, इतरांना निवासासाठी जी जागा मिळते, ती प्रथमतः त्या वास्तूच्या मागील बाजूस असते. सिटी स्कूलला बाकाबाईच्या वाड्याचा पश्चिमेकडील भाग मिळण्याच्या आधीपासूनच वाड्याचा पूर्वेकडील तळमजला वसतिगृहाने आणि दुसरा मजला बिऱ्हाडांनी व्यापलेला असावा. पुण्या–मुंबईकडून जी मंडळी त्या काळात नागपूरला येत, ती येथे निवासाला राहत असावीत. येथील निवासाकरिता सिटी स्कूलशी त्या व्यक्तीचा संबंध असलाच पाहिजे असे नव्हते. कारण, सिटी स्कूल या जागेत येण्याच्या आधीपासूनच पूर्वेकडील भागाच्या दुसऱ्या मजल्यावर बिऱ्हाडे राहत होती. वासुदेवराव परांजपे हे काही सिटीस्कलमध्ये शिक्षक नव्हते. तरीही त्यांना ही जागा निवासाकरिता मिळाली होती; व वामनराव कोल्हटकर येथे येण्याच्या पूर्वीपासून वासुदेवराव परांजपे तेथे बिऱ्हाड करून होते. वामनराव हे तर मुळी सिटी स्कूलचे मुख्याध्यापक म्हणूनच येथे आले होते. तेव्हा त्यांना बिऱ्हाडासाठी येथे जागा मिळणे अगदी स्वाभाविक आहे.

त्या काळात पुण्या–मुंबईकडून येणारी मंडळी बाकाबाईच्या वाड्यात बिऱ्हाड करून राहत असावीत याला आणखीही एक कारण आहे, असे मला वाटते. ते असे की, त्या काळात जुन्या नागपुरात बाहेरगावच्या मंडळींच्या निवासाची सोय होईल अशी दुसरी वास्तू नसावी. भोसल्यांचे कारभारी म्हणून अधिकारी असलेल्या मुन्शी, काळू, चिटणवीस, पंडित इत्यादी कुटुंबांचे भव्य वाडे होते; तसेच शिरके, गुजर, मोहिते, अहेरराव प्रभृती पहिल्या रघूजीबरोबर इकडे आलेल्या सप्तकुळीतील काही मराठ्यांचेही स्वतंत्र वाडे होते; व त्यात ती ती कुटुंबे नांदत होती. त्यांच्या वाड्यांत पुण्यामुंबईकडून येणाऱ्यांना बिऱ्हाडाकरिता जागा मिळणे शक्य नव्हते. महाराणी बाकाबाईच्या वाड्याचे वैभव मात्र यावेळी संपले होते. इ. स. १८५३ मध्ये डलहौसीने नागपूरचे राज्य खालसा केल्यावर, द्वितीय रघुजीची चवथी पत्नी (तिसरे लग्न रुईच्या झाडाशी) महाराणी बाकाबाई हिच्या पत्रव्यवहाराला व प्रयत्नांना न जुमानता, महाल, आणि बाकाबाईचा वाडा ज्या नावाने इतिहासात ओळखला जातो ती 'नवी हवेली' इंग्रजांनी अगदी पेंढाऱ्यांप्रमाणे लुटली. तेथील तळघरातील हिरे, माणके, रत्ने आणि सुवर्णमोहराच काय पण पागेतील घोडेसुद्धा इंग्रजांनी लुटून

अनुक्रमणिका

नेले. १८५८ मध्ये बाकाबाईचा मृत्यू झाल्यावर तर या 'नव्या हवेली'ची निर्नायक अशी अवस्था झाली आणि तिच्या दगडविटांच्याही दुर्दशेला प्रारंभ झाला. पुण्यामुंबईकडून नागपूरला पहिल्यानेच येणाऱ्या मंडळींना निवासाकरिता या वाड्यात जागा मिळणे सुलभ होते. म्हणून ते या वाड्यातच उतरत व बिऱ्हाडेही करून राहत, असे वाटते. शुक्रवार दरवाजापासून तो नगारखान्याच्या दरवाजापर्यंत आणि पाताळेश्वराच्या दरवाजापासून तो आईतवार दरवाजापर्यंत त्यावेळी असलेल्या वास्तु डोळ्यांपुढे आणल्या, तर बाकाबाईचा लुप्तप्रभ, निर्नायक वाडा हीच एक वास्तु अशी आढळते की जेथे बाहेरगावाहून येणाऱ्या मंडळींना निवासाकरिता जागा मिळण्यासारखी परिस्थिती होती. नागपूरचे इतिहाससंशोधक या बाबतीत अधिक प्रकाश टाकू शकतील. या वाड्यात तेव्हा बोर्डिंग स्कूल असावे, सिटी स्कूलने शाळेसाठी या वाड्यातील जागेची मागणी करावी व १८८५ साली मॉरिस कॉलेजही याच जागेत सुरू व्हावे याचे दुसरे कोणते कारण सांगता येईल ?

बाकाबाईचा वाडा या काळात गतवैभवाची स्मृती आठवीत होता आणि नव्या काळाचे स्वागतही करीत होता. बाकाबाईसारख्या महत्त्वाकांक्षी राणीचे राजकारण ज्याने केले, तोच वाडा इंग्रजी विद्येचे स्वागत करायलाही पुढे सरसावला होता. भोसलेशाहीतील जुने वैभव आणि राजकारण व इंग्रजी अमलातील नव्या विद्या आणि कला, भोसलेशाहीतील स्वाभिमान आणि नव्या काळातील राष्ट्रीय वृत्ती यांचा संगम असलेली अशी वास्तु नागपुरात दुसरी कोणतीही नाही. सेनाधुरंधर मुधोजी, द्वितीय रघुजी व राजकारणधुरंधर बाकाबाई यांच्या काळात ब्राह्मणांच्या वेदमंत्रांनी निनादित झालेली ही वास्तु सिटी स्कूलमधील ज्ञानसत्रातील भाषणांनी व व्याख्यानांनी अजूनही दुमदुमत आहे. लाली आणि परज या नृत्यांगनांचे नृत्यकौशल्य ज्या वास्तूने पाहिले, तिनेच सिटी स्कूलच्या व प्रारंभकाळातील मॉरिस कॉलेजच्या स्नेहसंमेलनांतील रंगमंचावर अभिनयाचे धडे गिरविणाऱ्या कोवळ्या कुमारांच्या नाटचकौशल्याचेही कौतुक केले. ज्या वाड्याने केळीबागेच्या मंदिराला स्वतःच्या पोटात स्थान दिले व पुराण-कीर्तन-प्रवचनांचे ज्ञानसत्र प्रारंभिले, त्याच वाड्याने सिटी स्कूल व मॉरिस कॉलेज या विद्यामंदिरांना पोटाशी घेऊन ज्ञानाची ज्योत अखंड तेवत ठेवली. या वास्तूचे इतिहासातले नाव 'नवी हवेली' असे आहे. नव्या ज्ञान-विज्ञानाचे स्वागत करणारी व या ज्ञानोपासकांना स्वतःची दालने खुली करून देणारी त्या काळातली ही 'नवी हवेली' च आहे खरोखरी ! नव्याजुन्याचा संगम असलेली, जुन्या वैभवाच्या स्मृतीने अश्रु ढाळणारी पण नव्या विद्यांचे आनंदाने स्वागत करणारी, एका डोळ्याने स्वतःच्या गतकालाचे उदास विहंगमावलोकन करणारी पण दुसऱ्या डोळ्याने नव्या काळाचे तेज स्वतःत साठविणारी अशी दुसरी वास्तु नागपुरात नाही. या दृष्टीने नागपूरच्या इतिहासात ही वास्तु अद्वितीय ठरते, आपल्या वैशिष्टचाने एकमेवत्वाचे बिरुद धारण करते !

१८६९ साली सिटीस्कूलला या वाड्याचा पश्चिमभाग मिळाला. त्याचा पूर्वभाग १८८२ साली शाळेला मिळाला. पूर्वभाग शाळेला मिळाल्यावर मात्र या भागात वसती करून असणारी बिऱ्हाडे अन्यत्र गेली असावीत. वामनराव कोल्हटकर हेही या जागेत १८८२ पर्यंत राहत असावेत. त्यांनी १८७२ साली शाळेच्या नोकरीचा राजीनामा दिला, कारण १८७२ साली त्यांची मुन्सफ म्हणून तहसिलीत नेमणूक झाली. तहसिल कचेरीही त्यावेळी बाकाबाईच्या वाड्यातच कोतवालीच्या पार्श्वभागी असलेल्या देवघरात होती. इ. स. १८९५ साली तहसिल कचेरीचा काही भाग ढासळून ती मोडकळीस आली, म्हणून ती अन्यत्र हलविण्यात आली; व तो भाग शाळेला मिळाला. अशा रीतीने १८९५ साली बाकाबाईचा संपूर्ण वाडा शाळेच्या स्वाधीन झाला.

वामनराव कोल्हटकरांनी १८७२ साली शाळेच्या नोकरीचा राजीनामा दिलेला असला व त्यांची मुन्सफपदी नियुक्ती झालेली असली तरी त्यांचे निवासस्थान मात्र, १८८२ पर्यंत, बाकाबाईच्या वाड्यातील पूर्वेच्या माडीवरच असावे. मुन्सफकचेरी त्याच वाड्यात असल्यामुळे त्याच ठिकाणी राहणे वामनरावांना सोयीचेही होते. शिवाय, वामनरावांनी १८७२ साली शाळेच्या नोकरीचा राजीनामा दिलेला असला, तरी सिटी स्कूलशी त्यांचा संबंध कायमच होता असे दिसते. कारण, ३ फेब्रुवारी १८८२ रोजी भारत सरकारने जे 'एज्युकेशन कमिशन' नेमले होते, त्या कमिशनसमोर वामनराव कोल्हटकरांनी 'Managing Member,

(पुढील मजकूर पान ७९ वर)

कोल्हटकरांची पांच पत्रे

['युगवाणी'च्या या अंकासाठी आमच्या मुंबईच्या सन्मान्य मित्रानी आपल्या संग्रही असलेल्या कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या पत्रांतील पांच पत्रे 'युगवाणी'चे संपादक श्री. शंकरराव शास्त्री यांच्याकडे मोठ्या अगत्याने पाठवली. ती पत्रे कालानुक्रमाने खाली दिली आहेत. त्याचप्रमाणे पत्रातील उल्लेख आणि संदर्भ विशद करण्यासाठी प्रत्येक पत्राखाली मी टीपाही दिलेल्या आहेत. —ग. त्र्यं. माडखोलकर]

पत्र पहिले

तेल्हारा
१०-१-०४

सा. न. वि. वि. आपले कार्ड पावले. मजकूर वाचून आनंद झाला. कंपनीची व आपली ओळख झाली आहे तिचा आपणांस पुढे उपयोग होईल. रा. रा. शंकरराव मुजुमदार हे स्नेहास फार चांगले आहेत. तसेच रा. जोगळेकरही फार योग्य आहेत. रा. देवलांनी आपणास मोकळ्या मनाने सूचना केल्या ही सर्वात विशेष गोष्ट आहे. रा. कुलकर्णी यांच्या 'सुमति' नाटकाचे स्वागत त्यांजकडून फार निराळ्या प्रकाराने झाले असे मी ऐकितो. मलाही प्रथम असाच अनुभव आला होता. हल्ली मात्र ते (देवल) मजशी स्नेहभावाने वागत असतात. हल्ली मी 'ग्रहलाघव' वाचीत आहे. त्यावर मल्लारिकृत टीका सुमारे १५ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली आहे. ती माझ्या नुकतीच पाहाण्यात आली. ती मुंबई येथे मिळते की काय व मिळत असल्यास किंमत काय हे कळवावे. कळावे हे विनंती.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

टीपः—कोल्हटकरांशी श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा परिचय, १९०२ च्या डिसेंबरमध्ये नाताळात, मुंबई येथे नाटकगृहात झाला; व तेव्हापासून त्या दोघांचा जो पत्रव्यवहार सुरू झाला, तो १९१८ च्या जूनमध्ये त्यांचे संबंध तुटेपर्यंत चालू राहिला. "माझे मुंबईतील कोणतेही काम असो, गुर्जरांनी तावडतोब करावे", असे उद्गार कोल्हटकरांनी त्यांच्या या कालावधीतील आपल्यावरील भक्तीविषयी 'आत्मवृत्ता'त काढलेले आहेत. त्या कालावधीतील हे सुरुवातीचे पत्र दिसते.

(पान ७८ वरून)

City Aided High School, Nagpur' या नात्याने साक्ष दिल्याची नोंद त्या कमिशनच्या १८८३ साली प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टात आहे.[५] १८८२ साली बाकाबाईच्या वाड्याचा पूर्वभाग शाळेला मिळाला. तेव्हा तिथली जी बिऱ्हाडे अन्यत्र वसतीसाठी गेली, त्यांत वामनरावांनाही ती जागा सोडावी लागली. याच साली वासुदेवराव परांजपे यांनीही ही जागा सोडली व ते वर्धेला वकिली करण्यासाठी गेले, अशी माहिती मिळते.

सारांश, इ. स. १८७० ते १८७२ च्या दरम्यान वामनराव कोल्हटकर हे नील सिटी हायस्कूलच्या पूर्वेच्या चौकावरील दुसऱ्या मजल्यावर उत्तरेच्या बाजूला राहात होते; व तेथेच त्यांचे पुतणे श्रीपाद कृष्ण यांचा जन्म झाला.

नागपूर,
दि. २५ मे १९७०

---

५. Report of the Indian Education Commission, Page 632. (Calcutta : Printed by the Superintendent of Government Printing Press, India-1883).

१८९९ साली कोल्हटकर वकिली करण्यासाठी तेल्हारा येथे येऊन स्थायिक झाले. तेथे आल्यावर त्यांनी ज्योतिर्गणिताचा व्यासंग सुरू केला. श्री. गुर्जर यांना लिहिलेल्या या पत्रात 'ग्रहलाघव' या ज्योतिषविषयक ग्रंथावरील मल्लारिकृत टीकेचा उल्लेख आहे. ही मल्लारिदैवज्ञाची टीका बहुधा श्री. गुर्जर यांच्या मार्फत कोल्हटकरांनी मुंबईहून आणवली असावी.

या पत्रात कै. गो. ब. देवल यांनी श्री. गुर्जर यांना ज्या त्यांच्या नाटकाबद्दल मोकळ्या मनाने सूचना केल्याचा उल्लेख आहे, ते नाटक 'संगीत प्रणयमुद्रा' हे होय. श्री. गुर्जर यांचे हे नाटक १९०५ साली प्रसिद्ध झाले. ते त्यांनी कोल्हटकरांना अर्पण केलेले होते.

कै. नानासाहेब जोगळेकर हे किर्लोस्कर नाटक मंडळीतील श्रेष्ठ संगीत नट असून, मंडळीचे एक मालकही होते. कै. शंकरराव मुजूमदार हेही जुन्या काळातले प्रमुख नट, ग्रंथकार, 'रंगभूमी' मासिकाचे संपादक आणि मंडळीचे या वेळी व्यवस्थापक-मालक होते.

या पत्रात उल्लेखिलेले 'संगीत सुमति' हे नाटक कोल्हटकरांचे समकालीन नाटककार श्री. शं. वि. कुळकर्णी यांचे होय. या नाटकाविषयी देवलांनी दिलेले प्रतिकूल मत लक्षात न घेता, किर्लोस्कर नाटक मंडळीने, १९०४ साली, ते रंगभूमीवर आणले. (आत्मवृत्त, पान ४५, ५९, ६० आणि १२२).

पत्र दुसरे

खामगाव
१०-९-११

सा. न. वि. वि.

आपले पत्र पावले. 'प्रेमशोधना'च्या पद्यांसंबंधाने आपण ५-१० तरी मार्मिक सूचना केल्या होत्या; व म्हणून मी आपले आभार मानिले आहेत यात मी काही विशेष केले असे मला वाटत नाही. शिवाय 'प्रेमशोधन' बरे झाले आहे असे मला प्रथम आश्वासन देणारांतही आपण होतांच; व असे आश्वासन मिळाल्यामुळे मला बरेच उत्तेजन आले. तेव्हा ते बाहेर येण्याचे बरेच श्रेय आपणाकडे आहे यात संशय नाही. 'प्रेमशोधन' नाटक माझ्या अजमासापेक्षा बरेच लोकप्रिय झाले आहे असे दिसते. या लोकप्रियतेचे एक कारण, ते बसविताना रा. खाडिलकर यांनी जी मेहनत घेतली, ती होय, हे आपणासही कबूल करावे लागेल. असे असता त्यासंबंधाने व किर्लोस्कर मंडळीसंबंधाने आपल्या मनात इतका द्वेष उत्पन्न व्हावा हे मी आपले स्वतःचे दुर्दैव समजतो. मला विशेष वाईट वाटण्याचे कारण हे की, दोन्ही पक्षांमधील वैरभाव कोणत्याही साधनांनी दूर करण्यासारखा नाही. जे हृदय एकाविषयी इतके स्नेहार्द्र आहे, ते इतरांविषयी इतके द्वेषपूर्ण का व्हावे, ही एक आचंबा करण्यासारखीच गोष्ट आहे. द्वेषापासून कधी सुख होत नाही याचा मला पूर्ण अनुभव आलेला असल्यामुळे, आपणामधील वैमनस्य जेव्हा नाहीसे होईल, तो सुदिन, असे मी समजतो.

'मनोरंजना'चा गेल्या महिन्याचा अंक बराच चांगला निघाला आहे, असे माझे मत आहे. आपला लेख बंगाली लेखाच्या आधाराने लिहिला असावा, असे मला वाटले. त्यातील शेवट चमत्कृतिजनक आहे. परंतु पाल्हाळ जरा अधिक झाल्यासारखा वाटतो. 'गणेशचतुर्थी' व 'श्रावणी' हे लेख ज्यांना धर्माच्या विरुद्ध आहेत असे वाटते, त्यांना हाही तसाच वाटल्यास नवल नाही. 'केसरी'तील टीका रा. केळकरांची नसण्याचाही संभव आहे.

आपण 'लीलावती' वाचली असेलच. वाचून आपले मत काय झाले, ते सवडीप्रमाणे कळवावे.

ज्योतिषावरील निबंधाच्या छपाईचे काम फार सावकाश परंतु समाधानकारक रीतीने चालले आहे. यापेक्षा जलद चालले असते, तर माझ्या हल्लीच्या मनःस्थितीत मला फार त्रास झाला असता. कारण माझे डोके इतके हलके झाले आहे की, ५ मिनिटे जरी विचार करण्याचे काम पडले, तरी ते गरम होऊन जाते; व क्षुल्लक कारणानेही त्याची चलबिचल होऊन जाते. निबंध पूर्ण झाल्यावर काही वर्षे मला पूर्ण विश्रांती घ्यावी लागणार असे दिसते.

या मनःस्थितीमुळे मला कोर्टाचे कामही फार त्रासदायक वाटू लागले आहे. ते काम झाल्यावर दुसऱ्या कोणत्याही कामास उत्साह राहात नाही. पत्रे लिहिणेही जिवावर येते. अशा स्थितीत महाराष्ट्र नाटक मंडळीकरिता गद्य नाटक लिहिण्याचे अभिवचन कसे पार

पडणार याची शंका वाटते. अजून मी त्याच्या संविधानकाची दिशाही ठरविली नाही. पुढील मे महिन्यापर्यंत मन पूर्णपणे प्रसन्न झाल्यास त्या महिन्यात ते नाटक लिहिण्याचा माझा विचार आहे. यापेक्षा अधिक खात्रीलायक काहीच लिहिता येत नाही.

रा. रा. वापट यांचा पूर्वीचाच पत्ता आहे :— सबजज्ज, नरसिंगपूर, Central Provinces.
क. लो. अ. हे वि.

आपला
श्री कृ. कोल्हटकर

ता. क. आपल्या नाटकाची अर्पणपत्रिका आपल्या पत्नीसच उद्देशून असावी असे वाटते.

श्री. कृ. कोल्हटकर

टीपः— हे पत्र श्री. गुर्जर यांना लिहिलेले आहे. १९०६ साली किर्लोस्कर मंडळीने रंगभूमीवर आणलेल्या कोल्हटकरांच्या 'संगीत मतिविकार' या नाटकातील नऊ पदे गुर्जरांनी केलेली होती. 'प्रेमशोधन' नाटक १९०८ च्या एप्रिलमध्ये कोल्हटकरांनी लिहिले; व मेमध्ये मुंबईस आल्यावर श्री. हिराबाई पेडणेकर आणि श्री. गुर्जर यांना ते त्यांनी दाखवले. "त्या दोघांनी अनुकूल अभिप्राय दिला, तेव्हा कोठे माझा जीव खाली पडल्यासारखा झाला," असे उद्गार कोल्हटकरांनी 'आत्मवृत्ता'त काढले आहेत. याही नाटकातील पद्यांसंबंधाने श्री. गुर्जर यांनी सूचना केल्याबद्दल कोल्हटकरांनी, त्याच्या प्रस्तावनेत, त्यांचे आभार मानलेले आहेत. या गोष्टीचा उल्लेख या पत्रात सुरुवातीला केलेला आहे. हे नाटक कोल्हटकरांच्या विनंतीवरून खाडिलकरांनी बसवले. म्हणून, त्यांनी त्याच्या लोकप्रियतेचे श्रेय खाडिलकरांना देऊन, या पत्रात त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. (आत्मवृत्त, पान ६० ते ६५)

महाराष्ट्रातील मवाळ–जहालातले पक्षभेद या वेळी विकोपाला गेलेले होते. देवल, कोल्हटकर, गडकरी, गुर्जर प्रभृति नाटककार, लेखक, संपादक हे सुधारणावादी असल्यामुळे जहाल पक्षाविषयी त्यांची भावना अनुकूल नव्हती. श्री. गुर्जर हे या वेळी 'मासिक मनोरंजना'चे सहसंपादक होते. ते मासिक जहाल पक्षाच्या विरुद्ध होते. गद्य नाटककार या नात्याने खाडिलकरांची लोकप्रियता या सुमारास शिगेला पोचलेली असून, त्यांचे 'मानापमान' हे पहिले संगीत नाटक किर्लोस्कर नाटकमंडळी बसवीत होती. अर्थात् त्या नाटकमंडळीतील त्यांचे वाढत चाललेले वजन या सुधारणावादी नाटककारांना आणि त्यांच्या चहात्यांना रुचू नये, हे स्वाभाविक होते. या पक्षद्वेषजन्य वातावरणाचा उल्लेख या पत्रात आहे. कोल्हटकर हे वस्तुतः सुधारणावादी नेमस्तपक्षीय नाटककार असून, खाडिलकर हे त्यांचे प्रतिस्पर्धी समजले जात असत. तरी देखील त्यांनी या वैमनस्याविषयी या पत्रात तीव्र उद्वेग प्रकट केला आहे आणि 'प्रेमशोधना'च्या यशाबद्दल खाडिलकरांना मनःपूर्वक धन्यवाद दिलेले आहेत, ही गोष्ट त्यांच्या सौजन्याची आणि औदार्याची द्योतक आहे.

या पत्रातला 'मनोरंजना'च्या अंकावरील कोल्हटकरांचा अभिप्राय त्यांच्या शिष्यवत्सल मनोवृत्तीचा निदर्शक आहे. आपल्या शिष्याचे प्रत्येक बारीकसारीक लिखाण काळजीपूर्वक वाचून त्यासंबंधीचे आपले मत त्याला स्पष्टपणाने कळवण्याची त्यांची वृत्ती या अभिप्रायात व्यक्त झाली आहे.

'लीलावती' नाटकाचा या पत्रातील उल्लेख अत्यंत सूचक आहे. त्या नाटकाचे लेखक श्री. स. ना. ठोसर आणि त्यांचे स्नेही श्री. ग. स. मराठे यांनी कोल्हटकरांच्या 'गुप्तमंजूष' नाटकावर लिहिलेली उपहासात्मक टीका प्रथम १९०५ साली पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' दैनिकातून आणि नंतर १९०८ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. श्री. मराठे हे विनोदी लेखक आणि अॅक्चुअरी म्हणून प्रसिद्ध होते. श्री. ठोसर यांच्या 'प्रेमाभास' या नाटकावर कोल्हटकरांनी, 'प्रागतिक' या टोपण नावाने, १९१७ साली 'मासिक मनोरंजना'तून केलेली प्रदीर्घ कडक टीका त्या काळात फार गाजली होती. (आत्मवृत्त, ३८, १०६ ते १०८)

'भारतीय ज्योतिर्गणित' हा कोल्हटकरांचा प्रबंध श्री. दामोदर सावळाराम यंदे यांनी १९१३ च्या जूनमध्ये प्रसिद्ध केला. त्याच्या छपाईचे काम वर्षभर हळूहळू चालले होते. या प्रबंधाची पूर्व तयारी आणि लेखन यासाठी जे अपरिमित श्रम कोल्हटकरांना करावे लागले, त्यांचे वर्णन त्यांनी 'आत्मवृत्ता'त केलेले आहे. त्या प्रबंधाला अनुलक्षून पत्रातील हा उल्लेख आहे. (आत्मवृत्त, ४५ ते ४८).

हा उल्लेख 'वधूपरीक्षा' या नाटकासंबंधी आहे. याच अंकात अन्यत्र दिलेल्या श्री. लेले यांच्या पत्रात

त्याच्या लेखनासंबंधी माहिती आलेली आहे. या नाटकाचे लेखन चालू असता, श्री. लेले यांनी कोल्हटकरांभोवती इतका कडक पहारा ठेवला होता की, श्री. हिराबाई पेडणेकर, श्री गडकरी आणि श्री. गुर्जर यांच्यासारख्या त्यांच्या शिष्यांनाही त्यांची भेट घेणे दुष्कर झाले; व त्याची हस्तलिखित प्रत श्री. कारखाननीस यांना देण्याच्या बाबतीत खुद्द कोल्हटकरांशीही श्री. लेले यांचे वर्तन तऱ्हेवाईकपणाचे झाले या त्यांच्या वर्तनात या सर्व मंडळीशी झालेल्या त्यांच्या पुढील बेबनावाचे बीज आहे. कोल्हटकर आणि गडकरी या दोघांशीही श्री. लेले यांचे संबंध याच कारणामुळे बिघडले. (आत्मवृत्त, ८२ ते ८८).

या पत्राच्या ताज्या कलमात गुर्जरांच्या ज्या नाटकाचा उल्लेख केलेला आहे, ते नाटक कोणते आहे, हे समजत नाही. 'संगीत प्रणयमुद्रा' (१९०५), 'संगीत राजलक्ष्मी' (१९२१) आणि 'संगीत नंदकुमार' (१९२५) ही त्यांची फक्त तीनच नाटके प्रसिद्ध आहेत. कदाचित 'राजलक्ष्मी' या नाटकाला अनुलक्षून कोल्हटकरांचे हे विधान असावे. श्री. गुर्जर यांनी 'कंसवध' या आपल्या संकल्पित नाटकाला जसे नंतर 'नंदकुमार' हे सौम्य नाव दिले, तसा प्रकार याही नाटकाच्या बाबतीत घडल्याची माहिती श्री. चिं. ग. कोल्हटकर यांनी मला दिली होती. हे नाटक अंशतः राजकीय स्वरूपाचे असल्यामुळे, त्याचे पहिले कथानक आणि नाव ही आक्षेपार्ह ठरण्याच्या भीतीने, त्यांनी कै. गडकरी यांच्या सल्ल्यानुसार, बदलली व संपूर्ण नाटक पुन्हा लिहिले, अशा प्रकारची ही माहिती आहे. ती जर बरोबर असेल, तर ताज्या कलमातील हे विधान त्या नाटकाबद्दल असावे, असे वाटते. कोल्हटकरांच्या अंदाजानुसार श्री. गुर्जर यांनी हे नाटक जरी आपल्या पत्नीला अर्पण केले नाही, तरी या सुमारास "काळाच्या भयंकर दाढेत सापडलेला माझा प्राण" असे ज्या आपल्या पत्नीच्या आजाराचे वर्णन त्यांनी अर्पणपत्रिकेत केलेले आहे, तो आजार सुरू झालेला होता. त्या दुखण्यातून 'माझा प्राण' वाचवल्याबद्दल त्यांनी डॉ. रा. ह. भडकमकर आणि डॉ. चिं. रा आठवले यांना 'संगीत राजलक्ष्मी' हे नाटक अर्पण केले.

श्री. गुर्जर यांचे हे तयार झालेले नाटक, 'जन्मरहस्य' या आपल्या नाटकाच्या आधी, रंगभूमीवर आणावे, असे कोल्हटकरांनी 'बलवन्त संगीत नाटक मंडळी'चे मालक श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांना वारंवार निक्षून सांगितलेले होते. तरी सुद्धा, त्यांनी ते नाटक बाजूला ठेवून, 'जन्मरहस्य' नाटक आधी रंगभूमीवर आणल्यामुळे, कोल्हटकर आणि गुर्जर या गुरुशिष्यांतील वैमनस्य विकोपाला गेल्याचा वृत्तांत 'आत्मवृत्ता'त आलेला आहे. (आत्मवृत्त, पान ११९ ते १२७; बहुरूपी, पान २०१–२०४).

पत्र तिसरे

खामगांव
२४–२–१८

सा. न. वि. वि.

परवा गंधर्व मंडळीकडून बाकीचे उरलेले रुपये आले. इतके रुपये वेळेवर देण्याचे सामर्थ्य व खरेपणा एका तरी दक्षिणी नाटक मंडळीच्या अंगी आहे हे पाहून अभिमान वाटल्यावाचून राहात नाही. रा. बोडसांचे पत्र आले त्यावरून 'सहचारिणी' मे महिन्यात पुणे येथे बाहेर येणार व जुलईत मुंबई येथे येणार असे दिसते. त्यापूर्वी बडोद्यास महाराजांपुढे एकच प्रयोग काय तो व्हावयाचा आहे. पुण्यास प्रयोग होण्यापूर्वी मला काही तरी तालमी पाहाण्यास सापडतील, ही आनंदाची गोष्ट आहे. नाटक छापावयास वेळही मुबलक मिळेल. पण आता आपणास प्रकाशनाचे काम फायदेशीर वाटेल की काय याची शंका आहे. ते काम आपण न घेतल्यास मीच स्वतः घेण्यास तयार आहे.

'मनोरंजना'च्या गेल्या अंकातील 'मामाचा वारसा' ही गोष्ट चांगली वाटली. मूळ गोष्ट स्ट्रँड मध्ये वाचल्यासारखी वाटते. 'मामा'चा स्वभाव नाटकात आणण्यासारखा आहे. 'उद्याना'च्या गेल्या अंकातील 'माझा मुंबईचा प्रवास' हा विनोदी लेख जरी रा. भाटयांवर टीका म्हणून लिहिलेला आहे, तरी उत्तम साधला आहे. लेखकाचे नाव जरूर कळवावे. रा. बापटांची गोष्ट कशी वाटली ?

क. लो. अ हे वि.

आपला
श्री. कृ. कोल्हटकर

टीपः— हे पत्र श्री. गुर्जर यांना लिहिलेले आहे. 'सहचारिणी', आणि 'परिवर्तन' या दोन नाटकांबद्दल गंधर्व नाटक मंडळीने १९१७ च्या डिसेंबरमध्ये ४,०००

रुपये आणि १९१८ च्या फेब्रुवारीत उरलेले २००० रुपये कोल्हटकरांना पाठवले. या गोष्टीचा उल्लेख या पत्रात आहे. 'सहचारिणी' नाटकाच्या पद्यरचनेची, तालमीची आणि प्रयोगाची हकीकत 'आत्मवृत्ता'त आलेली आहे. श्री. हिराबाई पेडणेकर यांच्या मनात कोल्हटकरांविषयी विकल्प उत्पन्न व्हावयाला गुर्जरांनी या नाटकाच्या बाबतीत लावलेली कलागत कारणीभूत झाली. (आत्मवृत्त, पान १०९, ११८ ते १२४).

'माझा मुंबईचा प्रवास' हा मुंबईच्या 'उद्यान' मासिकातील प्रो. गो. चिं. भाटे यांच्या प्रवासवर्णनाचे विडंबन करणारा लेख प्रो. चिं. वि. जोशी यांनी लिहिला होता.

पत्र चौथे

जळगांव, वऱ्हाड
ता. ५-१-२५

सा. न. वि. वि.

मी मुंबईहून ता. ३१-१२-२४ रोजी रात्री निघालो, तो दुसऱ्या दिवशी दुपारी खामगांव येथे जाऊन पोहोचलो. तेथून मी येथे ता. २-१-२५ रोजी सकाळी येऊन पोहोचलो.

ता. ३१-१२-२४ रोजी दुपारी रा. रा. विठ्ठलराव गुर्जर आपल्या घरी आले असता जो एक अनुचित प्रकार घडला, त्याबद्दल मला किती वाईट वाटले, हे आपल्या व आपल्या पाहुण्यांच्या निदर्शनास आलेच आहे. रा. रा. गुर्जरांनी माझ्या भेटीस येण्याचे सौजन्य दाखविले असता, मजकडून त्यांच्याशीं बोलताना अपमानकारक वाटण्यासारखी शब्दयोजना व्हावी व तिजमुळे बोलण्यावरून बोलणे वाढून आपली अडचणीची स्थिति व्हावी, याबद्दल मला अजून राहून राहून वाईट वाटत आहे. आपणांस पत्र लिहिल्यास मनास हलकें वाटेल, अशा समजुतीने हे पत्र लिहीत आहे.

रा. रा. गुर्जर यांचा अपमान करण्याचा माझा मुळीच उद्देश नसून, उलट त्यांस प्रसन्न करण्याचा होता, हें माझ्या आरंभीच्या वाक्यावरून तरी उघड होत होते; असे मला वाटते. संभाषणांच्या ओघात पुढे माझ्या तोंडून जे उद्गार बाहेर पडले, ते बाह्यात्कारी जरी अपमानकारक वाटले असले, तरी भाषणाचा रोख लक्षात घेता ते तसे वाटण्यासारखे नव्हते. रा. गुर्जरांचा माझ्याशी पूर्वीप्रमाणे सलोख्याचा संबंध असता, तर त्यांनी माझ्या शंकांचा माझ्या उद्देशाहून निराळा अर्थ घेतला नसता किंवा त्यांनी त्याच वेळी मजकडून खुलासा करवून घेतला असता. त्यांना इतका राग का आला, याचे मला आश्चर्य वाटून मी त्याचे कारण समजावून घेतले, हे बरे झाले. कारण त्यामुळे मला माझ्या बोलण्याचा अर्थ तात्रडतोब स्पष्ट करिता आला. माझी विचारसरणी संक्षेपाने खाली लिहिल्याप्रमाणे देता येईल.

'द्रौपदी' नाटकामुळे गंधर्व मंडळीस फार कर्ज करावे लागले. नवीन नाटकावर प्रमाणाबाहेर खर्च होऊन त्या कर्जात भर पडली, हे वाईट झाले. 'आशा निराशा' यासारख्या व्यावहारिक कथानकाच्या नाटकावर खर्च करण्याचे मुळीच कारण नव्हते. रा. गुर्जरांचे नवे नाटक जरी पौराणिक असले, तरी त्यांतील कृष्णादि पात्रांस उपयोगी पडण्यासारखे कपडे 'स्वयंवर' नाटकाकरिता तयार झालेल्या कपड्यांतूनच मिळण्यासारखे असल्यामुळे, त्या नाटकावर खर्च करण्याचेही प्रयोजन नव्हते. बालगंधर्वांचा मधुर कंठ व मधुर चाली यावरच कंपनीस वाटेल तितके उत्पन्न मिळण्यासारखे आहे.

असा माझ्या भाषणाचा मथितार्थ होता. मी 'सामान्य' नाटके व 'पौराणिक' नाटके असा जो भेद केला, तो करिताना 'सामान्य' हा शब्द 'टाकाऊ' या अर्थी योजिला नसून, 'सामाजिक किंवा व्यवहारातील कथानकाची (नाटके)' या अर्थी योजिला होता. रा. गुर्जरांची कविता व गद्य निर्दोष व सरस असते, असे माझे मत असून, ते मी वेळोवेळी प्रकटही केले असता, मी त्यांच्या नाटकासंबंधाने 'सामान्य' हा शब्द 'क्षुद्र' या अर्थी योजीन, हे संभवतच नाही. संभाषणाच्या ओघात शब्दयोजनेकडे रहावे तितके लक्ष राहात नसल्यामुळे एखाद्या वेळी असा प्रमाद होतो; व श्रोत्यांस वक्त्याच्या हेतूचे ज्ञान असल्याम त्याचा वाईट परिणाम होतही नाही. रा. गुर्जरांचे मन मजबद्दल असावे तितके शुद्ध नसल्यामुळे मी तो शब्द कुत्सित भावाने योजिला, असा त्यांचा ग्रह होणे स्वाभाविक होते. मी त्यांच्यासमोर शब्दयोजना अधिक दक्षतापूर्वक करावयास हवी होती यात संशय नाही.

या पुढ त्यांच्याशी बोलताना विषयांची व शब्दांची निवड मी अधिक दक्षतेने करण्याचे आश्वासन देतो.

रा. रा. गुर्जर भेटल्यास त्यांस हे पत्र दाखवावे, अशी विनंती आहे. माझ्या या खेपेच्या वर्तनामुळे त्यांच्या मजविषयीच्या पूर्वग्रहात भर पडू नये, अशी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. ज्या दिवशी सदरहू प्रसंग घडला, त्याच दिवशी त्यांस भेटून त्यांचा गैरसमज दूर करण्याची माझी इच्छा होती. पण वेळेच्या अभावामुळे ती पूर्ण करिता आली नाही. हे पत्र वाचून तरी त्यांचा गैरसमज दूर होईल अशी आशा आहे.

क. लो. अ. हे वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

टीप:—हे पत्र डॉ. अ. ना. भालेराव यांना लिहिलेले असावे. १९२४ च्या सुरुवातीपासून कोल्हटकर मुंबईस त्यांच्याकडे उतरत असत. श्री. गुर्जर यांच्या ज्या पौराणिक नाटकावरील खर्चासंबंधी वाद उत्पन्न होऊन "अनुचित प्रकार घडला," ते नाटक 'नंदकुमार' हे होय. गंधर्व नाटक मंडळीने ता. १८ जानेवारी १९२५ रोजी हे नाटक रंगभूमीवर आणले.

पत्र पाचवे

खामगाव

ता. १४–४–३४

कृ. सा. न. वि. वि.

आपणाकडून 'हृदयशारदा', 'कळयांचे निःश्वास', 'ब्रह्मकुमारी' व 'हिंदोळयावर' ही चार पुस्तके भेटीदाखल आली ती आज सकाळी पावली. त्यांचा साभार स्वीकार केला आहे. या पुस्तकांसंबंधाने मी आजवर बरेच ऐकिले व वाचिले होते; व 'कळयांचे निःश्वास' या पुस्तकाची कर्त्री विभावरी शिरूरकर कोण याबद्दलचा वादही वाचिला होता. ती कर्त्री कुमारी कृष्णाबाई खरे होय असे वाचिल्याचे स्मरते. ती कोण हे जाणण्याची मलाही उत्कंठा आहे. योग्य वाटल्यास ती उत्कंठा पूर्ण करावी. मात्र ती गोष्ट गुप्त असल्यास मला कळवू नये. माझा काही आग्रह नाही. 'कळयांचे निःश्वास' या पुस्तकातील काही गोष्टी वाचिल्या त्यावरून ते पुस्तक पूर्वी नागपुरास वाचिले असावे असे वाटते. सर्व पुस्तके लवकरच वाचण्याचा विचार आहे. प्रकाशन फारच सुंदर झाले आहे. पुस्तकातील मजकूरही सुंदर असेल, अशी आशा आहे. आपला प्रकाशनाचा व्यवसाय चांगला चालला आहे हे पाहून आनंद होतो. आपण काश्मीराहून मजकरिता आणलेला स्लीपर्सचा जोड मी अजून काळजीपूर्वक ठेविला आहे. त्याप्रमाणे ही पुस्तकेही जपून ठेवीन. मी बहुधा ता. २० च्या सुमारास आपल्या बंधूंवरोबर पुण्यास जाईन. तेथे आपली भेट होईलच.

क. लो. हे वि.

आपला

श्री. कृ. कोल्हटकर

टीपः—हे पत्र श्री. ह. वि. मोटे यांना लिहिलेले आहे. त्यांच्याकडून भेट म्हणून आलेल्या पुस्तकांचा उल्लेख त्यांत असून, 'विभावरी शिरूरकर' या लेखिकेसंबंधीची कोल्हटकरांची जिज्ञासा त्यात व्यक्त झालेली आहे. पण, श्री मोटे यांना गौप्यस्फोट करण्याचा आग्रह त्यांनी केला नाही, हा त्यांचा संयम आणि सौजन्यही लक्षात घेण्यासारखे आहे.

कोल्हटकरांच्या काही आठवणी

न्या. डॉ. सर भवानीशंकर नियोगी, नागपूर

माझा कोल्हटकर घराण्याशी संबंध १९०६ सालच्या डिसेंबर महिन्यापासून कै. रा. ब. वामनराव कोल्हटकर यांचे जामात या नात्याने आला. १९०७ साली वामनरावजी पुण्यास शनिवार पेठेत गांधींच्या वाड्यात वरच्या मजल्यावर बिऱ्हाड करून होते. उन्हाळ्याच्या सुटीत (मे महिन्यात) तेथे कै. दिगंबरपंत उर्फ अण्णासाहेब कोल्हटकर, कै. रा. ब. हरिभाऊ मुंजे व मीही उतरलो होतो. थोड्याच दिवसांनंतर कै. तात्यासाहेबही तेथे आले. ते आल्यावर त्यांनी रचलेल्या नाटकांवर व व्यक्तिशः त्यांच्यावर कोणाही ऐकणाऱ्या त्रयस्थाला खवचट व खोडसाळ वाटेल अशा तऱ्हेची टीका त्या वाड्यातील तळमजल्यावर चालू असे. त्या ठिकाणी काही ठरीव मंडळी जमत असत. त्यांचे पुढारी श्री. ग. स. मराठे हे होते. आपण तात्यासाहेबांच्या नाटकांचा सूक्ष्म व चिकित्सक अभ्यास केला आहे, असा त्यांचा दावा होता, असे म्हटले जात असे. या मंडळीने कै. तात्यासाहेबांच्या 'गुप्तमंजूष' या नाटकाची कुचाळी करणारे 'नाट्यकलारुक्कुठार' नावाचे एक पुस्तकही पुढे प्रसिद्ध केले. ते श्री. स. ना. ठोसर यांनी लिहिले होते.

या मंडळीच्या या शिष्टाचाराविरुद्ध वागणुकीमुळे तात्यासाहेबांना फार वाईट वाटे; व त्यामुळे त्यांच्या विनोदी गप्पागोष्टी ऐकण्यास उत्सुक असलेले हरिभाऊ मुंजे हे त्या मंडळीवर खवळून जात. एकदा त्यांनी त्या मंडळीत जाऊन त्यांच्या वर्तनाबद्दल जरा तीक्ष्ण शब्दातच त्यांचा निषेध केला. त्याचा परिणामही इष्ट झाला. मग तात्यासाहेबही त्यांच्याशी मधून मधून गप्पागोष्टी करीत असत.

(२) माझी एलएल. एम.ची परीक्षा झाल्यावर मला तात्यांनी खामगावास नाताळच्या सुटीत बोलावले होते. त्या वर्षी अण्णासाहेब कोल्हटकर व मनोहरपंत गोळवलकरही तेथे होते. तात्यासाहेब तेल्हारा सोडून नुकतेच खामगावास आले होते; व हरिभाऊ मुंजेही तेथे सब-जज्जच्या अधिकारपदावर होते. ते पेटी (हार्मोनियम) वादनपटू होते; व गाण्याबजावण्याचे शौकीन होते. आम्ही एकत्र जमलो म्हणजे गप्पा-गोष्टींबरोबर गाणेबजावणेही होत असे. तेव्हा तात्यासाहेब खुलत असत; व स्वतः काही गाणी निरनिराळ्या तऱ्हेने मात असत. गाण्याच्या नव्या नव्या चाली हुडकून काढण्याचा ते कसून प्रयत्न करीत असत; व हरिभाऊही त्यांना साथ देत असत. ते रंगात आले म्हणजे गाण्यात हिराबाई पेडणेकरची लकब आली पाहिजे, असे म्हणत असत. हरिभाऊही रंगून जाऊन स्वतः गाऊ लागत.

(३) आणखी एक प्रसंग आठवतो तो असा—खामगाव येथे ता. १४ एप्रिल १९०८ रोजी कै. मामा वरेरकर यांच्या 'कुंजविहारी' नाटकाचा पहिला प्रयोग झाला. त्या वेळचा हा प्रसंग. वरेरकर हे स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीच राहात होते. तात्यासाहेब, हरिभाऊ, वरेरकर व मी एकाच रांगेत नाटक पाहाण्यास बसलो होतो. प्रेक्षकवर्गही भरपूर होता. नाटकातील गाणी कर्णमधुर होती; व एकंदर नाटकाचा प्रयोगही मन प्रफुल्लित करण्याजोगा वठला होता. नाटक संपल्यावर आम्ही उठू लागलो, तेव्हा एक इसम आमच्याकडे येऊन त्याने वरेरकरांचे अभिनंदन केले; व हरिभाऊंकडे वळून, "यांच्यासारख्या बड्या अधिकाऱ्यालाही खूष केले", असे म्हणून तो निघून गेला. दुसरे दिवशी रविवारी सकाळी १० च्या सुमारास तो तात्यासाहेबांच्या घरी टापटिपीचा पोषाख चढवून आला. त्या वेळेस हरिभाऊही तेथे होते. तो आला हे पाहिल्यावर तात्या बाहेर गेले. त्यांनी त्यांच्यापुढे रुपयाने भरलेल्या दोन पिशव्या ठेवल्या; व तात्यांना

त्याने हरिभाऊंच्या कोर्टातील आपल्या प्रकरणात वकील-पत्र घेण्यास सांगितले. तात्यानी त्याला निघून जाण्यास सांगितले, तरी तो जाईना. त्यांची बाचाबाची ऐकून हरिभाऊही बाहेर गेले. तात्या गोंधळून गेले होते. पण हरिभाऊंनी जे प्रसंगावधान दाखविले ते प्रशंसनीय होते. त्यांनी म्हटले, " मी सांगतो अशा रीतीने जर ह्या गठड्या देण्यास तयार असशील, तर आमच्या बरोबर मॅजिस्ट्रेटसाहेबांपुढे चल व त्यांच्यासमोर त्या आम्हास दे, " असे म्हणून ते चालू लागले. हे पाहून मात्र तो इसम घाबरला व धूम ठोकून पळाला.

(४) कै. तात्यासाहेबांचे वडील कै. दाजीसाहेब कोल्हटकर यांच्या कुटुंबविस्ताराची माहिती देणारा तक्ता पुढे देत आहे--

दाजीसाहेब=प्रथम पत्नी सौ. सावित्रीबाई

दत्तात्रेय श्रीपाद दिगंबर अनूअक्का=पंडितराव जोशी

द्वितीय पत्नी सावित्रीकाकू

बनूताई बयाताई=मनोहरपंत पिलूताई=श्रीधरपंत

गोळवलकर भागवत

डॉ. फडके (मुंबई)

नारायणराव डॉ. राम मधू

हायकोर्ट जज्ज संगीतदिग्दर्शक

(५) कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांचा जन्म नागपूर येथे त्यांचे पितृतुल्य चुलते रा. ब. वामनराव ऊर्फ नानासाहेब कोल्हटकर यांच्या घरी ता. २९ जून १८७१ रोजी झाला. रा. ब. नानासाहेब हे त्या वेळी येथील नील सिटी हायस्कूलचे हेडमास्तर होते. पुढे त्यांनी सीताबर्डीवर मोदी लाइन ३ मधील घर विकत घेऊन त्याला वाड्याचे प्रशस्त स्वरूप दिले. कै. तात्यासाहेब आणि त्यांचे बंधु, भगिनी वगैरे कुटुंबीय मंडळी नागपुरास आल्यावर याच वाड्यात नेहमी मुक्कामाला असे. कै. तात्यासाहेबांची नानासाहेबांवर निष्ठा होती; व त्यांचाही कै. तात्यासाहेब आणि त्यांचे धाकटे बंधु कै. अण्णा-साहेब यांच्यावर फार लोभ होता. आपल्या मृत्युपत्रात त्यांनी या दोघा बंधूंना आपल्या मिळकतीचे ट्रस्टी नेमले होते. रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या टुंब-विस्ताराची माहिती देणारा तक्ता पुढे देत आहे—

रा. ब. वामनराव

प्रथम पत्नी द्वितीय सौ. जानकीबाई

नीळकंठराव ऊर्फ अप्पा अच्युतराव ऊर्फ भाऊसाहेब

आऊताई ऊर्फ कमलाबाई घारपुरे चारुताई ऊर्फ सरलाबाई नियोगी जिजीताई ऊर्फ शांताबाई मोडक आनंद राजाराम (हयात) = मनूताई (पत्नी)

मला रा. ब. वामनरावांच्या पहिल्या भार्येचे नाव माहित नाही. परंतु त्यांच्या द्वितीय पत्नीचे नाव जानकीबाई होते असे आठवते. त्यांना मी माझ्या लग्नापूर्वी पाहिले होते. माझे लग्न चारुताईशी ता. ९ डिसेंबर १९०६ रोजी झाले. त्यापूर्वीच त्या निवर्तल्या होत्या. त्यांना पहिल्या भार्येपासून कन्या नव्हती. कारण मी याबद्दल काही ऐकले नव्हते.

रा. ब. वामनराव यांच्या संततीपैकी कै. अच्युतभाऊ हे 'संदेशकार' म्हणून पुढे महाराष्ट्रात गाजले. 'मेसेज' हे इंग्रजी दैनिकही त्यांनी मुंबईत काही काळ चालवले. सुरुवातीला मी त्याचा संपादक होतो.

(६) नानासाहेबांच्या ज्येष्ठ कन्या आऊताई ऊर्फ कमलाबाई घारपुरे यांनी 'वामनसुता' या टोपण नावाने 'मासिक मनोरंजना 'त लिहिलेल्या अनेक गोष्टीही त्या काळी लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांचा विवाह पुणे येथे झाला. त्या वेळी पुनर्विवाहविरोधी सनातनी पक्षाने जो उपद्रव केला, " त्याचा सूड उगवण्यासाठी " तात्यांनी 'गणेशचतुर्थी' हा विनोदी लेख लिहिला. (आत्मवृत्त, पान ४०-४१)

रा. ब. रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे

अॅडव्होकेट, नागपूर

(१)

१९१३ साली मी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्या-वर, कॉलेजच्या शिक्षणासाठी पुण्यास जावे, अशी माझी इच्छा होती. माझ्या वडिलांचा दृष्टिकोन वेगळा होता.

मुलांना संस्कृत आले पाहिज, असे त्यांना वाटे. ते म्हणाले, "आपल्या तळेगाव-दशसहस्र या गावचे घाटे-शास्त्री नागपुरास स्थाइक झाले आहेत. चांद्याचे केशवराव ताम्हण मॉरिस कॉलेजात संस्कृतचे प्राचार्य आहेत. तेव्हा तुम्ही नागपुरास जावे."

'मी हे शिरसामान्य करून मॉरिस कॉलेजात दाखल झालो; व संस्कृत घेऊनच बी. ए. झालो. पर्यायाने मराठी साहित्याची पण गोडी लागली. तथापि कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन करण्यास जो अभ्यास व व्यासंग लागतो, तो मला लाभला नाही. अतएव, कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या साहित्य-सिद्धीविषयी मला काहीही म्हणायचे नाही.

तात्याना प्रत्यक्ष भेटण्याचे व त्यांच्या आचार-विचारांचे दर्शन घडण्याचे जे कांही थोडे प्रसंग आले, त्यावरून जाणतेपणाच्या माझ्या गेल्या ७२ वर्षात, मानवता-धर्माचे पुजारी म्हणून ज्यांना मी अभिवादन करीत आलो, त्या मंडळीत त्यांना प्रामुख्याचे स्थान आहे.

(२)

१९०८ च्या सुमारास, डे. कलेक्टर म्हणून, माझ्या वडिलांची प्रथम नेमणूक अकोल्यास झाली. तिथे तात्यासाहेबांचे वडील बंधु दादा कोल्हटकर हे एक निष्णात डॉक्टर म्हणून गणले जात. औषधोपचारासाठी त्यांच्याकडे जाण्याचे प्रसंग वारंवार येत. त्यातून दादा नित्यनियमितपणे भजन करीत. भजने म्हणण्याच्या त्यांच्या ढंगात विलक्षण गोडी होती. माझी आई भजन-पूजनाची भोक्ती होती. तेव्हा तिच्याबरोबर मी दादांच्या घरीं जाऊ लागलो.

तात्या त्या वेळी खामगावला होते किंवा तेव्हाऱ्याला होते, याची स्पष्ट आठवण मला नाही. पण अकोल्यास दादांकडे ते नेहमी मुक्कामाला असत. दोघेहि भाऊ संगीताचे शौकीन होते. दर्दी समजले जात. हिंदुस्थानातील नावाजलेल्या गाणाऱ्यांचे दादांकडे अधिष्ठान असे. साथीदार मंडळींत हिंदु-मुसलमानांची युति असे; व सुदैवाने अजून ती टिकली आहे. एरव्ही कसलीही अडचण नसली, तरी सोवळे-ओवळे पाळणाऱ्या आचारी-पाणक्यांना कानकोंडे वाटू नये, म्हणून तात्या त्यांची कामे स्वतः अंगावर घेऊन करीत.

जेवणानंतर पाहुण्यांची केळीची उष्टी पाने उचलून टाकताना एकाद्या सारंगियाने, "आप क्यूं तकलीफ उठा रहे हो?" असे म्हटले, कीं तात्या तडक उत्तर देत, "कल रातकी सारंगी अबतक कानोंमें गूंज रही हय. तो क्या उसकी दाद देना भी मना हय!"

अकोल्यास माझ्या वडिलांची बदली होण्यापूर्वी, ४।५ वर्षे, ते चिखलीस मामलेदार होते. देऊळगाव-राजा येथील बालाजीच्या यात्रेच्या निमित्ताने, हैद्राबादच्या अमीर-उमरावांचा १॥-२ महिने तिथे पडाव असे. तिथल्या गाण्याच्या बैठकीत अशीच विनोदाची तमीज-बुलंदी होत असे. त्याची मला अशा वेळी आठवण येई.

(३)

१९१३ ते १९१८ या काळात मी मॉरिस कॉलेजात असताना, तात्यांचे चिरंजीव श्री. बापूसाहेब हे माझे बरोबर शिकत होते. पुढे १९१७-१८ च्या सुमारास माझ्या वडलांची, सब. डि. ऑफिसर म्हणून, खामगावला बदली झाली. तेव्हा तात्यांकडे जाण्याचे प्रसंग येत.

माझे वडील कडक व करारी स्वभावाचे होते; व हीच प्रथा बहुधा सारीकडे असे. अशा जमान्यात, बापूला भेटायला म्हणून, प्रथम तात्यांकडे गेलो, तेव्हा एक निराळाच प्रकार पाहिला.

'आमचा बापू फार सुस्वर शीळ वाजवतो,' म्हणून बापूचे कौतुक. त्याचा भाऊ उत्तम कित्ता गिरवतो, म्हणून त्याचे कौतुक. आचाऱ्याने आणलेला चहा उत्तम झाला आहे, म्हणून त्याचे कौतुक. जनाबाई मोलकरणीचे मूल आजारी आहे, म्हणून मुलाची विचारपूस करताना मुलाचे कौतुक! एवढ्यात मनीऑर्डर-वाल्या पोस्टमनला प्रथम—

'तू इथे या सतरंजीवर बस. उभा राहू नकोस' असा आदेश व मग—

'हुसेनमिया अब तेरे मा को बीमारी ठीक हय ना?' म्हणून चौकशी.

आजच्या तरुण पिढीला, घरी अथवा शाळेत, अशा माउलीचे दर्शन होत नाही. याला अनेक कारणे आहेत. पण, तसे घडले, तर देशद्रोही पुढाऱ्यांचे निर्मूलन करण्याची आटापीट करावी लागणार नाही;

व होळीच्या सणात होणाऱ्या घाणेरड्या प्रकारांची दृश्येही पार्लमेंटमध्ये दिसणार नाहीत. विद्यार्थी घेराव करणार नाहीत; व शाळा–कॉलेजातील टेबल–खुर्च्यांची नासधूस पण होणार नाही.

(४)

१९२२ साली मी उमरावतीस वकिलीला सुरवात केल्यावर २३–२४ साली, माझे परममित्र अण्णाजी बोबडे यांच्या सांगण्यावरून, पुरुषोत्तम यशवंत देशपांडे उपाख्य पी. वाय्. अथवा बाबा देशपांडे हे माझेबरोबर वकिली करू लागले. तात्या कोल्हटकरांचे तिसरे भाऊ दिगंबर कृष्ण ऊर्फ अण्णासाहेब त्या वेळी सेशन्स–जज होते. त्यांची मुलगी विमल व पी. वाय्. फर्ग्युसन कॉलेजात असताना त्यांचा स्नेह जडला; व पुढे १९२५ मधे त्यांचे लग्न झाले.

पी. वाय्.चे वडील हे त्या वेळी उमरावतीस एक प्रख्यात वकील म्हणून गाजलेले होते. त्यांना वाय्. जी. देशपांडे म्हणून संबोधीत असत. ते जुन्या परंपरेत वाढलेले असल्यामुळे, मुलाचा प्रीति–विवाह झाला, तर हुंडा नसला तरी भरपूर मानापमानाला मुकावे लागेल, असे जमिदारी विचार त्यांच्या मनात येत. तथापि त्यांनी लग्नाला विरोध दर्शविला नाही. याविषयी लग्न–मंडपात श्रीपाद कृष्णांची (तात्यांची) प्रतिक्रिया मांडताना त्यांनी म्हटले, "मिया बिबी राजी, तो क्या करेगा वाय्. जी ?"

(५)

पी. वाय्. सब–जज झाल्यावर वकिलीच्या पेशात मला नंतर आत्माराम रावजी देशपांडे म्हणजे कवी 'अनिल' यांचे सहकार्य मिळाले. कुसुम जयवंत इच्याशी मी प्रीति–विवाह करण्याचा निश्चय केला आहे, असे त्यांनी मला सांगितले. याबाबत मी तात्यासाहेबांशी बोललो तेव्हा ते म्हणाले, "कवि–मनाची सांगड असली तर निश्चय हमखास टिकेल." तसेच पुढे घडले.

"पर–गुणपरमाणूना पर्वताचे स्वरूप आणून देणारा, उज्ज्वल, प्रतिभावान् स्व–वैशिष्ट्यपूर्ण कवी," अशा शब्दात, ज्या 'बी' उपाख्य नारायण मुरलीधर गुप्ते या कवींचा, श्री. भवानीशंकर पंडित यांनी परवा, आपल्या लेखात, औचित्यपूर्ण गौरव केला आहे, त्यांची सारी हयात अकोल्यास कलेक्टर ऑफिसचे कारकून म्हणून पार पडली असली, तरी एक ऋषि–तुल्य सज्जन म्हणून गुप्ते–काकांचा लौकिक होता.

'विदर्भ–वीणा' या काव्य–संग्रहाचे संपादन हाती घेण्यापूर्वी, 'बी' यांच्या काव्याची चर्चा करताना, पी. वाय्. व अनिल यांनी ज्या एका प्रसंगी तात्या कोल्हटकरांवर हल्ला चढवला, त्या प्रसंगी मी उपस्थित होतो. देशपांडे–द्वयाचे म्हणणे की,—

"पुण्या–मुंबईच्या तुमच्या लाड करणाऱ्या व्यवसाय–बंधूंनी आजवर 'बी' यांच्या कवितेची उपेक्षा केली आहे." असे म्हणून, आपल्या सुस्वर आवाजात, पी. वाय्‌नी 'बी' यांच्या एक दोन कविता म्हणून दाखविल्या. तात्यांना त्या कविता ऐकून जणू साक्षात्कार व्हावा असे झाले. पुढे 'विदर्भ–वीणे'ला लिहिलेल्या प्रस्तावनेत तात्यांनी पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे,—

"'बी' या नावाने विख्यात असलेले नारायण मुरलीधर गुप्ते आधुनिक कवींतले भीष्माचार्यच आहेत. त्यांच्या कवितांची योग्य स्तुती शब्दांपेक्षा मौनानेच होईल."

प्रस्तावनेतील सर्वसाधारण काव्य–गुणांचे तात्यांनी केलेले विवेचन लक्षात घेता, तात्यांनी मौन का स्वीकारावे, असा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर, श्री. वा. ल. कुळकर्णी यांनी लिहिलेल्या "श्रीपाद–कृष्ण वाङ्मय–दर्शन" या शोधक व बोधक या टीकाग्रंथात गवसते. त्यांनी तात्यांबद्दल म्हटले आहे की, "खऱ्याखुऱ्या कवितेचा आस्वाद घेऊन तिच्या अंतरंगाचा तळमळीने शोध घेण्याची उत्कट इच्छाही नव्हती."

(७)

पुढे १९२९ च्या सप्टेंबरमध्ये, 'विदर्भ–वीणा' या काव्य–संग्रहाच्या प्रकाशनापूर्वी, आनंदराव टेकाडे यांनी त्यांच्या कविता संग्रहात देण्याचे नाकारले. त्याच सुमारास नागपुरात विदर्भ साहित्य–संमेलनाच्या निमित्ताने तात्या इथे आले असता, अण्णाजी बोबडे यांनी टेकाड्यांची समजूत घालावी, असे सुचविले. अण्णाजी बोबडे यांच्या 'दरबारां'त आनंदरावांच्या कवितांवर विनोदाने टीका होत असताना, मी आनंदरावांची बाजू सांभाळीत असे. म्हणून अण्णाजींनी मध्यस्थीसाठी माझे नाव सुचवले.

तदनंतर, तात्या, मी व भाऊराव माडखोलकर असे आम्ही तिघे आनंदरावांच्या घरी गेलो. त्यांचे मन वळविण्याचा तात्यांनी कळकळीने प्रयत्न करूनही आनंदराव ऐकेनात. तेव्हा मी आनंदरावाला बरेच कठोरपणे बोललो. तात्यांचा स्थायी भाव किती शांत होता, याची आम्हाला त्या वेळी कल्पना आली. आम्ही निराश होऊन परतण्याच्या विचारात असता, भाऊराव माडखोलकरांनी त्यांचा डाव टाकला. त्यांनी जरा कणखरपणे म्हटले, "तुमच्या कवितांची आम्ही निवड करू व त्या 'विदर्भवीणे'त संग्रहित करू. तात्या या संग्रहाला प्रस्तावना लिहिणार आहेत. त्या प्रस्तावनेत असें स्पष्ट नमूद करू की, टेकाडयांच्या परवानगीविना त्या संग्रहित केल्या आहेत. यावर आता कसली अडचण राहिली ! "

आनंदराव ओशाळून म्हणाले, "जशी तुमची इच्छा !" पुढे तात्यांनी प्रस्तावनेत माडखोलकरांनी दिलेला शब्द कटाक्षाने पाळला.

भाऊराव माडखोलकरांची व माझी ती पहिलीच भेट होती. त्यांच्या कुशल मध्यस्थीचे व अडल्या नारायणाला कसे वठणीवर आणायचे या कलेचे मला कौतुक वाटले. तात्यांनीहि त्यांचे कौतुक केले.

अशा या माझ्या थोडयाशा आठवणी प्रसिद्ध करण्याची संधी 'युगवाणी'च्या संपादकांनी दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गंगाधर रामकृष्ण देव

नागपूर–टिळक–पंचांग कर्ते, नागपूर

शके १८४१ च्या (सन १९२०) माघ महिन्यात कै. श्री. श्रीपाद कृष्ण तथा तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली सांगली येथे ज्योतिषसंमेलन झाले. त्याला कै. लोकमान्य टिळक व श्रीशंकराचार्य हजर होते. त्यात नवीन पंचांग करण्याकरिता करणग्रंथ तयार करण्याचे ठरले. त्याप्रमाणे ता. १२ जून १९२० चे 'केसरी'त करणग्रंथ तयार करण्यासंबंधी जाहिरात आली. जाहिरातीला अनुसरून कै. शिवराम गणपतराव तथा दादासाहेब पवार यांचा करणकौमुदी हा ग्रंथ आला होता. पण, तो कोणालाच फारसा पसंत नसल्यामुळे, कै. व्यंकटेश बापूजी केतकर यांच्याशी लोकमान्य टिळक यांनी बोलणी केली. पण, कै. व्यंकटेशशास्त्री केतकर आपल्या 'ज्योतिर्गणित' या ग्रंथात रेसभरही फरक करून देण्यास तयार नसल्यामुळे, लोकमान्य टिळक, कै. प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक, तात्यासाहेब कोल्हटकर, कै. केशव विश्वास फणसे वगैरे मंडळीस चिंता निर्माण झाली. तेव्हा श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनी कै. केशव लक्ष्मण तथा भाऊजी दप्तरी यांचे नाव सुचविले, व त्यांची संपूर्ण माहिती दिली. तोपर्यंत लोकमान्य टिळक यांना श्री. भाऊजी दप्तरी यांच्या विषयी काहीही माहिती नव्हती व नावही कानावरून गेलेले नव्हते. श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांचे सूचनेवरून लोकमान्य टिळकांनी, श्री. भाऊजी दप्तरी यांना १९ जून १९२० रोजी तार करून, करणग्रंथासंबंधी बोलणी करण्यास पुण्यास बोलाविले.

सांगली ज्योतिषसंमेलनातील अध्यक्षीय भाषणात श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनी एक अभिनव रीती सांगितली. त्या रीतीप्रमाणे वेधावरून सूर्यसिद्धांतातील सूर्यात आज सुमारे ४ अंशांची आणि सूर्यसिद्धांताच्या वर्षमानात ३॥ मिनिटांची चुकी सिद्ध करता येते. त्या रीतीप्रमाणे मी दोनदा मघा तारा आणि चंद्र यांचे पौर्णिमान्त काळी वेध घेतले. त्यावरून सूर्यसिद्धांतातील सूर्याची आणि वर्षमानाची चुकी दोन्ही वेळा निश्चित दिसून आली. याप्रमाणे सूर्यसिद्धांताच्या सूर्यात सुमारे ४ अंशांची चुकी आहे, हे मी कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांना कळविले होते. तेव्हा नागपुरास टिळक पंचांग तयार करावे, असे त्यांनी श्री. भाऊजी दप्तरी यांना कळविले. श्री. तात्यासाहेब कोल्हटकर आणि श्री. केशवराव फणसे यांच्याच प्रेरणेने नागपूर–टिळक–पंचांग श्री. भाऊजी दप्तरी यांनी चालू केले. प्रथम ते कै. नारायणराव पंढरपूरकर यांचे लोकसेवा छापखान्यात छापून ते स्वतः प्रसिद्ध करीत असत. नंतर नागपूर–टिळक–पंचांग हे कै. गोपाळ अनंत तथा दादासाहेब ओगले हे महाराष्ट्र प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध करीत. हल्ली श्री. बाळकृष्ण गोविंद तथा बंडोपंत ओगले हे आपल्या नक्षत्र प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध करतात.

१९२९ साली डॉ. दप्तरी यांचा 'भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण' हा ग्रंथ शास्त्रीय ग्रंथमालेने प्रकाशनास हाती घेतला. त्या वेळी त्या ग्रंथास प्रस्तावना कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांची असावी, अशी कै. दप्तरी

यांची आणि मालेतील सर्वांची इच्छा होती. परंतु त्याला अडचणी होत्या. एक तर, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनी त्या वेळी कोणत्याही ग्रंथास आणि कसलीही प्रस्तावना लिहावयाची नाही, असा ठाम निश्चय केला होता. आणि दुसरे, त्या वेळी श्री. तात्यासाहेब कोल्हटकर हे मोतीबिंदूमुळे पूर्ण आंधळे झाले होते. त्यामुळे त्यांना लिहिणे व वाचणे ही दोनही कामे करणे शक्य नव्हते. तरीपण श्री. केशवराव फणसे यांच्या आग्रहास्तव श्री. भाऊजी दप्तरी आणि मी त्यांचेबरोबर, नागपुरास श्री. तात्यासाहेब कोल्हटकर आले असतांना, त्यांच्या भेटीला गेलो. तेव्हा त्यांचे तेथील बैठकीत त्या वेळी कै. प्रो. नारायण केशव बेहेरे, डॉ. शं. दा. पेंडसे आणि श्री. भाऊसाहेब माडखोलकर होते. त्या वेळी बैठकीत 'भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण' या ग्रंथावर थोडी चर्चा होऊन प्रस्तावना लिहिण्याबद्दल कै. केशवराव फणसे यांनी श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांना विनंती केली. तेव्हा ते मागील काही प्रसंग सांगून म्हणाले की, "एकुलती एकच अशी हस्तलिखित प्रत दहा वर्षापूर्वी ज्या वेळी मला दप्तरीसाहेबांनी मनाच्या विशालतेने आणि उदार अंतःकरणाने दिली, त्या वेळच्या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे मडमडून येते. अशा थोर दप्तरीसाहेबांच्या ह्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य मला लाभावे अशी माझीच फार इच्छा होती व ती आज पूर्ण होत आहे." अंधत्वामुळे श्री. तात्यासाहेबांनी पुस्तकाचे छापील फॉर्म श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांचे कडून वाचवून घेतले. आणि जळगावास आपल्या स्नेह्याकडून प्रस्तावना तोंडी सांगून लिहवून घेतली. प्रस्तावना–छपाईचे वेळी प्रुफे श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांचे सूचनेप्रमाणे तपासली.

डॉ. य. खु. देशपांडे

अध्यक्ष, शारदाश्रम, यवतमाळ

१. साहित्यसम्राट न. चिं. केळकर आदि मराठीच्या तज्ज्ञांनी मराठी भाषेचा उद्‌गम आणि विकास विदर्भातच झाला असे प्रतिपादन केले आहे. ऋग्वेद कालापासून विदर्भाचे अस्तित्व दिसून येते आणि आजचा महाराष्ट्र हा विदर्भाचा विस्तार आहे, हे निर्विवाद आहे. एवढेच नव्हे, तर मराठीभाषी जनता भारतात इतरत्र स्थायिक झाली असून, त्यांनी मराठी भाषेच्या अभिवृद्धीकरिता साहित्यकेंद्रे निर्माण केली आहेत. फार काय, भारताबाहेरही लंडन, पॅरिस येथे असलेली केंद्रे ३० वर्षापूर्वी मी स्वतः समक्ष पाहिली आहेत. अशा या मराठी भाषेच्या विकासासाठी आणि अभिवृद्धीमध्ये मराठी भाषेचा मूळ भाग जो विदर्भ तोही आघाडीवर आहे, हे स्पष्ट आहे.

२. इंग्रजांचे राज्य विदर्भावर येण्यापूर्वी विदर्भात मराठीचे व संस्कृतचे अनेक कवी आणि ग्रंथकार होऊन गेले. त्यांचे ग्रंथ आजही आपणास यवतमाळच्या शारदाश्रमाने संग्रहित केलेल्या हस्तलिखित ग्रंथांत दिसून येतील. परंतु इंग्रजी कारभारानंतर विदर्भातील भाषा आणि वाङ्‌मय याच्या अभिवृद्धीचे बहुतांशी श्रेय, विदर्भात इंग्रज राजवटीत अखिल महाराष्ट्रातून नोकरी, व्यवसाय आदि उद्देशाने जे आधुनिक पद्धतीचे विद्वान स्थायिक झाले, त्यांना आहे. त्यात कै. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या घराण्याचा फार मोठा वाटा आहे. अगदी आरंभापासूनची अशा अनेक महाभागांची नावे माझ्या दृष्टीपुढे तरळत आहेत. या विद्वान साहित्यिकांनी केलेल्या कार्याची नोंद करून ठेवण्याकरिता एक स्वतंत्र ग्रंथ तयार करण्याची आवश्यकता आहे. ते कार्य तरुण उत्साही अभ्यासकाने हाती घ्यावयास पाहिजे. अशा साहित्यिकांपैकी विद्यमान दोन कार्यक्षमांची नावे मनश्चक्षूंसमोर तळपत आहेत. ती म्हणजे डॉ. वा. वि. मिराशी आणि सव्यसाची लेखक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर. यांच्याही सहवासाचा घनिष्ठ लाभ मला झाला आहे. त्यांना आता कोणी विदर्भेतर म्हणू शकत नाही,–इतके ते विदर्भाशी समरस झाले आहेत

३. कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांचे विदर्भातील नाटककार म्हणून प्रथम मी, सन १९०२ ते १९०७ पर्यंत मुंबईस विल्सन कॉलेजमध्ये शिकत असताना, नाटक पाहिले, तेव्हा कळले. त्यानंतर त्यांची अनेक नाटके, विनोदी लेख व इतर वाङ्‌मय इत्यादी मोठ्या आवडीने वाचले. ते एक श्रेष्ठ ग्रंथकार म्हणून त्यांचा लौकिक झाला. विशेषतः, त्यांची विदर्भ साहित्यासबंधी अमोल कामगिरी म्हणजे, त्यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती येथे, श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी माडीवर,

विदर्भातील साहित्यिकांची सभा, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली, १९२३ च्या जानेवारीत भरली. त्या सभेत विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेचा ठराव झाला. त्या सभेचे श्रेय कविभूषण श्री. बळवंतराव खापर्डे यांना आहे. त्यांनी विदर्भ साहित्यिकांशी पत्रव्यवहार करून त्यांचे एक सम्मेलन तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली जोशी हॉलमध्ये त्याच दिवशी भरविले. मीही निमंत्रणावरून, वरील दोन्हीही कार्यक्रमास उपस्थित राहून, त्यांत भाग घेतला होता. याप्रमाणे तात्यासाहेबांचा विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेत महत्वाचा भाग होता. या अल्पारंभानंतर या ४७ व ति वि. सा. संघाचा किती विस्तार झाला व त्याला केवढे भव्य स्वरूप प्राप्त झाले, त्याचे नागपूर येथील मध्यवर्ती मंदिर आणि तेथे चाललेले विविध साहित्यिक कार्यक्रम आणि विदर्भात अनेक ठिकाणी साहित्यिक कार्य करीत असलेल्या संघाच्या शाखा यावरून कल्पना येईल. वि. सा. संघाच्या या प्रगतीत तात्यासाहेबांचे शिष्य श्री. माडखोलकर यांचा महत्त्वाचा भाग आहे.

४. विदर्भ साहित्य संघाशी माझा आज ४७ वर्षे संबंध आहे. मी संघाध्यक्ष, संमेलनाध्यक्ष, स्वागताध्यक्ष, स्वागत चिटणीस, संघाचे तर्फे लवाद अधिकारी इत्यादी रूपाने आजवर संघाची सेवा केली. आता वृद्धपणामुळे (८८ वर्षे) अशक्तता निर्माण झाल्यामुळे संघाचा एक निवडलेला तहहयात सन्मान्य सभासद या नात्याने घरी बसूनच संघाच्या प्रगतीकडे लक्ष देत आहे. यवतमाळला लो. ना. बापूजी अणे यांच्या प्रेरणेने व सहकार्याने यवतमाळच्या साहित्यिकांनी विदर्भ साहित्य संघाचे कार्य म्हणूनच यवतमाळ येथे शारदाश्रम ही संस्था १९२६ साली स्थापन केली. त्या संस्थेचा चिटणीस म्हणून मला तात्यासाहेब कोल्हटकरांकडे खामगावास ३ दिवस राहाण्याचा योग आला. शारदाश्रम संस्थेतर्फे विदर्भातील कवींचा निवडक कवितासंग्रह ‘ विदर्भवीणा ’ या नावाने प्रसिद्ध करण्यात आला. त्या ‘ विदर्भवीणा ’ संग्रहाला तात्यासाहेबांची प्रस्तावना घ्यावयाचे ठरले. त्या वेळी चिटणीस या नात्याने मी खामगाव येथे गेलो व तात्यासाहेबांकडे तीन दिवस राहिलो. याच वेळी त्यांनी ‘ विदर्भवीणा ’ या ग्रंथाला प्रस्तावना लिहून दिली.

५ कै. तात्यासाहेब कोल्हटकर हे मराठी भाषेचे एक सुप्रसिद्ध नाटककार, निबंधलेखक, टीकाकार, विशेषतः विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. ते महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते, तसेच विदर्भ साहित्य संमेलनाचे पहिले अध्यक्ष होते. दृष्टिमांद्य झाले, तरी त्यांचा साहित्याचा व्यासंग कायम होता. अनेक वर्षापूर्वी मडगाव (गोवा) येथे प्रो. वा. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अधिवेशन भरले होते. या सम्मेलनात मी उपस्थित होतो; व तात्यासाहेब कोल्हटकर दृष्टिमांद्य असूनही संम्मेलनास उपस्थित राहिले. तेथेही त्यांची माझी गाठ झाली. त्यांना आपले नाव सांगून माझी ओळख पटवावी लागली.

शेवटी याच संबंधात हे स्पष्ट करणे मला अवश्य वाटते की, विदर्भाचा स्वतंत्र साहित्य संघ स्थापन केला, तरी तो महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सवता सुभा म्हणून नव्हे, तर सहकारी म्हणूनच. हे आज ४७ वर्षे विदर्भ साहित्य संघ आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या सभासदांनी आणि कार्यकर्त्यांनी केलेल्या सहकार्याने स्पष्ट झाले आहे, हे मी समाधानाने नमूद करीत आहे. त्यांत तात्यासाहेबांच्या सल्लामसलतीचा वाटा मोठा आहे. ते विदर्भ आणि महाराष्ट्र यांतील दुवा होते.

प्रो. भवानीशंकर श्री. पंडित

१. ‘ रिअली, ही वॉज ए ग्रेट सोल ’

श्री. देवदत्त टिळक इथे प्राध्यापक मान्यांचे पाहुणे होते. माने हिस्लॉप व मॉरिसमधले माझे सहकारी. देवदत्त माझे चाहाते. तेव्हा मान्यांनी त्यांच्या पंगतीला मला जेवण्याचे आमंत्रण दिले होते. त्याप्रमाणे मान्यांकडे मी सदरमध्ये अंजुमन हायस्कूल जवळील त्यांच्या घरी भोजनास गेलो होतो. त्या वेळी ‘ इलस्ट्रेटेड विकली ’ मध्ये लक्ष्मीबाई टिळकांच्या ‘ स्मृतिचित्रां ’चे इंग्रजी भाषांतर हप्त्याहप्त्याने येत होते. त्यावरून आमच्या गोष्टी निघाल्या. त्या वेळी देवदत्त म्हणाले,—

"खरोखर तात्यासाहेब कोल्हटकर ही व्यक्ती फार थोर होती. त्यांनी आग्रह केला आणि उत्तेजन दिले, म्हणून आईने हळहळू 'स्मृतिचित्रे' लिहून काढली. उन्हाळ्यात तात्यासाहेब नाशिकला आपल्या मुलीकडे येत. त्यांचे जामात प्रिन्सिपॉल पाटणकर माझे बालमित्र. तात्यासाहेबांचा मुक्काम नाशकास असला म्हणजे ते हमखास आमच्याकडे येत. आणि आईच्या लेखनाची विचारपूस करीत. त्यामुळे आईच्या लेखणीला स्फुरण चढत असे. पुढे त्यांचे चिरंजीव प्रभाकर म्हणजे बापू कोल्हटकर यांनी आपल्या 'संजीवनी'त आईची 'स्मृतिचित्रे' छापण्यास सुरुवात केली. 'स्मृतिचित्रां'चे पहिले प्रकाशक ते. त्यांचे वडील प्रेरक. त्यांच्या भगिनी व मेहुणे पहिले वाचक. ही कोल्हटकर मंडळी नसती तर महाराष्ट्राला 'स्मृतिचित्रे' मिळाली नसती. खरोखर, तात्यांचा आत्मा फार थोर होता."

२. खवचट खोबरे

मला वाटते, एकोणिसशे सत्तावीसचा मे महिना असावा. पुण्यास भारतेतिहास संशोधक मंडळाच्या दिवाणखान्यात ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली शारदोपासकांचे द्वितीय संमेलन भरले होते. हवा थंड म्हणून त्या काळी नागपूर-उमरावतीची बरीच मंडळी पुण्यास जात. या संमेलनाला खामगावहून तात्यासाहेब आले होते. नागपूरहून प्रो. बेहेरे, आनंदराव टेकाडे, माडखोलकर, शरच्चंद्र रानडे आणि मी उपस्थित होतो. संमेलनाच्या खुल्या अधिवेशनात कृष्णराव मराठे आणि मोहनीराज शंकर मुळे हे अश्लीलतानिवारणाचा ठराव आणणार असून त्याला श्रीपाद महादेव माटे हे पाठिंबा देणार आहेत, आणि त्यामुळे संमेलन गाजणार आहे, अशा वार्ता संमेलनाला आरंभ होण्याच्या पूर्वीपासून जिकडे तिकडे पसरल्या होत्या. त्या वेळी पुण्याला श्री. माधवराव जोशी यांच्या 'स्थानिक स्वराज्य' ऊर्फ 'म्युनिसिपालटी' या विनोदी नाटकाचे प्रयोग धूमधडाक्याने सुरू होते.

अधिवेशनाला आरंभ झाला, त्या वेळी अध्यक्ष डॉ. केतकर समोर खुर्चीवर बसले होते, त्यांच्याजवळ बाजूला स्वागताध्यक्ष दत्तोपंत पोतदार होते. अध्यक्षांसमोर जाजमावर श्रोतृवृंद बसला होता. त्यात माटे होते. "म्युनिसिपालटी नाटकच कशाला ? केतकरांच्या कादंबऱ्या काय कमी अश्लील आहेत ? कोल्हटकरांच्या नाटकात आणि विनोदातही काही भाग अश्लील आहेत," असे त्यांचे शेरे देण्याचे काम चालू होते. त्यामुळे त्यांनी अगोदरच पुष्कळ जणांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते. मला वाटते, माट्यांची ही मते कदाचित् पूर्वीच तात्यासाहेबांच्या कानांपर्यंत जाऊन पोचली असावी. तात्यासाहेब, बेहेरे, टेकाडे, माडखोलकर इत्यादी मंडळी श्रोतृवृंदाच्या कडांनी खुर्च्यांच्या रांगा लागल्या होत्या, त्यांवर बसली होती.

प्रारंभी स्वागताध्यक्ष दत्तोपंत पोतदार यांचे स्वागतपर भाषण झाले. त्यात पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष इतिहासाचार्य राजवाडे आणि त्या संमेलनाचे अध्यक्ष ज्ञानकोशकार केतकर या दोघांची मोठी मजेदार तुलना होती,—"दोघेही प्रज्ञावंत, चिकित्सक, महाराष्ट्राचे अभिमानी व प्रचंड उद्योगी. पण राजवाडे त्यागी तर केतकर भोगी, राजवाडे विरागी तर केतकर अनुरागी, राजवाडे स्पष्ट तर केतकर खाष्ट, राजवाडे निग्रही तर केतकर दुराग्रही !" ती तुलना ऐकताना स्वतः डॉ. केतकरही खदखदून हसत होते.

त्या काळी कविसंमेलनाची प्रथा पडली नव्हती. कार्यक्रमाच्या आरंभी, मध्ये किंवा शेवटी एखादा गोड गळ्याचा कवी आपली एखादी दुसरी कविता म्हणत असे. या संमेलनात टेकाड्यांनी 'जे काय पृथ्वीच्या पाठी। ते मनोरंजनासाठी। केवळ' ही कविता आरंभी म्हटली होती. संमेलनाचा सकाळचा कार्यक्रम प्रो. मायदेव यांच्या 'हिज हवा ग, आय्. सी. एस्.' आणि 'फसल्ये मऽ बाई' या विनोदी कवितांनी संपला. संमेलन संपताच तात्यासाहेब खुर्चीवरून उठले. तो त्यांच्याभोवती नव्या जुन्या साहित्यिकांचा गराडा पडला. "हे प्रो. मायदेव. तात्या, तुम्ही ज्याप्रमाणे गद्यात विनोद आणला त्याप्रमाणे हे तो पद्यात आणत आहेत,"—बेहेरे तात्यासाहेबांना सांगू लागले. इतक्यात माटे चारचौघांना बाजूला सारून पुढे आले आणि बेहेऱ्यांना उद्देशून म्हणाले, "अहो, तुम्ही देखील तात्यासाहेबांची विनोदाची परंपरा चालवण्यास पुढे आला होता. पण तुमचे 'बाण बोथट' आहेत आणि मायदेवांचे पोचट आहेत. तात्यासाहेबांचे 'सुदाम्याचे पोहे' आता जरी खमंग आणि खुसखुशीत

लागले, तरी ते अगोदर फार तिखट होते." तेव्हा बेहेऱ्यांकडे पाहून तात्यासाहेब किंचित् हसले आणि माटचांना उद्देशून उद्गारले,—" पण त्या पोह्यावरले तुमचे खोबरे मात्र फार खवचट आहे."

३. गणेशचतुर्थीच्या मुहूर्तावर गणेशाची स्थापना

श्रीमंत नामदार गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे श्रीव्यंकटेश थिएटरात दिनांक सात व आठ सप्टेंबर एकोणिसशे एकूणतीसला विदर्भ साहित्य संघ परिषदेचे सहावे अधिवेशन भरले होते. कृष्णशास्त्री घुले स्वागताध्यक्ष होते. हे संमेलन भरण्यापूर्वी एप्रिलच्या 'रत्नाकरा'त 'साहित्याच्या प्रांतात हा सवता सुभा कशाला ?' हा लेख 'पारिजात' या टोपण नावाने प्रसिद्ध झाला होता. 'पारिजात' म्हणजे गुरुवर्य श्रीनिवास नारायण बनहट्टी हे नंतर उघड झाले होते. हा लेख बनहट्टींचा असला, तरी वस्तुत: त्याच्या मागे धनतोली–बर्डीवरील व महालातीलही काही साहित्यिकांची प्रेरणा होती. त्यामुळे पुणे–मुंबई विरुद्ध नागपूर–उमरावती किंवा तिकडील साहित्यिक हा वाद या संमेलनात उपस्थित होतो की काय, अशी धास्ती उत्पन्न झाली होती. परंतु 'विदर्भ साहित्य संघ व त्याचे आक्षेपक' या श्री. यादव माधव काळे यांच्या 'रत्नाकरा'च्या जूनच्या अंकातील समतोल लेखामुळे आणि दादासाहेब खापर्डे यांच्या प्रसंगोचित अध्यक्षीय भाषणामुळे तो टळला.

या संमेलनात तात्यासाहेब कोल्हटकर उपस्थित होते. त्या दिवशी गणेशचतुर्थी होती. दादासाहेबांनी अध्यक्षपद भूषवावे, ही औपचारिक सूचना करताना तात्यासाहेब म्हणाले,–" आज विघ्नविनाशक गणेशाची चतुर्थी आहे. 'पारिजात'च्या लेखामुळे विघ्न उद्भवले होते. आज घरोघरी गणेशाची स्थापना होत आहे. तेव्हा आपण या आपल्या साहित्याच्या मंदिरात आज (दादासाहेबांकडे बोट करून) या 'गणेशा'ची स्थापना करू या. म्हणजे इडापीडा टळतील. गणेश ही जशी विघ्ननाशनाची तशीच विद्या आणि कला यांची अधिष्ठात्री देवता आहे. आपण साहित्यभक्त विद्या व कला यांचे उपासक आहोत. तेव्हा आपण या आपल्या मराठी साहित्याच्या विद्यापीठावर प्रत्यक्ष या 'गणेशा'-चीच स्थापना करू या." तात्यासाहेबांच्या या सूचनेला सौ. विमलाबाई देशपांडे यांनी अनुमोदन दिले. ते देताना त्यांच्या भाषणात अभावितपणे विनोद निर्माण झाला; व तो ऐकताना दादासाहेबांनी मान डोलवून 'खरे आहे' म्हणून स्वाभाविक उद्गार काढले. त्यामुळे तो दुणावून हशा पिकला. त्या म्हणाल्या, " उत्सवात गणेशाची स्थापना करताना फक्त पुरुषांचाच वाटा चालत नाही. त्यात पुरुषांइतकाच स्त्रियांचाही वाटा असतो. मी स्त्रियांच्या वतीने तात्यांच्या सूचनेला अनुमोदन देत आहे."

पहिला कार्यक्रम संपला, तेव्हा शहर विभागातील काही अतिरेकी उत्साही कार्यकर्त्यांनी पृच्छा केली की, 'पारिजात कोण ?' तेव्हा दादासाहेब हसत हसत शांतपणे उद्गारले, " पारिजात फूल आहे !"

४. खप्पो, तेढे आणि तिरशिंगे कविजन

या संमेलनाच्या निमित्ताने यवतमाळकडून माझे चुलते श्री. गजानन नरहर पंडित हे धनतोलीत आमच्याकडे उतरले होते. यवतमाळच्या 'शारदाश्रमा'चे संस्थापक डॉ. यशवंत खुशाल उर्फ आप्पासाहेब देशपांडे यांनी 'विदर्भवीणा' हा विदर्भातील कवींच्या कवितांचा संग्रह काढण्याचे ठरविले होते. त्यासाठी शारदाश्रमाला श्री. कुंडलराय मोहेकर यांचे साहाय्य मिळाले होते. या कवितासंग्रहाचे खरे सूत्रसंचालन श्री. वामन नारायण देशपांडे या मर्मज्ञ व रसज्ञ साहित्यसेवकाच्या हाती होते. तेच सूत्रें हालवीत होते. पण संपादक म्हणून त्यांनी माझ्या चुलत्यांना पुढे केले होते. या संग्रहासाठी शारदाश्रमाने कवींकडून कवितांची मागणी केली. पण उपाध्ये, टेकाडे, बेहेरे व बोबडे या प्रमुख कवींनी कविता तर पाठवल्या नाहीतच, पण पत्राला साधे उत्तरही पाठविले नाही. त्यामुळे शारदाश्रमाची निराशा झाली होती.

जेव्हा सकाळचा अध्यक्षीय भाषणाचा कार्यक्रम श्री. जयकृष्ण केशव उपाध्ये यांच्या 'किती गोड बाइ ! बाळ जसे कमल उमलले' या कवितेने संपला, तेव्हा मी आणि माझे चुलते उपाध्यांना भेटलो आणि त्यांना त्यांच्या कवितांबरोबर टेकाडे व बोबडे यांच्या कविता

मिळवून देण्याची विनंती करू लागलो. बेंहेरे मुळी संमेलनालाच उपस्थित नव्हते. उपाध्यांशी आम्ही बोलत असतानाच तेथे अकस्मात श्री. दत्तात्रेय श्रीनिवास केळकर आले. उपाध्ये म्हणाले,—"आनंदराव खप्पी आहे. तो कविता मागाल तर देणार नाही. आणि न मागाल तर देईल. बोवडयांशी मी या बाबतीत बोलणार नाही. माझ्या कवितासंग्रहात माझ्या कविता आहेत. तुम्हाला ज्या कविता हव्या असतील, त्या तुम्ही खुशाल घ्या." केळकर म्हणाले, "बोवडे तेढे आहेत. वळलं तर सूत नाही तर भूत. मी एक कवितासंग्रह काढणार होतो. त्याचे छापलेले फर्मे माझ्यापाशी पडून आहेत. पण मला निरर्शिग्या लोकांनी धमकी दिली व कायद्याचा धाक घातला. त्यामुळे मी माझा विचार टाकून दिला."

मग यवतमाळकरांनी ही गोष्ट श्री. पु. य. देशपांडे यांच्या मध्यस्थीने तात्यासाहेबांच्या कानावर घातली. तेव्हा तात्यासाहेब स्वत: टेकाडे व बोवडे यांना भेटले. तेव्हा त्या दोघांनीही कविता देण्याचे कबूल केले. यासंबंधी तात्यासाहेब 'विदर्भवीणे'च्या प्रस्तावनेत लिहितात,—"या संग्रहाकरिता कविता मिळविण्याची प्रकाशकांनी विनंती केल्यावरून मी रा. रा. श्रीनिवास रामचंद्र बोवडे, रा. रा. जयकृष्ण केशव उपाध्ये व रा. रा. आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांना शब्द टाकिला असता तो त्यांनी खाली पडू दिला नाही याबद्दल मी त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. रा. रा. आनंदराव टेकाडे यांनी आपल्या कविता प्रसिद्ध करण्याची परवानगी एकाच अटीवर दिली. ती म्हणजे या कविता परवानगीवाचून प्रसिद्ध करण्यात येत आहेत हे मी प्रस्तावनेत स्पष्ट नमूद करावयाचे. ती अक्षरशः पाळण्याकरिताच हा खुलासा करून हा प्रस्तावनालेख संपवतो."

५. तात्यांसह तरुण साहित्यिकांचा ग्रूप फोटो

जून एकोणिसशे सदुसष्टच्या 'युगवाणी'त 'श्रीपाद कृष्णांचे पुण्यस्मरण' हा माझा लेख आम्हा मित्रांच्या ग्रूपफोटोसह दिला आहे. आज त्या फोटोतील साहित्यिकांची माहिती जरा विस्ताराने देत आहे. मला आता नक्की आठवत नाही, पण एकोणिसशे सत्तावीसच्या जुलैत किंवा ऑगस्टात तात्यासाहेब नागपुरास बोर्ड ऑफ स्टडीजच्या सभेसाठी बहुधा आले होते. त्या वेळी विद्यापीठात 'मराठी' हा विषय बी. ए. पर्यंत फक्त विद्यार्थिनींसाठी होता. एम्. ए. ला मात्र तो विद्यार्थी व विद्यार्थिनी या दोघांसाठी होता. त्या काळी मराठी, हिंदी, उर्दू, बंगाली इत्यादी देशी भाषांसाठी एकच अभ्यासक्रम मंडळ होते. त्याचे प्रमुख रा. ब. अच्युतराव साठे होते. मॉरिस कॉलेजातील शारदामंडळात तात्यांनी व्याख्यान द्यावे, अशी विनंती करण्यासाठी कोलते व मी जेव्हा हरिभाऊ मुंजे यांच्या बंगल्यावर गेलो, तेव्हा तात्यांनी आम्हाला पहिला प्रश्न, 'त्यांची कोणकोणती पुस्तके कोणकोणत्या परीक्षांना आहेत?' हाच विचारला. आम्ही त्या वेळी सेकंड इयरला होतो. त्यामुळे आम्हाला 'मराठी' विषय नव्हता. पण तात्यांचे 'मूकनायक' एम्. ए. ला असल्याचे आम्हाला माहीत होते. तात्यांना ते ठाऊक नव्हते असे नाही. पण आमच्या तोंडून त्याचे नाव ऐकताच त्यांना दुप्पट आनंद झाला.

त्या वेळी मॉरिस कॉलेजात, लॉ कॉलेजात व हिस्लॉप कॉलेजात खामगावच्या हायस्कूलमधून मॅट्रिक झालेले बरेच विद्यार्थी असत. त्या काळी 'अलंकारचंद्रिका'कर्ते रावसाहेब गोरे हे त्या हायस्कूलचे हेडमास्तर होते. ते तेथील विद्यार्थ्यांच्या मनात वाङ्मयाविषयी आस्था व अभिरुची निर्माण करीत. फोटोतील श्रोती, मांजरेकर आणि मी वगळल्यास बाकीचे साहित्यिक गोरे यांचे शिष्य होते.

डावीकडून उजवीकडे पहिले श्रीयुत महाजन आहेत. त्या काळी हे विनोदी लेख लिहीत. 'माझा आवडता खेळ' हा लेख त्यांनी 'मॉरिस कॉलेज मॅगझिन'मध्ये कै. वा. वि. प्रयागी यांच्या नावे दिला होता. त्यांना प्रसिद्धीची लालसा नव्हती. त्यात त्यांनी 'टेनिस कोर्ट', 'तेथला पार्टनर', 'त्याच्याशी कोर्टशिप', 'लव्ह गेम', 'लव्ह ऑल्' इत्यादी शब्दांवर कोटया करून भरपूर विनोद निर्माण केला होता. दुसरा क्रमांक माझा आहे. स्वत:संबंधी बोलणे शिष्टाचाराला धरून नाही. शिवाय 'जो आपुली आपण करी स्तुती' हे समर्थवचन मी अजून विसरलेलो नाही. माझ्यापाशी माझे मित्र कोलते उभे आहेत. तेव्हा ते 'पाटील' होते. आज उभ्या महाराष्ट्राला ते 'महानुभावीय वाङ्मयाचे संशोधक' म्हणून माहीत आहेत. आता ते नागपूर विद्यापीठाचे व्हाइस चॅन्सेलर आहेत. त्यांच्या बाजूला प्रभाकर नारायण श्रोती आहेत. ते आता सेवानिवृत्त

आहेत. हिस्लॉपचे विद्यार्थी होते. एके काळी त्यांच्यात 'एक सौंदर्यपिपासु भावकवि' होता. आज चाळिसाहून अधिक वर्षे लोटली, पण त्यांच्या काही भावकविता अजून माझ्या स्मरणात घोटाळत आहेत; —

'हास मंद मधुर गडे ! हास चांदणी
अशिच हसत सतत राहि गगन प्रांगणी
हसुन अशी हासविशी बुरुन तू जरी
हृदय हरुन नेइ तुझी नजर लाजरी'.

किंवा,

'कोर चंद्राची । कोरिली कुणी नवलाची ?'

अथवा,

'हा प्राणदीप कोणाचा येथे विसर्जीत झाला ?'

त्यांच्यापुढे कै. देवीदास विनायक अडावदकर आहेत. ते प्रारंभापासून हिस्लॉप कॉलेजातील 'महाराष्ट्र भाषा-संवर्धक मंडळा'चे चिटणीस होते. मॉरिसचे कोलते व हिस्लॉपचे अडावदकर यांसारखे शल संघटक व कार्यकर्ते त्या कॉलेजांतील 'मराठी मंडळां'ना पुन्हा लाभले नाहीत. अडावदकर कवी होते. 'महाराष्ट्र शारदे'च्या दुसऱ्या भागात त्यांच्या कविता संगृहित झाल्या आहेत. 'लक्ष्मी आणि सरस्वती यांचे भांडण' ही त्यांची कविता त्या वेळी फार लोकप्रिय झाली होती. सेवानिवृत्तीनंतर अडावदकर खामगावला स्थायिक झाले होते. दुर्दैवाने ते गुदस्ता कालवश झाले. श्रीयुत प्रभाकर शांताराम मांजरेकर यांचा क्रमांक सातवा आहे. त्यांचा 'उषःप्रभा' हा लघुकथांचा संग्रह प्रसिद्ध आहे. कॉलेजात असताना आणि नंतर काही वर्षे विविधवृत्त, मनोरंजन, रत्नाकर, यशवंत, मनोहर, विहंगम इत्यादी नियतकालिकांतून अंतरंगाचा ठाव घेणाऱ्या त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. 'नवे कुत्रे' ही त्यांची गोष्ट अविस्मरणीय आहे. मांजरेकर छिंदवाड्याला वकील आहेत. पुढल्या ओळीत तात्यासाहेबांच्या उजव्या हाताला काशिनाथ रावजी ब्रह्म आहेत. ते खामगावला वकील आहेत. विद्यार्थी असताना ते 'मॉरिस कॉलेज मॅगेझिन'च्या मराठी विभागाचे संपादक होते. ते कविता लिहीत. आणि टोपण नावाने गद्यलेखनही करीत. तात्यांच्या परिचयाची आवश्यकता नाही. अच्युतरावांचा परिचय माझ्या पूर्वोक्त लेखात मिळेल. त्यांच्या डाव्या हाताला कै. केशव सदाशिव तायडे आहेत. तायड्यांनी मॅट्रिकपासून एलएल्. बी. पर्यंत कधीही फर्स्ट क्लास सोडला नाही. त्यांना लेखन, चित्रण व गायन या तिन्ही कलांचा नाद होता. त्यांनी आय्. सी. एस्. होण्याचा प्रयत्न केला. पुढे ते जुन्या मध्यप्रदेश सरकारच्या ज्युडिशिअल खात्यात वरिष्ठ पदापर्यंत चढले. काही काळ ते मध्यवर्ती सरकारात होते. दुर्दैवाने त्यांना ऐन तारुण्यात मृत्यु आला.

मॉरिस कॉलेज मॅगेझिनच्या जानेवारी एकोणिसशे अठ्ठाविसच्या अंकात नोव्हेंबर एकोणीस व वीसला मोठ्या समारंभाने डॉ. नानासाहेब मिराशी यांनी गुरुवर्य वनहट्टी यांना अध्यक्षपद दिल्याचा वृत्तांत आहे. 'फुलोर' या मॉरिस कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या प्रातिनिधिक लेख–कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत गुरुवर्य वनहट्टी हे शारदामंडळाचा एकोणिसशे सत्तावीसचा वार्षिकोत्सव, तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली, पार पडल्याचा निर्देश करतात. तेव्हा त्या निमित्ताने तात्यासाहेब याच सुमारास किंवा पुढे नागपुरास पुन्हा आले असावेत असे वाटते. हा फोटो मॉरिस कॉलेजातील शारदामंडळाच्या किंवा हिस्लॉप कॉलेजातील महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळाच्या सदस्यांचा नाही. खामगावच्या हायस्कुलातील तात्यांच्या चाहत्या विद्यार्थ्यांचा आहे. त्यात माझा कोलत्यांमुळे, श्रोतींचा अडावदकरांमुळे आणि मांजरेकरांचा ब्रह्मांमुळे समावेश झाला आहे. हा फोटो काळे आणि बाक्रे यांच्या स्टुडिओत काढण्यात आला आहे. त्या काळी नागपुरात सीताबर्डी विभागात हा स्टुडिओ नावाजलेला होता.

कविभूषण प्रो. बळवंत गणेश खापर्डे, अमरावती

(१)

विदर्भातल्या साहित्यप्रेमी लोकांची सभा अथवा विदर्भ-साहित्यसंघाच्या संमेलनाचे (तेव्हा आम्ही त्याला 'परिषद्' म्हणत असू) पहिले अधिवेशन. विदर्भ–साहित्य संघाच्या स्थापनेकरता मी ही सभा बोलाविली होती. हिच्यातच संक्रातीच्या सुमुहूर्तावर दि. १४ जानेवारी १९२३ रोजी संघाची स्थापना झाली. अध्यक्ष तात्यासाहेब (श्री. कृ.) कोल्हटकर होते. सर्व पाहुणे आमच्याच घरी उतरले

होते. त्या वेळी, अशा अगदी पहिल्याच सभेला, दुसरी सोय काय असणार ? तात्यासाहेबांना आमच्या वाड्यात माडीवरच्या एका खोलीत उतरविले होते. दोन दिवसांचे अधिवेशन होते.

एके दिवशी,–मला वाटते संमेलन सुरू होण्याचाच दिवस असावा,—तात्यासाहेब म्हणाल्यावरून एक नापित बोलावला आणि तात्यासाहेबांनी श्मश्रू करविला. श्मश्रू झाल्यावर तात्यासाहेब उठले आणि खिशातून पाकीट काढून नापिताला पैसे देऊ लागले. माझे सर्वांत वडील बंधु बाबासाहेब हे योगायोगाने त्याच वेळी गच्चीवरून त्या खोलीच्या दाराशी येऊन पोहोचतच होते. ते एकदम तात्यासाहेबांना म्हणाले, "नाही नाही, तात्यासाहेब. आपण पैसे देऊ नका. आम्ही देतो." तात्यासाहेब म्हणाले, "नाही नाही, मी देतो ना ?" बाबासाहेबही विनोदीच. ते तात्यासाहेबांना म्हणाले, "अहो, असं काय करता ? निदान अध्यक्षांची हजामत केल्याचं श्रेय तरो आम्हाला मिळू द्या ?" तेव्हा तात्यासाहेब मोठ्याने हसले आणि आपले पाकीट त्यांनी खिशात परत टाकले.

(२)

त्याच अधिवेशनाच्या वेळची गोष्ट. त्या संमेलनाचे सबंध वातावरणच अतिशय खेळीमेळीचे, प्रेमाचे आणि आपुलकीचे होते. संमेलनाच्या जागी, म्हणजे येथील थिऑसॉफिकल लॉजच्या जोशी हॉल मध्येच, रात्री परस्परपरिचयासारखा किंवा स्नेहसंमेलना–सारखा, प्रतिनिधींचाच आपसात एक कार्यक्रम झाला. त्या वेळी तात्यासाहेबांनी आपल्याच एका नाटकांतले एक निवडक पद आम्हाला स्वतः म्हणून दाखविले. ते चांगले गात असत.

(३)

त्याच कार्यक्रमातली गोष्ट आहे. तात्यासाहेब आम्हाला म्हणाले, "मी तुम्हांला एक गंमत करून दाखवतो. अष्टावधान्यासारखा प्रयोग करून दाखवतो". आम्हाला आश्चर्य वाटले. तेथे जमलेल्या प्रतिनिधींनी आठवण ठेवण्याकरता अनेक गोष्टी तात्यासाहेबांना सांगितल्या किंवा त्यांच्या बरोबर केल्या. त्या काय होत्या हे, शेहेचाळीस वर्षांनंतर, आता काही आठवत नाही. पण इतके पक्के आठवते की, तात्यासाहेबांनी प्रयोगाच्या शेवटी त्या सर्वांची उत्तरे अगदी बरोबर दिली. घरी परत येतांना तात्यासाहेब मला म्हणाले, "तशी माझी स्मरणशक्ती फार कच्ची आहे. पण अशा प्रयोगाच्या वेळी मी प्रत्येक गोष्ट एका एका कोणत्या तरी वस्तूशी माझ्या मनात संबद्ध करून ठेवतो, त्याने मला बरोबर उत्तरे देता येतात."

(४)

आता मी सांगणार आहे त्या आठवणीतील तपशील मला काहीच आठवत नाही. न जाणो, कदाचित् ही मी तेव्हा नुसती ऐकलेलीही असेल. पण ही गोष्ट घडलेली आहे आणि खरी आहे, हे निश्चित.

एकदा तात्यासाहेब आगगाडीने प्रवास करीत होते. एका मोठ्या स्टेशनवर गाडी थांबली. वडनेरा स्टेशनवरचीच ही गोष्ट आहे, अशीही एक अतिशय धूसर आठवण मनात घोटाळते आहे. पण ती बरोबर की चूक, हे सांगता येत नाही. तात्यासाहेबांच्या सन्मानाकरता, त्यांना भेटण्याकरता, त्यांना पाहाण्याकरता, काही लोक त्यांच्या डब्याजवळ गोळा झाले होते. त्यातला कोणीतरी एक जण,–त्यांना पाहायला आलेल्यांपैकी तो असला पाहिजे,— गैरसावधपणे तात्यासाहेबांना म्हणाला, "मी आपलं नाव पुष्कळ ऐकलं आहे. पण, मला वाटलं, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर म्हणजे मागल्या काळात होऊन गेलेली कोणीतरी व्यक्ती आहे." ह्यावर तात्यासाहेब त्याला एकदम म्हणाले, "मग मी जिवंत आहे हे पाहून तुमची काही निराशा तर झाली नाही ना ?"

(५)

तात्यासाहेब पायात बूट घालीत. त्यावर मोजे आणि तेही सुती आणि एकावर एक तीन–तीन, चार-चार ! हे अर्थात् थंडी करता नसे. थंडीकरता गरम मोजेही घालता आले असते. उपर्युक्त संमेलनाच्या वेळचीच आमच्या घरच्या वरच्या हॉलमधली गोष्ट आहे. तात्यासाहेबांना, बाबासाहेबांना (माझे बंधू) आणि मला बरोबर बाहेर जायचे होते. तात्यासाहेब उठले; त्यांनी अंगात कोट घातला; डोक्याला रुमाल बांधला आणि खाली बसून एक एका पायात भराभर एकावर एक तीन–तीन, ते चार–चार मोजे घालू लागले. बाबासाहेब जवळच उभे

होते. मीही होतो. आम्ही दोघेही पाहातच राहिलो? बाबासाहेबांना राहावले नाही. त्यांनी जिज्ञासेने शेवटी विचारलेच. तेव्हा तात्यासाहेब म्हणाले, "तुम्हाला माहीत नाही माझे पाय किती सेन्सिटिव्ह आहेत. जरा माती बसली की लागलीच फुटतात."

(६)

तात्यासाहेब तेव्हा दिवसातून एकदाच जेवत असत; आणि तेही दुपारी नव्हे, तर रात्री आठ वाजता. ही त्यांनी आपली जेवणाची वेळ आम्हाला सांगितली होती. दिवसभर ते चहावर वगैरे राहात. पण दिवसभराची कामे अगदी नेहमीप्रमाणे करीत. न जेवताना दिवसभराची कामे करताना थकवा वाटत नाही काय, म्हणून मी विचारले असता म्हणाले, "नाही. उलट एनर्जी वाटते.'

श्री. गोविंद शिवराम भिडे, खामगाव

[श्री. काशिनाथ रावजी ब्रह्म, वकील यांच्या या १९३० ते १९३२ सालातील आठवणी खामगावचे श्री. गोविन्द शिवराम भिडे यांनी संग्रहित केल्या आणि श्री. वा. ना. देशपांडे यांनी आमच्याकडे पाठवल्या.]

कै. तात्यासाहेब यांच्या आणि माझ्या वयात वास्तविक पिता–पुत्राएवढे अंतर. तरी पण वयाचा हा भेद न ठेवता अगदी मनमोकळेपणाने ते आमच्याशी बोलत असत.

१. 'पिठले' हा पदार्थ तात्यांच्या खूपच आवडीचा. एकदा मी तात्यांकडे गेलो. ते माडीवर होते. त्यांच्या सूनबाई, म्हणजे आमच्या सौ. सुशीलावहिनी, या स्वैंपाकघरात होत्या. पिठले केल्याचा संशय येताच, "काय वहिनी, आज पिठले केले वाटते?" असे म्हणत म्हणतच मी आत जाऊ लागलो. तोच नाकावर बोट ठेवून पुढे येत वहिनी म्हणाल्या, "अरे, जरा हळू बोल. आत्ताच जेवण करून तात्यासाहेब वर गेले आहेत. पिठल्याचे नाव ऐकले तर पुन्हा पाटावर येऊन बसतील!"

२. एकदा मी व बापू (तात्यांचा नं. २ चा मुलगा) आम्ही अभ्यासाचे खोलीत गप्पा करीत होतो. सकाळी नऊचा सुमार होता. तात्या नापिताची वाट पाहात होते (तेव्हा सलून नव्हते. नापित घरोघरी जात असत.). दहा वाजले तरी नापित येण्याचे चिन्ह दिसेना. तात्यांना दाढी करून बाहेर कामाला जायचे होते. म्हणून बापूने त्यांना विचारले, "तात्या माझा सेफ्टी रेझर देऊ का?" त्यावर हाताने विशिष्ट खूण करून तात्या म्हणाले, "नको रे बाबा, तुझ्या त्या रेझरला मिशांवरून फिरायची सवय आहे. मला नको तो रेझर."

३. रोज सायंकाळी क्लबावर गेल्याशिवाय तात्यांना मुळीच करमत नसे. परंतु डोळ्यांनी नीट दिसत नसल्यामुळे त्यांचेबरोबर मी नेहमीच जात येत असे. एकदा असेच क्लबाकडे जाताना रस्त्याच्या कडेला उतारावर त्यांचा पाय घसरला. तेव्हा मी तात्काळ त्यांना सावरले. तात्या म्हणाले, "पाहिलंस, याकरिता मी तुला बरोबर घेत असतो. तरुणपणी पाय घसरला तर काही वाटत नाही. पण म्हातारपणात पाय घसरणं बरं नाही!"

४. तात्या आले की क्लबात गप्पांना अगदी ऊत येई. एके दिवशी क्लबात अशीच बैठक रंगली. खूप गप्पा चालल्या होत्या. एक गृहस्थ म्हणाले, "तात्यासाहेब, हे फार झालं. तुम्हाला आता लोक फाजील विनोदाचे जनक असं म्हणू लागले आहेत." त्यावर तात्या अगदी शांतपणे म्हणाले, "अहो! मला हे सांगा, फाजीलपणा केल्याशिवाय का कोणी कुणाचा जनक झाला आहे?" तेथे असलेल्या मंडळीचो हसून हसून त्रेधा उडाली.

५. तात्यांचे नाट्यप्रेम सर्वश्रुतच आहे. एकदा कै. मास्टर दीनानाथ आपली कंपनी घेऊन खामगांवला आले. प्रयोगाचे वेळी अर्थातच तात्यांना अग्रभागी स्थान असे. पहिल्या अंकानंतर मंडळींना भेटण्याकरिता (कलावंतांना) तात्या विंगमध्ये गेले. तात्या आलेले पाहून स्त्रीवेषातील मास्टर दीनानाथ लगबगीने तात्यांकडे चालत आले. प्रत्यक्ष स्त्रियांना लाजवील अशा देखण्या आणि आकर्षक रूपात दीनानाथ जवळ येताच दूर सरकत तात्या म्हणाले, "नको, तू अधिक जवळ येऊ नकोस. परस्त्री विषासमान असते. तू दूर हो!"

६. तात्या जितके विनोदी तितकेच सहृदय होते. पन्नालाल नामक आपल्या कारकुनाची सांपत्तिक स्थिती लक्षात घेऊन, त्याला घर बांधण्यास अगर शेतीवाडी करण्यास एकदा तीन हजार रुपये तात्यांनी देऊ केल्याचे मला अजून स्मरते.

श्री. शं. ब. मेरेकर, अकोला

कै. तात्यासाहेव कोल्हटकरांच्या पत्नी सौ. माई यांना कीर्तन-श्रवणाचा फार नाद असे. माझ्या कीर्तनातील विनोदी गोष्टी त्यांना रिझवीत व घरी त्यावद्दल त्या तात्यासाहेवांजवळ बोलत असत. त्यावरून तात्यासाहेवांनी मला मुद्दाम घरी बोलावून माझ्याशी परिचय करून घेतला. अशा रीतीने या कुटुंबाशी माझा निकट संबंध आला व त्याची मला नेहमी मदत झाली.

तात्यासाहेवांचा रुबाबदार चेहेरा, किंचित बारीक, तेजस्वी डोळे, गौर वर्ण, डोक्यावर जरीचा पांढरा रुमाल, अंगात पांढरा कोट, वर पांढरे उपरणे हे पाहून त्यांच्यावद्दल मनात आदर उत्पन्न होई. एखाद्या माणसाला 'आपले' म्हटल्यानंतर मग तेथे मानसन्मानाची त्यांची मुळीच अपेक्षा नसे. घरी ते गुणगुणत, खालच्या स्वरात, संगीत पदें नेहमी म्हणत असत.

तात्यासाहेवांची स्मरणशक्ती विलक्षण होती; व तिचे प्रयोगही ते करून दाखवीत. "आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना हा प्रयोग एकदा करून दाखवा," अशी मी त्यांना विनंती केली होती. ती लक्षात ठेवून एके दिवशी अचानकच ते शाळेत आले. आम्ही सर्व विद्यार्थी हॉलमध्ये गोळा केले. तात्यांनी एका फळ्यावर तीस पस्तीस पदार्थाची नावे आकडेवार लिहावयास सांगितली. त्या यादीकडे त्यांनी काही वेळ लक्षपूर्वक पाहिले. त्यानंतर त्यांनी फळा पुसावयास सांगितले आणि वस्तु व तिचा अनुक्रम ह्यापैकी जे हवे ते बिनचूक सांगितले. हे पाहून मुले थक्क झाली; व "आपण हे कसे करता?" असा प्रश्न त्यांनी तात्यांना विचारला. ते म्हणाले, "ते मी आता तुम्हाला समजावून सांगतो. म्हणजे तुम्हालाही त्याचा फायदा होईल. लिहिलेल्या वस्तूंची नावे मी वाचतो व त्यांचा गोष्टीसारखा परस्पराशी संबंध जुळवितो. उदाहरणार्थ, या ठिकाणी प्रथम 'झाड' हा शब्द आहे व दुसरा शब्द 'शाळा' असा आहे. मी लगेच मनात तयार करतो, झाडाच्या छायेत शाळा आहे. तिसरा शब्द आहे दार. त्याच शाळेला दार असून खिडकीही आहे, असा संबंध मी जुळवून ठेवतो. त्यामुळे एकामागून एक गोष्टी माझ्या लक्षात राहतात. तुम्हीही प्रयत्न करा. तुम्हालाही आपली स्मरणशक्ती वाढविता येईल."

तात्यासाहेवांनी तऱ्हेतऱ्हेच्या गंमतीदार गोष्टी सांगितल्या. त्यातली एक मला आजही आठवली म्हणजे हसून मुरकुंडी वळते. हे गृहस्थ छत्री घेऊन फिरायला गेले होते. घरी परत आल्यानंतर त्यांनी छत्री खुर्चीवर ठेवली आणि स्वतः कोपऱ्यात जाऊन उभे राहिले. त्यांची पत्नी काही वेळाने चहाचा कप घेऊन आत आली, तो हा प्रकार! गृहस्थ वरमले; व छत्री कोपऱ्यात ठेवून स्वतः खुर्चीवर बसून चहा घेऊ लागले.

आमच्या शाळेत दरवर्षी गणपती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत असे. एके वर्षी ह्या उत्सवात आम्ही 'साहित्यवत्तिशी' मधील 'चोरांचे संमेलन' प्रहसनरूपाने करून दाखविण्याचे योजिले. 'आम्ही हे नाटक करून दाखविणार आहोत. ते पहायला आपण अवश्य यावे,' अशी आम्ही तात्यासाहेवांना विनंती केली. तात्या किंचित् हसून म्हणाले, 'त्या प्रयोगात तुम्ही मला अध्यक्ष करणार आहात की काय?' हे ऐकून आम्ही सारेजण हसू लागलो. मी म्हटले 'तसे नाही. आपण फक्त प्रेक्षक म्हणूनच यावे!'

तात्यासाहेव आले. सुमारे दोन तास प्रयोग चालला होता. तात्यासाहेव सारखे हसत होते; जातांना त्यांनी अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांना पाच-पाच रुपये बक्षीस दिले व म्हणाले, 'इतर प्रसंग घेऊन तुम्ही असेच प्रयोग जरूर बसवा.' प्रोत्साहित होऊन आम्ही नंतर पांडू तात्या व बंडू नाना ह्या त्यांच्या पात्रांच्या कथानकावर प्रयोग बसविलेही होते. परंतु ते मात्र तात्यासाहेबांनी पाहिले नाहीत.

तात्यासाहेवांचा धाकटा मुलगा दिवाकर शेती पाहण्यासाठी माटरगाव या खेड्यात राहत असे. त्यालाही नाटकाचे वेड होते. खेड्यातील मंडळीच्या सहाय्याने त्याने एकदा एक नाटक बसविले आणि प्रयोग पाहाण्यासाठी तात्यासाहेवांना आग्रहाचे निमंत्रण केले. तात्यासाहेवांनीही माटरगावला नाटक पहायला जाण्याचे कबूल केले. ठरलेल्या दिवशी ते माझ्यासह जायला निघाले. जलंबपर्यंत आगगाडीने व त्यानंतर तीन एक मैल बैलगाडीने, असा प्रवास होता. पण बैलगाडीचा प्रवास काही वक्तशीर होतोच असे नाही. आमची दमणी माटरगावला पोहोचली, त्या वेळी ९॥ वाजून गेले होते. चहा फराळ वगैरे आटोपून आम्ही

नाटकासाठी उभारलेल्या मंडपात जाऊन पोहोचलो. तोपर्यंत साडे दहा होऊन गेले होते.

उशीर फार झाला, त्यामुळे त्या नाटकातल्या मुख्य नटाची समजूत झाली की, आता काही प्रयोग होणे शक्य नाही. तो होता गांजेकस. घरी जाऊन त्याने चिलीम ओढली आणि स्वस्थ तण्णावून दिली.

तात्यासाहेब व इतर प्रेक्षक मंडळी स्थानापन्न झाली. पण मुख्य नट कुठे आहे! शोधाशोध सुरू झाला. दिवाकर त्याला बोलावण्यासाठी त्याचे घरी गेला. तो होता झोपेत आणि गांजाच्या तारेत. त्याने स्वच्छ सांगितले, 'मला आता घड उभेही राहवत नाही. माझ्याच्याने काम होणार नाही!'

आता काय करायचे ?

इतका सारा खटाटोप आता व्यर्थ जाणार, म्हणून दिवाकर व इतर सर्वच मंडळी फार नाराज झाली. तात्यासाहेबांना अडचण सांगण्यात आली. शेवटी त्यांनीच अशी तोड सुचविली,—त्या मुख्य नटाची भाषणे दिवाकरने पुस्तकावरून वाचावी, व बाकीच्या पात्रांनी आपापली कामे करावी. त्याप्रमाणे प्रयोग सुरू झाला. पण आणखी एक घोटाळा व्हायचा होताच.

एक पुरुषपात्र आपले भाषण स्टेजवर म्हणत होते. भाषण चालू असतानाच त्याची डावीकडची मिशी गात्ठी गममुळे नीट चिकटवली गेली नव्हती, ती एकाएकी गळून खाली पडली. पात्राच्या ते लक्षात येताच त्याचे भाषण मधेच बंद पडले. खाली पडलेल्या त्या मिशीकडे तो बराच वेळपर्यंत नुसते पाहात उभाच राहिला. पुढे काय करावे ते त्याला सुचेचना. शेवटी तात्यासाहेबांनीच त्या नटाला आपली मिशी घेऊन आत जायला सुचविले. नाटकही आता येथेच संपविले तरी चालेल, असेही ते म्हणाले. ते ऐकून बहुतेक पात्रे म्हणाली, 'नाही तरी पुढचा अंक आमचा कच्चाच आहे!'

दुसरे दिवशी आम्ही परत आलो. तात्यासाहेबां-सारखा प्रसिद्ध नाटककार, नाटकाचा दर्दी, केवळ सर्वांना उत्तेजन मिळावे म्हणून येताना एवढेच म्हणाला, 'तुम्ही शहरातून होणारे नाटकांचे प्रयोग पाहण्याचा प्रयत्न करा म्हणजे तुमची चांगली सुधारणा होईल.'

लेले आणि कोल्हटकर यांच्या पत्रांची पार्श्वभूमी

ग. त्र्यं. माडखोलकर

' युगवाणी 'च्या या अंकात माझ्या संग्रही असलेली श्री. पु. रा. लेले यांची बारा पत्रे आणि आमच्या मुंबईच्या सन्मान्य मित्रांनी श्री. शंकरराव शास्त्री यांच्याकडे पाठवलेली पाच पत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. ही पत्रे वाचून मराठी साहित्याच्या अभ्यासकांच्या मनात अनेक प्रश्न उद्‌भवतील. म्हणून या पत्रांची पार्श्वभूमी थोडक्यात विशद करीत आहे.

प्रथम कोल्हटकरांच्या पत्रांसंबंधी खुलासा करतो. मजजवळ त्यांची सुमारे ५०० पत्रे होती. ती गांधीवधानंतर, ता. २ फेब्रुवारी १९४८ रोजी झालेल्या नागपूर शहरातील जाळपोळीत, आमच्या ' शांतानिवासा 'च्या विध्वंसात नष्ट होऊन गेली. कोल्हटकरांच्या या पत्रात आपल्या कोणत्याही शिष्याविषयी किंवा समकालीनाविषयी एकही प्रतिकूल शब्द लिहिलेला नव्हता. ती बव्हंशी साहित्यचर्चात्मक आणि अंशत: त्यांच्या स्वत:च्या जीवनाविषयी आणि साहित्याविषयी माहिती देणारी होती. शिष्टाचार आणि संयम यांचे काटेकोर परिपालन हा कोल्हटकरांच्या स्वभावाचा विशेष होता. त्यामुळे, एकाद्या प्रमुख व्यक्तीविषयी ते जरी विनोदाच्या ऊर्मीत बोलू नये ते क्वचित बोलून गेले, तरी लगेच मला म्हणत असत की, " गजाननराव, हे सगळे आपण विसरून जा. श्रीमंत दादासाहेब किंवा सर मोरोपंत यांच्यासंबंधीच्या ज्या आख्यायिका मी आता आपल्याला सांगितल्या, त्या म्हणजे केवळ एक गंमत आहे, असे समजा ! " परनिंदा आपल्याकडून घडू नये, म्हणून कोल्हटकर इतकी विलक्षण दक्षता घेत असत. या अंकात छापलेल्या त्यांच्या पत्रातील क्रमांक १, २ आणि ४ ही पत्रे त्यांच्या या सौजन्याची निदर्शक आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून त्यांचे समकालीन किंवा शिष्य यांच्यासंबंधी कोणत्याही प्रकारची अप्राकृतिक (Abnormal) किंवा अप्रशस्त स्वरूपाची माहिती माझ्या कानांवर कधी आली नाही.

१९२२ च्या नोव्हेंबरमध्ये मी जेव्हा पुण्यास भारत सेवक समाजामध्ये राहावयाला गेलो, तेव्हा रविकिरण मंडळाचे सुरुवातीला सदस्य असलेले श्री. शंकर काशिनाथ गर्गे ऊर्फ नाटयछटाकार दिवाकर यांच्याशी माझा निकट संबंध आला. ' ज्ञानप्रकाशा 'च्या ' काव्य–शास्त्र–विनोदा 'त त्यांच्या नाटयछटांना मी प्रमुख स्थान देत असे. त्यामुळे हा संबंध दृढ झाला. महाराष्ट्र नाटक मंडळीचे एक संस्थापक आणि संचालक श्री. त्र्यंबक सीताराम ऊर्फ अण्णासाहेब कारखाननीस हे श्री. गर्गे यांचे परम स्नेही होते. दोघेही ओंकारेश्वराच्या वाटेवर नदीकाठी असलेल्या आपल्या वडिलार्जित घरात राहत असत; व रोज सायंकाळी नेमाने फिरावयाला जात असत मी नारायण पेठेत प्रथम हुंडीवाले साठे यांच्या वाडयात आणि पुढे नारायण पेठेच्या हमरस्त्यावरील श्री. केळकर यांच्या बंगलेवजा घरात राहत असताना, हे दोघे स्नेही, आपल्या सायंकाळच्या सहलीत, मधून मधून मजकडे यावयाचे. १९२४च्या जानेवारीत, कै. गडकरी यांच्या स्मृतिदिनाच्या वेळी, मी ' काव्य–शास्त्र–विनोदा 'त त्यांच्यावर लेख लिहिला. तो वाचून दुसऱ्या दिवशी सायंकाळी साडे पाचच्या सुमारास हे मित्रद्वय मजकडे आले; व श्री. अण्णासाहेब कारखाननीस यांनी मला आपल्या घरी येण्याचे निमंत्रण प्रथमच दिले. त्याप्रमाणे श्री. गर्गे यांच्याबरोबर नदीकाठी असलेल्या त्यांच्या घरी मी गेलो.

त्या दिवशीच्या आमच्या संभाषणात गडकरी हाच अर्थात् मुख्य विषय होता. कोल्हटकरांनी आपल्या या पट्टशिष्यासंबंधी मला काही वैयक्तिक स्वरूपाची

विशेष माहिती दिलेली आहे की नाही, हे प्रथम श्री. अण्णासाहेबांनी थोडे चाचपडून पाहिले. तशी काही माहिती मला मिळालेली नाही, अशी त्यांची खात्री पटल्यावर, मग त्यांनी आपल्या डायऱ्यातली काही खुणा घातलेली पाने वाचावयाला दिली. ती वाचून कै. गडकरी यांच्या वैयक्तिक जीवनाची तोपर्यंत अज्ञात असलेली माहिती मला मिळाली; व त्यासंबंधी बरीच निराळी कल्पना आली. मी डायऱ्यातील पाने वाचून संपवल्यावर श्री. अण्णासाहेब मला म्हणाले, "गडकरी हे आमच्या कायस्थ प्रभु समाजातले होते, हे आपल्याला माहीतच आहे. त्यांचे आणि माझे तसे दूरचे थोडे नातेही होते. त्यांची अलौकिक प्रतिभा आणि त्यांचे भाषाप्रभुत्व याच्याविषयी मला अत्यंत आदर होता. पण, मी त्यांच्याशी कठोरपणाने वागलो, त्यांना प्रोत्साहन दिले नाही, त्यांची नाटके आमच्या मंडळीतर्फे रंगभूमीवर आणावयाला मी नाराज होतो, इत्यादी प्रवाद आपल्याही कानावर आले असतील. हे प्रवाद किती चुकीचे आणि अन्यायाचे आहेत, याची कल्पना आपल्याला यावी, म्हणून मी मुद्दाम या डायऱ्यातला काही भाग आज आपणास दाखविला. गडकरी जसे अलौकिक प्रतिभाशाली होते, तसेच त्यांचे जीवन आणि वर्तनही सर्वसामान्य माणसाहून अगदी निराळ्या प्रकारचे होते. एका प्रतिष्ठित नाटकमंडळीचा जबाबदार चालक या नात्याने मला त्यांच्याशी, केवळ कर्तव्य म्हणून, काही एका पद्धतीने वागावे लागले. तसे वागताना मी जात, नातेगोते किंवा वैयक्तिक आदर या भावना आड येऊ दिल्या नाहीत." मी यावर काहीच बोललो नाही. पुढे मे महिन्यातील आमच्या भेटीत मी ही हकीकत कोल्हटकरांना सांगितली. तेव्हा, ते एकदम गंभीर झाले आणि फक्त एवढेच म्हणाले की, "मला हे थोडेसे ऐकून माहीत आहे. खुद्द गडकऱ्यांच्या मातोश्रीच मजजवळ काही गोष्टी बोललेल्या होत्या. पण, असामान्य प्रतिभेच्या माणसाचे जीवनही असामान्य असते, ही गोष्ट ध्यानात घेऊन आपण त्यांच्यासंबंधी सहृदयतेने विचार करावयाला हवा. ज्याची सौंदर्याची जाणीव तीव्र असते, त्याची नीतिमत्ता निष्कलंक राहणे कठीण आहे, हे माझे मत मी आपणास अनेकदा सांगितलेले आहे. ते ध्यानात घेऊन आपण गडकऱ्यांविषयी विचार करावयाला हवा, असे मला वाटते." मला हे त्यांचे म्हणणे योग्य वाटले.

श्री. लेले यांचा स्वभाव याच्या अगदी उलट! त्यांच्याजवळ सदभिरुचि, शिष्टाचार, भीडमाड वगैरे काहीही नव्हते. बोलणे सगळे फटकळ, रोखठोक,— अगदी घणाच्या घावासारखे. ते बोलावयाला लागले, म्हणजे ठिणग्या पडावयाच्या आणि ठिकऱ्या उडावयाच्या! त्यांनी स्वतःच, आपल्या ता. १८ नोव्हेंबर १९६३ च्या पत्रात म्हटल्याप्रमाणे, श्री. गोविंदराव टेंबे यांच्या सूचनेनुसार, १९५३ साली, मुख्यतः कोल्हटकरांसंबंधी, माझ्याशी पत्रव्यवहार सुरू केला. तो १९६५ च्या मेमध्ये त्यांचे देहावसान होईपर्यंत अखंड चालू होता. या बारा वर्षांच्या कालावधीतील मी त्यांची महत्त्वाची दोनशे पत्रे जपून ठेवलेली आहेत. केव्हा केव्हा एकाद्या दिवशी त्यांची तीन तीन पत्रे सुद्धा मला यावयाची. आमचा पत्रव्यवहार सुरू झाल्यापासून मी जेव्हा जेव्हा मुंबईला जात असे, तेव्हा तेव्हा श्री. उमाकांत मेंडे, श्री. राजा कारळे, सौ. उमा माडखोलकर किंवा प्रो. डॉ. सुनील सुभेदार यांच्यासह त्यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेत असे. अशा रीतीने मी बरोबर दुसरी माणसे घेऊन गेलेले त्यांना मुळीच आवडत नसे; व मग ते माझ्याशी मोकळेपणाने बोलतही नसत. त्यामुळे पत्रव्यवहार हाच आमच्या साहित्यसंवादाचे मुख्य माध्यम होऊन बसला होता. या पत्रव्यवहारातील देवल यांच्यापासून तो गडकरी यांच्यापर्यंत निरनिराळे नाटककार आणि नट यांच्याविषयी त्यांनी मोहोरबंद पाकिटातून मला पाठवलेली माहिती अक्षरशः लोकविलक्षण आणि अगदी चमत्कारिक वाटण्यासारखी आहे. तथापि, ती माहिती बव्हंशी खरी असल्याचे, पुढे प्रत्यंतर पुराव्याच्या आधाराने, माझ्या प्रत्ययाला आले. श्री. लेले यांच्या जिभेला जरी हाड आणि लेखणीला जरी शिष्टाचाराची चाड नव्हती, तरी कोल्हटकरांचा एक गुण त्यांच्या ठिकाणी होता. "नामूलं लिख्यते किंचित्"—"पुराव्याशिवाय कोणतेही विधान करावयाचे नाही," हे कोल्हटकरांचे लेखनसूत्र त्यांनी आत्मसात् केलेले होते. त्यामुळे त्यांनी दिलेली माहिती आणि केलेली विधाने सप्रमाण व म्हणून काटेकोर आणि ठाशीव असत. त्यांचे रागद्वेष, पूर्वग्रह आणि दुराग्रह हे तीव्र असल्यामुळे, त्या माहितीला आणि विधानांना काय कडवटपणा येईल, तेवढाच. त्यांच्या एकाद्या विधानासंबंधी मी एकादे वेळी शंका घेतली, म्हणजे ते चटकन उठून आपल्यापाशी असलेला पुरावा माझ्यापुढे काढून ठेवीत.

आमच्या प्रत्यक्ष भेटीत एकदा कै. कारखाननीस यांच्या डायऱ्यातून घेतलेले कै. गडकरी यांच्या संबंधीचे उतारे मला त्यांनी वाचावयाला दिले. ते वाचल्यावर मी त्यांना म्हटले, "हे सर्व पुण्यास असतांना १९२४ सालीच मी वाचलेले आहे. मला त्यात काही नवीन नाही." तेव्हा त्यांनी मला विचारले, "यासंबंधी तुम्ही कधी अत्र्यांशी बोलला आहात का?" त्यावर मी त्यांना म्हटले, "हो, मी बोललो आहे." तत्क्षणी त्यांनी मला अत्यंत उत्सुकतेने विचारले, "मग ते काय म्हणाले?" मी त्यांना सांगितले, "अत्रे म्हणाले, 'हे सगळे तुम्हाला एकदा कळले, हे ठीक झाले. पण या गोष्टी लोकांपुढे आणण्याची काहीही गरज नाही. गडकरी दारू पीत असत आणि मीही पीतो. पण हे मी जाहीर रीतीने कधीही बोलणार नाही. दारू कोण पीत नाही? दुर्गुण आणि दुर्व्यसने कोणाला नाहीत? पण, त्यांचे प्रदर्शन करण्याची, त्यांची माहिती लोकांना देण्याची काहीही गरज नाही. खुद्द कोल्हटकरांचा हिराबाईंशी कोणत्या प्रकारचा संबंध होता, याबद्दल आपण अनेकदा बोललेलो आहोत. पण ते लोकांना सांगण्याची काय गरज आहे? सर्वसामान्य माणसांना असल्या गोष्टींची कारणे कळत नाहीत, अर्थ कळत नाही आणि मर्म तर मुळीच उमजत नाही. हे सगळे त्यांच्या बुद्धीच्या आटोक्यापलिकडले असते. कलाकारांचे दुर्गुण, दुर्व्यसने आणि दुराचरण ही पुष्कळदा त्यांच्या कलाविकासाला पोषक होतात, हे कळण्याची अक्कलच मुळी सामान्य माणसांना नसते. कलाकारांचे-बहुतेक सर्वच अलौकिक व्यक्तींचे-जीवन अलौकिक असते आणि पुष्कळदा अनैतिकही असते. लोकमान्य टिळकांसारखा अपवाद एकादाच. तुम्हाला तरी निदान मी हे सांगायला नको. कोल्हटकर फार संभावित आणि शहाणे होते. ते असल्या गोष्टींविषयी सहसा कधी बोलत नसत. लिहीत तर मुळीच नसत. ते टीका आणि टिंगल करीत. पण ती फक्त वाङ्मयाला अनुलक्षून असे. म्हणून, तुम्ही गडकऱ्यांविषयी जर कधी काही वेडे वाकडे लिहाल, तर मी तुमची गय करणार नाही, हे लक्षात ठेवा!'" त्यावर श्री. लेले हंसले आणि म्हणाले, "अत्रे हे जे बोलले ते खरेच आहे. तरी सुद्धा सत्य हे लोकांपुढे केव्हा ना केव्हा तरी आलेच पाहिजे. आणि तुमच्या सारख्या माणसांना तर ते अवश्य कळले पाहिजे. जुन्या पिढीतल्या नाटककारांत कोल्हटकर आणि त्याहीपेक्षा खाडिलकर आणि खरे-शास्त्री हे त्यातल्या त्यात निर्मळ होते. इतरांच्याविषयी न बोललेलेच बरे! गडकऱ्यांविषयी सत्य सांगण्याची वेळ अजून आलेली नाही. पण केव्हा ना केव्हा तरी त्यांच्यासंबंधीचे संपूर्ण सत्य वाङ्मयाच्या अभ्यासकांना आणि टीकाकारांना कळलेच पाहिजे. गटे, बायरन आणि ऑस्कर वाइल्ड यांच्यासंबंधीचे संपूर्ण सत्य कळूनही जर त्यांचे व्यक्तित्व आणि वाङ्मय यांच्याविषयीचा आपला आदर कायम राहातो, तर तो गडकऱ्यांविषयी का राहू नये? ब्रिटिश एनसायक्लोपीडियासारख्या जगन्मान्य संदर्भग्रंथांतूनसुद्धा अलौकिक व्यक्तींच्या जीवनातली अशा प्रकारची सत्ये संक्षेपाने आणि सूचकतेने नमूद केलेली आहेत."

श्री. लेले आणि आचार्य अत्रे या दोघांच्या मतात श्री. लेले यांचे मत मला अधिक ग्राह्य वाटते. पण त्याबरोबरच, सर्वसामान्य लोकांपुढे अलौकिक व्यक्तींच्या चरित्रातील अशा प्रकारची सत्ये नागडी उघडी करून ठेवण्याची गरज नाही, हे आचार्य अत्रे यांचे म्हणणेही मला पटते. तथापि, सहृदय जाणकारांना तरी निदान अशा प्रकारची सत्ये संपूर्णतया कळलीच पाहिजेत. त्याशिवाय, प्रतिभाशाली व्यक्तींच्या व्यक्तित्वाचे तर राहोच, पण वाङ्मयाचेही यथार्थ आकलन होत नाही. मात्र ती सत्ये वाचकांपुढे मांडताना शक्य तोवर सौम्य आणि सूचक पद्धतीने मांडण्यात आली पाहिजेत. पाश्चात्य साहित्यकोशांची या बाबतीतील पद्धत मला आदर्श वाटते. म्हणूनच, श्री. लेले यांच्या पत्रातील काही विधाने, शब्दप्रयोग आणि शब्द मी गाळले आहेत. कोल्हटकरांच्या बाबतीत हा प्रश्न उद्भवतच नाही. कारण त्यांच्या खाजगी पत्रात देखील गाळण्याजोगे असे काही कधी मुळी नसेच.

हा खुलासा ध्यानात घेऊन लेले आणि कोल्हटकर यांची या अंकातली पत्रे वाचावीत, अशी माझी विनंती आहे.

२

कै. रमाबाई कोल्हटकर यांचा परिचय

कोल्हटकरांनी 'आत्मवृत्ता'त पान ६ वर आपल्या विवाहासंबंधी अशी माहिती दिली आहे की, "माझ्या वयाच्या १५ व्या वर्षी माझा विवाह झाला. माझी पत्नी खामगाव येथील वकील वामनराव जोशी यांची कन्या होय. लग्ननिश्चयापूर्वी वराच्या व वधूच्या वडिलांनी वधूस व वरास पाहिले नव्हते. बी. ए. होईपर्यंत लग्न करावयाचे नाही, असा माझा, माझ्या चुलत्यांचे उपदेशावरून, निश्चय झाला होता. पण, माझ्या वडिलांस इतकी भीड घालण्यात आली की, मान्यता दिल्याशिवाय त्यांस गत्यंतर उरले नाही."

कोल्हटकरांचे जामात प्रि. भा. ल. पाटणकर यांनी नाशिकहून ता. २६–९–६२ रोजी मला पाठवलेल्या पत्रात श्री. रमाबाईंविषयी अशी माहिती दिलेली आहे की, "ती. माईंचे माहेरचे नाव साळुबाई व सासरचे रमाबाई. त्यांचे वडील वामनराव ऊर्फ काका जोशी हे जुन्या काळाचे नाणावलेले मराठी वकील. त्यांनी खूप पैसा मिळवला. त्यांचे मालकीचे मोठे घर जुन्या खामगावमध्ये, म्हणजे नदीपलिकडे, बालाजी मंदिराजवळ होते. काही वर्षांपूर्वी मी ते घर मुद्दाम जाऊन पाहिले. ती. माईंना चार भाऊ व तीन बहिणी. एक बहिण भिवंडीकडे असलेले श्री. कुंटे या सिव्हिल जज्जांच्या पत्नी. माईंचे भाऊ व बहिणी आता कोणी हयात नाहीत. माईंची एक भावजय गोदूमामी या हयात आहेत."

कोल्हटकरांच्या पौत्री कु. इंदुमती कोल्हटकर यांनी, खामगावाहून ता. ७–१–६३ रोजी मला पाठवलेल्या पत्रात, आपल्या आजीविषयी पुढील माहिती दिली आहे—

"सध्या कै. माईंची एक भावजय माझ्या मोठचा मामी ती. गोदूताई जोशी या अकोल्यास आहेत. मी त्यांना प्रत्यक्ष भेटले नाही. परंतु, पत्रद्वारे त्यांनी मला जी माहिती कळविलेली आहे, ती देत आहे.

कै. माईंच्या वडिलांचे नाव श्री. वामनराव लक्ष्मणराव जोशी आणि आईचे नाव श्री. लक्ष्मीबाई जोशी. वडिलांचा धंदा वकिलीचा. सांपत्तिक स्थिति अतिशय चांगली. खामगावात जुन्या गावात, बालाजीच्या देवळाजवळ, मोठे घर. गावातील लोक असे सांगतात की, जवळपासच्या वीस पंचवीस लोकांना देण्यासाठी एक पात्र दूध व देवासाठी फुले अशी रोज पाटावर प्रत्येकाच्या वाटयाची मांडून ठेवलेली असत.

त्यांना एकंदर चार मुले. पहिले यशवंतराव हे वडिलांना त्यांच्या वकिलीच्या धंद्यात मदत करीत. त्यांच्या प्रथम पत्नीचे नाव मथूताई आणि द्वितीय पत्नीचे गोदूताई. या गोदूमामींनीच मला आजोळची माहिती दिली. यशवंतरावांना प्रथम पत्नीपासून पाच मुले व दोन मुली व द्वितीय पत्नीपासून तीन मुले व दोन मुली झाल्या. दुसरे चिरंजीव केशवराव हे कचेरीत कारकून होते. त्यांच्या प्रथम पत्नीचे नाव जानकी आणि द्वितीय पत्नीचे सीता. द्वितीय पत्नीला दोन मुली आणि एक मुलगा झाला. मुलांची स्थिती खाऊन पिऊन सुखी आहे. तिसरे चिरंजीव पाडुरंगराव. हे अविवाहित होते. त्यांनी नाटक मंडळयांत नट म्हणून व्यवसाय केला. चवथे चिरंजीव पुरुषोत्तमराव. हेही अविवाहित. अकोल्यास कचेरीत कारकून आहेत.

कै. माई ही एकटीच मुलगी होती. तिचे लग्न वयाच्या सातव्या वर्षी झाले.

ती. गोदूताई जोशी यांचेही वय बरेच झाले आहे. शिवाय त्यांची मुले मोठमोठी होऊन वारली. तोही एक जबरदस्त तडाखा आणि त्या सर्वांच्या जोडीला त्यांची हल्लीची सांपत्तिक विकट परिस्थिती या सर्व गोष्टींमुळे वैभवात वाढलेली ही आमची मामी खूप खचून गेली आहे."

प्रि. पाटणकर आणि कु. इंदुमती कोल्हटकर यांनी दिलेल्या वरील माहितीत एक महत्वाचा फरक आहे. तो असा की, प्रि. पाटणकर यांनी श्री. रमाबाईंना तीन बहिणी असल्याची माहिती दिलेली आहे; तर कु. इंदुताईंनी, कै. माई ही एकटीच मुलगी होती, असे विधान केले आहे.

खामगावचे गेल्या वर्षी दिवंगत झालेले नामांकित कायदेपंडित आणि कार्यकर्ते श्री. भाऊसाहेब ओझरकर

यांचे कोल्हटकर कुटुंबाशी आणि खुद्द तात्यासाहेबांशीही घनिष्ठ संबंध होते. कोल्हटकरांचे द्वितीय चिरंजीव श्री. प्र. श्री. कोल्हटकर यांचे ते स्नेही आणि सहाध्यायी होते. त्यांनी ता. १५–१–६३ रोजी खामगावाहून मला पाठवलेल्या पत्रात श्री. रमाबाईंविषयी अशी माहिती दिलेली आहे की,—

" श्री. माई या अजिबात शिकलेल्या नव्हत्या; व त्यांना वाङ्मयाविषयी वगैरे आवडही नव्हती. पण, कै. तात्यासाहेबांना खामगावात जी प्रतिष्ठा होती, त्यामुळे पुढे त्यांना सार्वजनिक कामाविषयी गोडी उत्पन्न झाली; व स्त्रियांच्या संस्थांत त्या भाग घेत असत. त्या आदर्श गृहिणी होत्या. माहेर आणि सासर ही दोन्ही संपन्न असल्यामुळे व तात्यासाहेबांची वकिलीही उत्तम चालत असल्यामुळे, त्या उदार आणि खर्चिक होत्या. आल्या गेल्याचा परामर्श प्रेमळपणाने घेत असत. त्या धर्मशील होत्या; व कोल्हटकरांच्या घराण्यात येऊनही जुन्या मताच्या होत्या. पण त्यांचे सोवळे ओवळे, व्रतेवैकल्ये, जुनी मते वगैरे पाहुणचाराच्या आड कधी आली नाहीत. घरात जातिभेद मुळीच पाळला जात नसे. भाऊसाहेब जयवंत, सुंदरराव कोठारे, यशवंतराव टिपणीस, गडकरी, केशवराव भोसले, दीनानाथ मंगेशकर, हिरावाई वडोदेकर यांच्यासारखी निरनिराळ्या जातींची मंडळी तात्यासाहेबांच्याकडे जेवावयाला असे आणि उतरतही असे. पण, माईनी अशा सर्व मंडळीचे आदरातिथ्य मोठ्या अगत्याने केले. त्यांच्या जुन्या मतांची आणि नेमधर्मांची तात्यासाहेब थट्टा करीत आणि म्हणत की, 'बायको धर्मशील आणि सुगरण असली, म्हणजे नवऱ्याची आणि मुलाबाळांची चंगळ असते ! त्यांना नेहमी निरनिराळे पदार्थ आणि पक्वान्नें खावयाला मिळतात. 'निर्जळी एकादशी' या माझ्या विनोदी लेखात मी वर्णन केलेले सगळे फराळाचे पदार्थ आमच्या घरात नेहमी तयार होणारे आहेत.' श्री. माईंच्या या सौजन्यामुळे तात्यांना त्यांच्याविषयी फार आदर असे.

कै. तात्यासाहेबांनी आपल्या कचेरीत आणि बैठकीत अस्पृश्यतासुद्धा कधीही चालू दिली नाही. १९१६ साली होमरूलची चळवळ सुरू झाल्यावर तर आपल्या घरातली विहीरही त्यांनी अस्पृश्यांना खुली केली. त्यामुळे मागच्या अंगणात आणि माजघरापर्यंत अस्पृश्य जातीतील स्त्रीपुरुषांचे येणे जाणे सुरू झाले. पण माईंचे वागणे या बाबतीत अनुकूल होते; व आपल्याकडे येणाऱ्या या अस्पृश्य मंडळीला त्या अन्न, कपडे वगैरेची मदत करीत असत. त्यामुळे त्यांच्याविषयी सर्वत्र आदराची भावना होती. "

स्वत: कोल्हटकर मला खामगावला आपल्या घरी येऊन काही दिवस रहाण्याचा आग्रह वारंवार करीत असत. तेव्हा, ते मला म्हणावयाचे, " आपण आमच्या घरी रहावयाला आल्यावर माझी पत्नी किती विलक्षण सुग्रण आहे, याचा अनुभव आपणास येईल. ती शिकलो सवरलेली नाही आणि तिला वाङ्मयात काही कळतही नाही. पण, इतकी प्रेमळ, पतिपरायण, कुटुंबवत्सल, आतिथ्यशील आणि उदार स्त्री सहसा आढळणार नाही. माझी वकिली आता नीट चालत नाही. तरी देखील तिने आमच्या खर्चात काही कमी केले नाही. पहिल्यासारखेच सगळे पाहुणचार आणि सणवार थाटात चालू आहेत. त्यामुळे माझी किती ओढाताण होते, हेही ती लक्षांत घेत नाही. तिच्या सुग्रणपणामुळे आणि आतिथ्यशीलतेमुळे माझे स्नेही आमच्या घराला 'रॉयल हिंदु हॉटेल' म्हणतात. त्याचा तिला मोठा अभिमान वाटतो.'

श्री. रमाबाई या ता. १२ मे १९४८ रोजी खामगाव येथे दिवंगत झाल्या.

३

कोल्हटकरांच्या चरित्राची साधने

१९६२च्या जूनमध्ये मी कोल्हटकरांच्या चरित्राची साधने गोळा करण्याच्या उद्योगाला लागलो. जुलैमध्ये माझा मुक्काम मुंबईस असताना, श्री. गं दे. खानोलकर आणि प्रो. वि. ह. कुळकर्णी या दोघांशी विचारविनिमय करून, आम्ही चरित्राच्या साधनांची यादी तयार केली. त्यासंबंधी कोल्हटकरांचे आप्त, मित्र, शिष्य, चहाते वगैरेंशी पत्रव्यवहार करण्याचे ठरवले; व श्री. खानोलकर यांनी त्यांचे चरित्र लिहावे, असाही

निर्णय घेतला. त्यानंतर १९६२च्या ऑगस्टमध्ये मी पुण्यास गेलो. तेथे श्री. भाऊसाहेब खांडेकर यांच्या सल्ल्याने सर्व गोष्टी निश्चित करून आम्ही कामाला सुरुवात केली.

कोल्हटकरांच्या चरित्राच्या साधनात (१) त्यांचे 'आत्मवृत्त', (२) आपल्या पुस्तकांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, (३) त्यांनी स्वत:संबंधी क्वचित् केलेले लेखन, (४) १८९६ पासून १९३४ पर्यंत वृहन्–महाराष्ट्रातील शेकडो लोकांना त्यांनी पाठवलेली पत्रे, (५) त्यांचे कुटुंबीय, आप्त, मित्र, शिष्य आणि चहाते यांच्या आठवणी व (६) त्यांच्या निधनानंतर नियतकालिकांतून त्यांच्यासंबंधी आलेले लेख या साहित्याची मुख्यतः गणना होते. त्यात (१) 'आत्मवृत्त', (२) प्रस्तावना, (३) त्यांनी स्वत:संबंधी क्वचित् केलेले लेखन आणि (४) पत्रव्यवहार ही साधने अधिकृत म्हणून अर्थातच अव्वल दर्जाची ठरतात.

ता. १ जून १९३४ रोजी कोल्हटकर पुणे येथे दिवंगत झाले. त्या वेळी त्यांच्या 'आत्मवृत्ता'ची त्यांनी स्वहस्ते लिहिलेली प्रत मजजवळ होती. १९३१ साली त्यांचा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्याची योजना जेव्हा श्री खांडेकर, श्री. खानोलकर आणि मी अशा तिघांनी हाती घेतली, तेव्हा त्यांनी आपल्या लेखसंग्रहाच्या मुद्रण प्रतीबरोबरच 'आत्मवृत्त'ही माझ्या स्वाधीन केले; व आपल्या मृत्यूनंतर वीस वर्षांनी ते प्रसिद्ध करण्यात यावे, असे मला बजावून सांगितले. १९३४च्या जूनमध्ये त्यांचे देहावसान झाल्यावर, त्यांचे द्वितीय चिरंजीव श्री. प्र. श्री. कोल्हटकर यांचे मला 'आत्मवृत्त' त्यांच्याकडे उलट टपाली परत पाठवण्याबद्दल पत्र आले. ते पुढे दिले आहे,—

P. S. Kolhatkar, B. A.
मुंबई ४
४–७–३४

सा. न. वि. वि.

'मायाविवाहा'चे हस्तलिखित मिळाले. 'आत्मचरित्र' मला तुम्ही तावडतोब पाठवावे. त्याच्या मी ४ नकला टाईप करून तुम्हांस पाठवीन. तरी हे पत्र पहाताच ते लिखाण पाठवावे. उलट टपाली ते मला मिळेल, अशी व्यवस्था व्हावी खामगावला spare copy नाही. मूळची प्रत खामगावला होती, असा बाबांचा समज झाला होता. पण ती बरोबर नाही. उलट डाकेने आत्मचरित्र पाठवावे. कळावे.

तुमचा
बापू

या पत्रानुसार मी 'आत्मवृत्त' लगेच त्यांच्याकडे परत पाठवले. पत्रात उल्लेखिलेले 'बाबा' म्हणजे कोल्हटकरांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. दिनकर श्रीपाद उर्फ बाबासाहेब कोल्हटकर हे होत.

श्री. ह. वि. मोटे यांनी हे 'आत्मवृत्त', ता. १ जून १९३५ रोजी, कोल्हटकरांच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या वेळी, प्रसिद्ध केले.

'आत्मवृत्त' माझ्यापाशी असताना मी त्याच्या ३ टंकलिखित प्रती काढून घेतल्या होत्या. त्यांपैकी एक प्रत श्री. खानोलकर किंवा प्रो. वि. ह. कुळकर्णी यांपैकी कोणाला तरी मी दिली असावी, असे मला आठवते. पण आपल्याजवळ प्रत नसल्याचे त्यांनी मला कळवले आहे. माझ्याजवळ असलेल्या 'आत्मवृत्ता'च्या प्रती, गांधीवधानंतर झालेल्या आमच्या 'शांतानिवासा'च्या विध्वंसात, नष्ट होऊन गेल्या. त्याबरोबरच कोल्हटकरांनी आपल्या नाटकासंबंधी माझ्या विनंतीनुसार तयार करून दिलेली टिपणेही नष्ट होऊन गेली.

'आत्मवृत्ता'ची प्रकाशित आवृत्ती वाचल्याबरोबर त्यातील काही भाग गाळण्यात आलेला आहे, हे माझ्या लक्षात आले. १९६२ च्या जुलैमध्ये मी प्रथम मुंबईस, नंतर ऑगस्टमध्ये पुण्यास आणि शेवटी सप्टेंबरमध्ये खामगाव येथे गेलो असता, त्याची मूळ प्रत कोणाजवळ आहे, याची चौकशी केली. तेव्हा श्री. ह. वि. मोटे, श्री. अण्णासाहेब कोल्हटकर आणि श्री. प्र. श्री. कोल्हटकर या तिघांजवळ किंवा खामगाव येथे असलेल्या कोल्हटकरांच्या पुत्रपौत्रांजवळ ती नसल्याचे मला त्यांच्याकडूनच समजले. अजूनही त्या प्रतीचा शोध मला लागलेला नाही.

कोल्हटकरांच्या पौत्री कु. इंदुमती कोल्हटकर यांनी खामगावहून माझ्या विनंतीनुसार, ता. २४–९–६२ रोजी, मला आपल्या आजोबांच्या मृत्युपत्रातील वाङ्मयविषयक भागाचा उतारा पाठवला. हा उतारा पुढे दिला आहे, —

"माझ्या नाटकांपैकी 'सहचारिणी' व 'परिवर्तन' या दोन नाटकांचे प्रयोग करण्याची मोनापोली गंधर्व कंपनीस दिली आहे. माझ्या बाकीच्या नाटकांपैकी कोणत्याच नाटकाचे प्रयोग करण्याची मोनापोली कोणत्याही कंपनीस किंवा व्यक्तीस दिलेली नाही. माझी नाटके, इतर पुस्तके, कविता व लेख हे छापण्याचे हक्क सर्वस्वी माझ्याकडे आहेत. ते कोणालाही दिलेले नाहीत. माझी पुस्तके, कविता, लेख, निबंध व भाषणे यांची खाली दिल्याप्रमाणे विल्हेवाट व्हावी.

अ. 'माझ्या चार गोष्टी', 'दुटप्पी की दुहेरी' व 'श्यामसुंदर' या दोन कादंबऱ्या, 'साहित्यवत्तिशी व 'भारतीय ज्योतिर्गणित' या माझ्या पुस्तकांचे सर्व प्रकारचे हक्क चि. दिनकर यास मिळावे. या पुस्तकांच्या घरी असलेल्या व येणे असलेल्या प्रती सर्व चि. दिनकर यास मिळाव्या.

ब. माझ्या नाटकांपैकी 'मतिविकार', 'प्रेमशोधन', 'वधूपरीक्षा', 'शिवपावित्र्य' 'श्रमसाफल्य' व 'मायाविवाह' ह्या सहा नाटकांचे प्रयोग करण्याचे, छापण्याचे व इतर सर्व प्रकारचे हक्क माझा मुलगा चि. प्रभाकर यास मिळावे. तसेच या पुस्तकाच्या घरी असलेल्या व येणे असलेल्या प्रती त्यासच मिळाव्या.

क. माझे सर्व टीकालेख, भाषणे व निबंध यांच्या प्रकाशनासंबंधी व इतर सर्व हक्क, तसेच माझ्या नाटकांपैकी 'वीरतनय', 'मूकनायक' 'गुप्तमंजूष' व 'जन्मरहस्य' यांचे प्रयोग करण्याचे, छापण्याचे व इतर सर्व प्रकारचे हक्क व त्याप्रमाणे 'सहचारिणी' व 'परिवर्तन' या दोन नाटकांसंबंधी प्रयोग करण्याखेरीज छापणे वगैरे सर्व प्रकारचे हक्क माझी मुलगी चि. सौ. कमलाबाई पाटणकर ईस मिळावे; व त्याचप्रमाणे या पुस्तकांच्या घरी असलेल्या व येणे असलेल्या प्रती देखील तिलाच मिळाव्या.

वरील लेखात न दर्शविलेली माझी जी इस्टेट राहिली असेल, ती माझा वडील मुलगा चि. दिनकर यास मिळावी.

यणप्रमाणे हे मृत्युपत्र आज तारीख १४ जुलै १९३१ रोज मंगळवारी साक्षीदारांसमक्ष सही करून पुरे केले आहे.

द. ब. भास्कर वामन जोशी

सही

श्री. कृ. कोल्हटकर

अटेस्टेड बाय

भास्कर वामन जोशी

पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

नारायण मनोहर गोळवेलकर

या मृत्युपत्रात 'आत्मवृत्ता'चा उल्लेख नाही. तथापि, त्यातील शेवटल्या कलमानुसार, त्याच्यासंबंधीचे सर्व हक्क श्री. दिनकर श्रीपाद उर्फ बाबासाहेब कोल्हटकर यांच्याकडे होते, असे दिसते.

प्रो. वा. ल. कुळकर्णी यांच्या 'श्रीपाद कृष्ण : वाङ्मयदर्शन' या पुस्तकावर ता. २६-७-५९ च्या 'तरुण भारता'च्या साप्ताहिक अंकात मी विस्तृत परीक्षण लिहिले होते. त्यासंबंधी कोल्हटकरांचे जामात प्रि. भा. ल. पाटणकर यांनी, नाशिकहून ता. २८-७-५९ रोजी मला पाठवलेल्या पत्रात, असे म्हटले होते की,—

"प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या व्याख्यानांच्या पुस्तकावरील आपला मार्मिक विस्तृत अभिप्राय वाचून आनंद वाटला. ती. स्व. तात्यासाहेबांच्या लेखनातील ज्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे दर्शन प्रा. वा. ल. कुळकर्णी यांना झाले नाही, त्यांचे सम्यग् विवेचन आपल्या विस्तृत परीक्षणात आले आहे. प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या पुस्तकाला हा लेख परिशिष्ट म्हणून जोडला, तर त्यांच्या पुस्तकातील एकांगीपणा नाहीसा होण्यास फार मदत होईल.

आपल्या लेखाने आणखी एक महत्वाचे काम केले आहे. ते म्हणजे ती. स्व. तात्यासाहेब यांचे 'आत्मवृत्त' म्हणून समजले जाणारे व त्या नावाने ओळखले जाणारे पुस्तक हे, प्रा. मायदेव यांच्या विनंतीवरून, आपल्या लिखाणाच्या अनुरोधाने, स्पष्टीकरणवजा केलेले टाचण आहे. पुष्कळांना ही गोष्ट माहीत आहे. पण, चरित्र वा आत्मचरित्र यावर लिहिणारा वा बोलणारा, ते आत्मचरित्र आहे, अशी समजूत करून त्यावर टीकास्त्र सोडतो.

तात्यासाहेब यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे श्री. हरिभाऊ मोटे यांनी ते प्रसिद्ध केले. ते प्रसिद्ध करावयाला नको होते. ती. स्व. तात्यांच्या ज्या मुलाकडे त्या पुस्तकाचे हक्क होते, त्यांनीही परवानगी द्यावयाला नको होती, असे माझे त्या वेळेपासूनचे प्रामाणिक मत होते व आहे."

कोल्हटकरांचे 'आत्मवृत्त' त्यांच्या निधनानंतर वीस वर्षांनी मी, जरूर त्या टीपा देऊन, त्यांच्या नाटकांवरील टिपणांसह, प्रसिद्ध करावे, अशी त्यांची इच्छा होती. पण तसा योग नव्हता.

आपल्या शिष्यांपैकी श्री. हिराबाई पेडणेकर, श्री. गडकरी, श्री. गुर्जर, सौ. आनंदीबाई शिर्के, श्री. खांडेकर, श्री. खानोलकर आणि मी यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार विशेष होता. १९१७च्या मेमध्ये 'सहचारिणी' नाटकाच्या बाबतीत श्री. गुर्जर यांनी जो हिराबाईंचा गैरसमज करून दिला, त्यामुळे कोल्हटकरांचे आणि त्यांचे 'संबंध जन्माचे तुटले.' त्यानंतर, बाईंनी आपण कोल्हटकरांना पाठवलेली सगळी पत्रे त्यांच्याजवळून परत मागवली. तीं त्यांनी आपल्या, प्रांजळ स्वभावानुसार, लगेच परत पाठविली अशा रीतीने हा जो दोहाती पत्रव्यवहार हिराबाईंच्या ताब्यात आला, तो त्यांनी श्री. गुर्जर यांच्या स्वाधीन केला, अशी निश्चित माहिती कोल्हटकरांना मिळालेली होती. त्यांच्या इच्छेनुसार हा पत्रव्यवहार मिळवण्याचा प्रयत्न श्री. खांडेकर, प्रो. वि. ह. कुळकर्णी आणि मी अशा तिघांनी १९६२ सालापासून आतापर्यंत पुष्कळ केला. पण, श्री. गुर्जर यांनी, ता. २० ऑगस्ट १९६२ रोजी श्री. खांडेकर यांच्या पत्राला दिलेल्या उत्तरात, 'गहाळ झालेला पत्रसंग्रह (कै. तात्यासाहेबांचा) उपलब्ध करून घेणे कठीण दिसते', असे विधान करून, पर्यायाने तो प्रश्न निकालात काढला. श्री. गुर्जर यांच्या निधनानंतरही आम्ही तो पत्रव्यवहार मिळविण्याचा प्रयत्न चालू ठेवलेला आहे. पण अजून तरी त्यात यश आलेले नाही.

कै. अण्णासाहेब कोल्हटकर यांच्याजवळ कोल्हटकरांचा खामगाव आणि जळगाव येथील सर्व पत्रव्यवहार आहे, असे मला समजले होते. म्हणून, १९६२ च्या ऑगस्टमध्ये पुण्यास असताना, मी मुद्दाम श्री. अण्णासाहेबांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी तो पत्रव्यवहार वाळवीने नष्ट होऊन गेल्याचे सांगितले. पण, हा संग्रह इतरांनी कोल्हटकरांना पाठवलेल्या पत्रांचा असल्यामुळे, त्याचे महत्त्व त्या मानाने गौणच म्हणावे लागेल.

मजजवळच्या कोल्हटकरांच्या पत्रांचा आणि इतर लिखितांचा नाश कशा रीतीने झाला, हे मी सांगितलेले आहे. उरता उरली कै. गडकरी, सौ. आनंदीबाई शिर्के, श्री. खांडेकर, श्री. खानोलकर, श्री. लेले, डॉ. भालेराव प्रभृतींना त्यांनी पाठवलेली पत्रे. तीं मिळवण्याचा प्रयत्न श्री. खानोलकर हे गेली सात आठ वर्षे करीत आहेत. १९६२ च्या सप्टेंबरमध्ये कु. इंदुमती कोल्हटकर आणि प्रि. पाटणकर यांनी मला कोल्हटकरांचे कुटुंबीय, आप्त आणि मित्र यांची जी यादी दिलेली होती, तदनुसार त्या सर्वांना पत्रे लिहून मी आठवणी पाठवण्याची विनंती केली. पण त्यातही म्हणण्याजोगे यश आले नाही. ज्या काही आठवणी मला मिळाल्या, त्या सर्व 'युगवाणी'च्या १९६९ च्या जूनपासून तो १९७० च्या जूनपर्यंतच्या अंकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. कोल्हटकरांचे समकालीन नाटककार आणि नट यांची पत्रे आणि आठवणी मिळविण्याचाही प्रयत्न मी केला. पण तोही फारसा साध्य झाला नाही.

आमच्या या प्रयत्नाला यश आले, फक्त श्री. हिराबाई पेडणेकर यांच्यासंबंधीची माहिती मिळविण्याच्या बाबतीत ! १९६२ च्या जुलैत प्रो. वि. ह. कुळकर्णी यांनी श्री हिराबाईचे शेवटले यजमान श्री. कृ. ना नेने यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला; व नंतर मी तो पुढे चालवून हिराबाईसंबंधीची संपूर्ण माहिती त्यांच्याकडून मिळविली. त्यांच्या पूर्वायुष्याची माहिती देण्याच्या बाबतीत श्री. अंजनीबाई मालपेकर, श्री. गणपतराव बोडस, श्री. बालगंधर्व, श्री. पु. रा. लेले, श्री. सु. शा. मांद्रेकर प्रभृती व्यक्तींची मला अतिशय मदत झाली. त्यामुळेच, प्रो. म. ल. वऱ्हाडपांडे यांना, 'कोल्हटकर आणि हिराबाई' हे पुस्तक लिहून, कोल्हटकरांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या घटनेवर अधिकृत प्रकाश पाडता आला.

श्री. कृ. ना. उर्फ कुशाभाऊ नेने यांच्यासंबंधीही दोन शब्द लिहिणे जरूर आहे. ते आणि

कोल्हटकर, त्यांचे शिष्य आणि मित्र

या ग्रूप फोटोची मूळ कल्पना श्री. राम गणेश गडकरी यांची. १९१४ किंवा १५ साली नाताळात 'मासिक मनोरंजना'चे लेखक मुंबईस एकत्र आले असता, त्यांचे एक छायाचित्र काढवून घ्यावे, असे श्री. गडकऱ्यांच्या मनात आले. त्यांची ही कल्पना 'मासिक मनोरंजना'चे संपादक श्री. काशीनाथ रघुनाथ मित्र व श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर यांनाही पसंत पडली. त्या वेळचे ज्येष्ठ नाटककार, टीकाकार व विनोदी लेखक, त्याचप्रमाणे श्री. गडकरी, गुर्जर, काणेकर प्रभृतींना गुरुस्थानी असलेले श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना केंद्रस्थान देऊन इतर साहित्यिक त्यांच्या सभोवार असावे, अशी गडकऱ्यांची या छायाचित्राबद्दल कल्पना होती.

दि. १३ मे १९६४ रोजी प्रा. भ. श्री. पंडित यांना लिहिलेल्या एका पत्रात या छायाचित्रात असलेले एक कवि श्री. नागेश म्हणतात, "मला वाटते १९१४ किंवा १५ साली आम्ही काही 'मनोरंजना'चे लेखक व कवि नाताळात मुंबईस एकत्र आलो. त्यांची नावेच सांगतो; गुर्जर, गडकरी, ठोमरे, काणेकर, परळकर, ठेंगे, कोल्हटकर, रेंदाळकर हे ते गृहस्थ होत. गडकऱ्यांच्या प्रेरणेने आमचा एक ग्रूप फोटो कै. मित्रांनी तारापोरवाल्यांकडून त्या वेळी काढून घेतला होता. तो पुढे 'मनोरंजना'त प्रसिद्ध झाला."

'महाराष्ट्र साहित्य' या मुंबईच्या मासिकाच्या मार्च-एप्रिल १९२४ च्या अंकात या ग्रूपमधील एक श्री. पु. गो. काणेकर (शारदाश्रमवासी) यांचा 'बालकवींची समग्र कविता' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात श्री. काणेकर म्हणतात, "साल बरोबर आठवत नाही. डिसेंबरचा शेवटला आठवडा असावा. श्री. तात्यासाहेब कोल्हटकर, कै. गडकरी आणि श्री. नवरे (कवि नागेश) हे त्या वेळी मुंबईत आले होते आणि वरचे वर मुंबईस न येणारे ठोंबरे हेही आले होते. ही संधी साधून 'मनोरंजना'च्या लेखक व कवि मंडळीचा एकत्र फोटो काढून घ्यावा, असे कै. गडकऱ्यांनी कै. काशीनाथपंत मित्र यांना सुचविले. मित्रांना ती सूचना तात्काळ पसंत पडली; व ती अमलात आणण्याचे त्यांनी ठरविले. कै. रेंदाळकर व श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर हे 'मनोरंजना'च्या संपादक वर्गात त्या वेळी होते. रा. ब. गोविंद मल्लीनाथ ठेंगे व श्री. लक्ष्मण विनायक परळकर हे मुंबईचेच रहिवासी. या सर्व मंडळीबरोबर प्रस्तुत लेखकालाही फोटो काढून घेण्यासाठी येण्याचे निमंत्रण देण्यात आले होते." (पृ. ४००–४०१).

या ग्रूप फोटोत 'मनोरंजना'च्या एक लेखिका, श्रीपाद कृष्णांच्या अग्रशिष्या व 'दामिनी' नाटकाच्या लेखिका श्री. हिराबाई पेडणेकर यांचाही समावेश व्हावा, अशी श्री. गडकरी व श्री. गुर्जर यांची इच्छा होती. पण श्री. मित्र, रा. ब. ठेंगे व श्री. परळकर यांनी या कल्पनेला विरोध केला. श्रीपाद कृष्ण तटस्थ राहिले. त्यांच्यात व हिराबाईत पुढे जे वितुष्ट आले, त्याला हेही एक कारण झाले. शेवटी हिराबाईशिवायच हें छायाचित्र घेण्यात आले.

श्री. गडकरी यांच्या मृत्यूनंतर 'उद्यान' मासिकाचा जो खास अंक निघाला, त्यात या छायाचित्राचा ब्लॉक प्रथम छापण्यात आला. नंतर तो 'मासिक मनोरंजन'च्या 'मित्र' अंकात जुलै १९२० साली प्रकाशित झाला. आचार्य अत्रे यांनी, कै. गडकऱ्यांच्या मृत्यूला २५ वर्षे झाल्यानंतर, 'समीक्षक' मासिकाचा विशेषांक फेब्रुवारी १९४४ साली काढला. त्यात त्यांनी ह्या छायाचित्राचा ब्लॉक 'गुरु, शिष्य आणि मित्र' या शीर्षका-

अनुक्रमणिका

खाली प्रसिद्ध केला. श्री. अत्रे यांनी हे छायाचित्र कै. गडकऱ्यांचे धाकटे बंधु श्री. शंकर गणेश गडकरी यांच्याकडून मिळविले होते. हा ब्लॉक सर्वोत्तम आहे.

या छायाचित्राची एक प्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात होती. त्यावरून श्री. वा. वि. भट यांच्याकरवी प्रतिलिपी तयार करवून घेऊन श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी ती समारंभपूर्वक वि. सा. संघाला भेट दिली. या छायाचित्राची दुसरी प्रत, वि. सा. संघाच्या खामगाव शाखेची कोल्हटकर स्मारकाची इमारत पूर्ण झाल्यावर, कोल्हटकर जन्मशताब्दीचे निमित्त तेथे लावण्यासाठी श्री. माडखोलकर यांनी दिली आहे.

या ग्रूप फोटोची रचना पुढीलप्रमाणे आहे:—

मागे उभे—कै. त्र्यं. बा. ठोमरे (बालकवी), कै. पु. गो. काणेकर (शारदाश्रमवासी), कै. ए. पां. रेंदाळकर, कै. का. र. मित्र, (संपादक, मासिक मनोरंजन), कै. रा. ग. गडकरी (गोविंदाग्रज)

बसलेले— कै. वि. सी. गुर्जर, कै. ना. ग. नवरे (नागेश), कै. रा. ब. गो. म. ठेंगे, कै. श्री. कृ. कोल्हटकर, कै. ल. वि. परळकर

—म. ल. वराडपांडे

संघवार्ता

मा. नी. गलगलीकर
सरचिटणवीस

कै. नाना जोग स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे शुक्रवार दि. १ मे १९७० रोजी सकाळी ८–१५ वाजता नाटककार कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आला.

याच दिवशी सायंकाळी ६–३० वाजता डॉ. वसंतराव वानकर यांनी कै. जोगांच्या छायाचित्राला संस्थेतर्फे पुष्पमाला अर्पण केली. यावेळी संस्थेचे बरेच कार्यकर्ते उपस्थित होते.


' वैदर्भीय काव्यदर्शन '

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या ' स्वरमंडळा 'ने दि. ३ मे ७० रोजी मुंबईच्या, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कलाशाखेच्या वतीने दादर मेथे ' वैदर्भीय काव्य दर्शन ' हा कार्यक्रम सादर केला.

तसेच दि. ४ मे १९७० रोजी सूरसिंगार संसद, मुंबईच्या वतीने ' वैदर्भीय काव्यदर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघ, ‘स्वरमंडळ’





‘वैदर्भीय काव्यदर्शना’तील मुंबईची काही स्मृतिचित्रे

अनुक्रमणिका

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१